# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० ५ माहे अक्टोबर सन १८७९ इसवी. अंक ३९

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळी पुढें दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८३ |
| ,, दुसरे खेपेस | ८२ |

## मुंबई ब्यांक.

अमानत ठेविलेल्या पैशावर व्याजाचे दर.

१२ महिने ठेविल्यास दरसाल दर शेकडा ४ रुपये.

६ महिने ठेविल्यास ( ह्मणजे तारीख १ नोवेंबर पासून ता० ३० जूनपावेतों एकसारखे कोणतेंही सहा महिनेपर्यंत) दरसाल दर शेकडा ३ रुपये प्रमाणें.

सदर्हू प्रमाणें न ठेविल्यास दरसाल दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याज मिळेल.

तात्पुरची किंवा मुद्दाम व्यवस्था केल्याशिवाय कमी मुदतीपर्यंत अथवा अधिक व्याजानें अमानत पैसा ठेविला जाणार नाहीं.

चालू अमानत पैशाच्या खात्यावर व्याज दिलें जाणार नाहीं.

मुंबई.

तारीख १ आगष्ट सन १८७९ इसवी.

## जाहिरात.

सर्व लोकांस जाहीर केलें जातें कीं मि० बमनजी फिरोजशा एम. ए. एल. एल. एम- मुंबई हाय कोर्टांतील सालिसिटर व अटर्नी हे अकोलें एथें सुमार दोन महिने झाले, आले आहेत. हे आल्यापासून बरींच कामें यांकडे येत आहेत. ज्यांजला फिर्यादी, अपिलें, व स्पेशियल आपिलें यांकडे देणें असतील किंवा हरएक कामासंबंधी सला मसलत घेणें असेल त्यांनी त्यांस स्वतः अगर तुकाराम गणेश यास भेटावें, ह्मणजे त्यांचीं कामें घेतलीं जातील. प्रथमचे बोलण्याची अगर कागद पहाण्याची त्यांजपासून फी घेतली जाणार नाहीं. कामासंबंधी पैशाचा ठराव समक्ष केला जाईल. हे गृहस्थ अकोलें एथें तूर्त मि० के. कावुस एम. टाटा हेड क्लार्क आफ करन्सी आफिस सदर स्टेशन अकोलें यांचे बिऱ्हाडीं डिपुटी कमिशनर कचेरीनजीक रहात आहेत. कळावें. तारीख ९ माहे आगष्ट सन १८७९ इसवी.

## सन १८८० इसवी साला करितां रोजनिशी.

सन १८८० सालाकरितां जें रोजनिशीचें पुस्तक आह्मी तयार करीत आहों त्याच्या नमुन्याचा साच्या पूर्वीं इतकाच असून त्यांत पूर्वीं पेक्षां उपयुक्त विषयांची बरीच ज्यास्त सुधारणा करणार आहों. हें पुस्तक येत्या नोवेंबरच्यां २९ वे तारखेचे आंत छापून तयार होईल. त्यांत सरसालचे दिनचर्ये संबंधी मराठी तिथी, वार, महिने, सूर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें, सण व त्या संबंधे सरकारी आफिसांस व दिवाणीकोर्टांस असणाऱ्या सुट्या, मौंजी विवाहाचे मुहूर्त, त्याच प्रमाणें इंग्रजी व मुसलमानी वार, तारखा महिने, सण इत्यादिकांचा समावेश केला जाईल. तसेच रेल्वे, तारायंत्र, स्टांप, मानिआर्डर्स, पोस्ट, मुंबईब्यांकेच्या रुळी वगैरे नेहमी जरूर लागणाऱ्या विषय संबंधानें अवश्य तितकी बरीच माहिती दिली जाईल. शिवाय सिव्हिल प्रोसिजर, मुदतीचा, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टांप, कोर्ट फी, पोलिस गाईड डिस्ट्रिक्ट आणि गांवचे पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर इत्यादि अनेक नेहमी जरूर लागणार कायद्या संबंधी उपयुक्त अशी अवश्य तितकी माहिती दिली जाईल. कापीव तुळया, तक्ते वगैरे लांकडांचे घनफूट कसे मोजावे या विषयींची माहिती दिली जाईल. ही माहिती कंत्राटदार व लांकडे खरेदी करणारे लोकांस विशेष फायद्याची होईल. अजमासें २० रुपये दरमहा पगाराचा रोजमोरा कसा चुकता करावा याजविषयींच्या माहितीचें कोष्टक दिलें जाईल. पुस्तकाच्या अखेरीस कोरीं पृष्ठें व जमाखर्चाच्या सदराचेही कागद जोडले जातील. एकंदरींत हरएक प्रकारची होईल तितकी ज्यास्त सुधारणा करण्यांत येईल.

रोजनिशीची आगाऊ किंमत.

रोजनिशी प्रत नंबर १ ब्लॉटिंग पेपरसहित जाडे पुठ्यानें बांधलेली किंमत अकरा आणे, ट. १ आणा.

नंबर २ साधी जाड पुठ्यानें बांधलेली किंमत सात आणे, ट. १ आणा.

नंबर ३ साधी विलायती कापडानें बांधलेली किंमत साहा आणे ट. १ आणा.

वर लिहिलेल्या अन्वयें जी किंमत आक्टोबर अखेर आह्माकडे येईल त्या नंबरची रोजनिशी तयार झाल्या बरोबर रवाना करण्यांत येईल. एकदम दहा प्रति घेणारास टपाल खर्च पडणार नाहीं. घेणारानीं त्वरा करावी.

भाऊ गोविंद सापकर.
ज्ञानचक्षूचे मालक.

## जाहिरात.

सर्व लोकांस विनय पूर्वक कळविलें जातें जे संस्थान सोंडूर जिल्हा बेलारी इलाखा मद्रास एथें श्री कार्तिक स्वामींचे महास्थान आहे. त्यांचे महायात्रेचा योग येत्या कार्तिक शुद्ध १५ शुक्रवारीं आहे. साल मजकुरीं पर्वाचा योग उत्तम आहे. असा योग विरळाच येत असतो. याजकरितां सूज्ञ मुमुक्षु जनांही ही अलभ्य संधीं व्यर्थ घालवूं नये. अशी सर्वांस विनंती आहे.

गेले यात्रेंत बंदोबस्त बरोबर नसल्यामुळें यात्रेकरू लोकांस फार अडचण व त्रास सोसावा लागल्याचें परभारें ऐकण्यांत आलें परंतु सालमजकुरीं तसें नसून सर्व यात्रेकरूंस सुखावह होईल. अशा तऱ्हेचा सक्त बंदोबस्त ठेवण्याची तजवीज योजिली आहे.

कोणास जागा वगैरेची पूर्वीं तयारी करविणें असेल तर तारिख १५ नोवेंबरचे आंत खालीं सही करणारांस आगाऊ कळविलें असतां लिहिणारांचे खर्चानें इच्छित तयारी ठेवण्यांत येईल. तारीख २० सप्तंबर सन १८७९ इसवी.

R. S. Rajadhiax.
सुपरिंटेंडेंट देवस्थान कार्तिक स्वामी.

## नोटिस.

रा. मारुती वल्लद शिवराम सोनार राहणार मौजे येऊलखेडें तालुके खामगाव जिल्हा अकोलें यास अमृत कृष्णराव कुळकर्णी वहिवाटदार गणेश काशीराव गुमास्ते कुळकर्णी मौजे येऊलखेडें याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मीं आमचे जागेवर राहता ती जागा रिकामी करून द्यावी ह्मणून तुह्मांस दोन चार वेळा ह्मटलें त्याप्रमाणें तुह्मीही कळविलें कीं, दोन महिन्यांनीं, चार महिन्यांनीं रिकामी करून देतो ह्मणून आजपर्यंत चाळविलें परंतु हा काळवर जागा रिकामी करून देत नाहीं सबब तुह्मांस नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, ही नोटिस पावल्या तारखे पासून १५ दिवसांचे आंत जागा खालीं करून न दिल्यास योग्य कोर्टांत दावाकरून जागा खालीं करून घेतली जाईल. कळावें तारीख २–१०–७९ इसवी.

( सही ) अमृत कृष्णराव कुळकरणी
वहिवाटदार गणेश काशीराव गुमास्ते कुळकरणी.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. खालील चार ओळीस जागा मिळेल अशी आशा आहे.

दार्व्हे हें गाव वणी जिल्ह्यापैकीं तालुक्याचें ठाणें आहे. ह्या गावची बहुतेकांस माहिती असेल, कारण याची दोन गोष्टींनें प्रख्याति आहे. एक दार्व्हे येथील उजागर व दुसरे तीन वर्षांनीं येथें पाण्याचा दुष्काळ पडावयाचाच, तो इतका कीं, एवढ्या मोठ्या गावांत एक किंवा दोन विहिरीस पाणी असण्याचें. अशा गावांत सरकारी कामगार लोक फार उत्तम प्रकारचे येत असल्या कारणानें लोक फार सुखी आहेत.

येथें शहरसफाईकडेस बराच पैसा खर्च झाला असल्यामुळें गावांत सडका वगैरे चांगल्या प्रकारच्या झाल्या आहेत. तसेंच सडकेच्या भोंवतालीं लावलेलीं झाडें, पूल, व बगीच्या वगैरे फार उत्तम स्थितींत आहेत. या गावची इतकी स्थिति सुधारण्याचें कारण माजी तहशिल्दार रा. रा. देवराव जयकृष्ण हे आहेत. यांनीं फार परिश्रम केल्यामुळें ही स्थिति प्राप्त झाली आहे.

सुमारें ४ महिने झाले यांच्या वियोगामुळें लोकांस फार दुःख वाटत होतें, कारण त्यांचा स्वभाव, त्यांची वर्तणूक, त्यांची काम करण्याची शैली, त्यांची कृपादृष्टीची नजर, आणि त्यांचा धिमेपणा हे गुण पाहून लोक फार सुखी होते. अशा सद्गृहस्थांच्या वियोगामुळें लोकांस फार दुःख होत आहे तोंच जनाब महमद मुबारकअली साहेब तहशिल्दार आले. यांच्या आगमनानें माजी तहशिल्दार यांच्या वियोगामुळें जे दुःख झालें होतें तें समूळ नाहींसें झालें. अल्पकाळांत वरील सद्गृहस्थांनीं तालुक्यांतील एकंदर सर्व कामाची माहिती करून घेतली व रयत लोकांची उत्तम प्रकारें दाद घेत आहेत. यामुळें आबाल वृद्धजनांस व हाताखालील नवकरांस फार सुख होत आहे. ईश्वर करो आणि असे सद्गृहस्थ येथें असोत.

येथील कायमचे नायब तहशिल्दार रा. रा. गोविंद गंगाधर दामले हे हुशार, मनमिळाऊ, सुस्वभावाचे, व आपल्या कामांत प्रवीण असे आहेत. यांचे हातास वायूचा विकार झाल्यामुळें यांनीं ३ महिन्यांची हक्काची रजा घेतलेली आहे. यांच्या मांदगीमुळें सर्वांस दुःख होत आहे. ईश्वरकृपेंकरून लवकरच यांचा हात बरा होऊन हे आपल्या कामावर येतील अशी आशा आहे.

येथें सरकारी मराठी शाळा आहे. हेड मास्तर रा. रा. अंताजी विनायक हे आहेत. शाळेचीं स्थिति व मुलांचा अभ्यास चांगला आहे. हें हल्लींचे हेड मास्तर यांस भूषणास्पद आहे. ता २४ माहे सप्टंबर सन १८७९ इसवी रोजीं जनाब तहशिल्दार साहेब हे शाळेंत गेले होते त्यांनीं पहिल्या व दुसऱ्या वर्गांतील मुलांची परीक्षा घेतली. मुलांनीं प्रश्नांचीं उत्तरें चांगलीं दिल्यामुळें खुष होऊन एकंदर मुलांस तीन रुपयांची त्यांनीं मिठाई वाटली. कळावे ही विनंती.

आपला एक
“ क्ष ”.

वऱ्हाडसमाचार.

मिति अधिक आश्विन वद्य ९ शके १८०१

## नरसी केशवजी कैद झाले.

मुंबईचे मोठे वडे व्यापारी नरसी केशवजी भाटे जे लक्षाधीश असून च्यार गिरण्या चालवीत होते व ज्यांचे ऐश्वर्य कुबेरासारखे होते ते खोट्या कर्माच्या योगानें जमीनदोस्त झाले. दुराशा मोठी खोटी आहे ती सहसा मनुष्यास जय देत नाहीं सबब कोणीही तिचे नादीं लागूं नये. लक्षाधीश मनुष्यास लबाडी करण्याचें कारण काय असावें? पण वासना खोटी व अधिकाधिक द्रव्य मिळविण्याची हावयानें मोठा लक्षाधीशही कवडीचा माल होतो एवढेंच नव्हे, त्याची अपकीर्ति होऊन तोंडास काळिमा लागते. गिरण्याच्या कामांत लोकांचा पैसा यांनी खाल्ला व बोभाट झाल्याबरोबर पलायन केलें. व नाना तऱ्हेचे वेष करून मुलखोमुलखी हिंडत राहिले. पण पापाचा घडा भरला सबब पोलिसांनीं त्यास पकडून आणिलें. व आज च्यार महिने चौकशी चालली शेवटीं हायकोर्टांनें यांजवर २६ च्यार्ज होते त्यांपैकीं ९ च्यार्ज शाबीद ठरविले व ४ वर्षें सक्तमजूरी कैदेची शिक्षा दिली. हर हर! नरसी केशवजी सारख्या दैववान मनुष्यावर असा प्रसंग आला हें ऐकून कोणाही मनुष्यास वाईट वाटल्यावांचून रहाणार नाहीं. पण कर्माप्रमाणें फळ केव्हांना केव्हां प्राप्त होतेंच व त्याप्रमाणें नरसी केशवजी यांस मिळालें यांत अधिक ह्मणण्यासारखें कांहीं नाहीं. ईश्वरकृपेनें मनुष्यास संपत्ती प्राप्त झाली तर त्यानें सद्वर्तनानें वागून तिजपासून आपला व लोकांचा फायदा करून घेतला पाहिजे. हजारो दरिद्री मनुष्यास त्यांच्या नीच वर्तनावरून न्यायाच्या कोर्टांतून शिक्षा होतात त्यांविषयीं कधीं कोणास विशेष वाटत नाहीं. पण कीर्तीनें विख्यात झालेले, व संपत्तीनें हातीं धरिलेले असे पुरुष जगांत थेडेच असतात ह्मणून तशांतून कोणावर असा भयंकर प्रसंग आला ह्मणजे . लोकांच्या चित्तवृत्ती उचंबळतात. नरसीसारखे संपत्तिमान होणें हे ईश्वरी कृपेचें किंवा पूर्व पुण्याचें फळ असलें तर तें स्मरून त्यानें असें वागावयाचें होतें कीं ती ईश्वरीकृपा व तो पुण्ययोग निरंतर रहाता, पण तसें झालें नाहीं व असा प्रसंग आला ह्मणजे समजावयाचें कीं ईश्वरी कृपा संपली व पूर्वपुण्याचा क्षय झाला, हें समाधानास बरें आहे. पण धडधडीत विस्तवांत हात घालावयाचा ह्मणजे भाजल्या वाचून रहात नाहीं, तद्वत खोटें काम केलें ह्मणजे वाईट फळ प्राप्त व्हावयाचेंच हें मनुष्यमात्रांनें लक्षांत ठेवून वागावें हें योग्य आहे.

## पत्रकर्ते व सरकार.

इंडियन स्टेट्समन नावाचें कलकत्यास एक इंग्लिश वर्तमानपत्र आहे त्याला प्रेसकमिशनरकडून इतर वर्तमानपत्रकर्त्यांप्रमाणें लढाईसंबंधी वगैरे तारेंतून येणाऱ्या बातम्या हिंदुस्थान सरकार देत असे. मागें जून महिन्यांत अशा मिळालेल्या बातम्यांच्या संबंधानें त्यानें प्रेस कमिशनरची कांहीं टवाळी केली होती ह्मणून सरकारानें त्याला पत्र लिहून कळविलें होतें कीं तुह्मी असें अयोग्य काम करिता सबब तुह्मांस प्रेसकमिशनरकडून बातम्या देण्याचें आह्मी मना केलें आहे. त्या वेळेस त्या पत्रकर्त्यानें सरकारास उत्तर लिहिलें कीं यापुढें मी तसें करणार नाहीं या जकरितां पूर्ववत मला बातम्या देण्याची मेहेरबानी करावी. सरकारांनें ती त्याची गोष्ट मान्य केली व त्याला बातम्या देऊं लागलें; असें असतां अलीकडे पुन्हा त्यानें प्रेस कमिशनरच्या बातम्यांवर टीका केली आहे असें पाहून पुन्हा सरकारांनें ठराव केला कीं, त्या पत्रकर्त्यास या पुढें प्रेसकमिशनरकडून बातम्या मिळणार नाहींत. यावरही त्यानें सरकारास उत्तर लिहिलें आहे पण यांत बातम्या मागितल्या नाहींत, फक्त. आपल्या लेखाचा सरकाराला जो समज झाला तो दुरुस्त नाहीं, व अमुक अमुक कारणांवरून आपलें तसें करणें वाजवी आहे, असें त्यानें सरकारास लिहिलें आहे. व सरकारचें आलेलें पत्र आपले कारखान्याचे मालका पुढें ठेविलें आहे ते त्याविषयीं त्यांस योग्य वाटेल तसी तजवीज करितील असें लिहिलें आहे. आतां त्याचे प्रोप्रायटर काय करतात तें पाहावें. हे पत्रकर्ते इंग्लिश असून वजनदार आहेत ह्मणूनच सरकारासी त्यांचे असे विवाद चालतात. जिल्ह्यांत एकाद्या नेटिव पत्राकडून असा प्रकार झाला तर त्याचे खरेखोटेपणाकडेही लक्ष्य न देतां व त्यांचे ह्मणणें ऐकूनही न घेतां तेथील अधिकारी त्याची तेव्हांच उचलटांगडी करूं शकते; पण वरील प्रतीच्या गोष्टींत तसें होऊं सकलें नाही ही चांगली गोष्ट आहे. आतां सदरी लिहिल्या वादांत स्टेट्समनचे एडिटर रास्त आहेत किंवा सरकार रास्त आहे तें आह्मांस ठाऊक नाहीं व तें ठरविण्याच्या भानगडींत आह्मी पडत नाहीं. आह्मीं इतकेंच ह्मणतों कीं खऱ्या पक्षास जय असो. व वर्तमानपत्रकर्त्यांचे रास्त हक्कास कधीं बाध न येवो.

## काश्मिरचें राज्य.

दोन वर्षें झालीं काश्मिराकडे दुष्काळ आहे. पहिले वर्षी फार पाऊस पडून दुष्काळ झाला, व दुसरे वर्षी कमी पाऊस पडला त्यामुळें पीक आलें नाहीं. काश्मिर प्रांत फार पिकाऊ आहे. व बहुशा तिकडे कधीं दुष्काळ पडत नाहीं असें असतां या खेपेस पडला ही मोठी दुर्दैवाची गोष्ट होय. तरी काश्मिरचे महाराजांनीं लोकसंरक्षणाकडे पुष्कळ लक्ष्य दिलें. धर्मार्थ अन्न देण्याचीं सत्रें घातलीं, स्वस्त धान्य देण्याचीं दुकानें घातलीं, कामदार नेमून अन्नावाचून कोणी मरूं देऊं नये असे त्यांस सक्तीचे हुकूम दिले. याप्रमाणें योग्य व्यवस्था त्यांनीं आपल्या कडून करवली तितकी केली असें ह्मणतात तथापि दुर्दैवाची गोष्ट अशी कीं महाराज लोकांचे बऱ्यावाकडे लक्ष्य देत नाहींत. व हजारो लोक अन्नावाचून मरत आहेत असा पुकारा झाला, व तो विलायतेपर्यंत जाऊन तेथें अशी चर्चा सुरू झाली आहे कीं काश्मिरचे या प्रकरणांत हिंदुस्थान सरकारांनें हात घालावा. राजाला जर रयतेचें रक्षण करतां येत नाहीं, तर तो राजा कांहीं उपयोगी नाहीं. राजा गुलाबसिंग यानपासून ८० लक्ष रुपये घेतले आहेत त्याच्याबदला कोट रुपये पाहिजे तर सरकारानें महाराजास द्यावे व गरीब आणि अनाथ रयतेला अन्नावांचून न मारतां त्यांचे हातून सोडवावें असाही उद्गार कोणी कोणी काढीत आहेत. व एकंदरीतें दुष्काळ संबंधानें महाराजांनीं काय काय उपाय केले व कांहीं हयगय केली कीं काय? याची चौकशी करण्याकरितां एक कमिशन नेमावें असा विचार होत आहे असें कळतें.

कोणी ह्मणतात हें कमिशन वडोद्याच्या कमिशनप्रमाणेंच आहे ह्मणजे महाराजांची कसूर दिसून आली तर त्यांस धक्का लागेल. आह्मांस वाटतें कीं हें दुष्काळाचें काम फार नाजूक व मोठे जोखमीचें आहे. मुंबई व मद्रास इलाख्यांत दोन तीन वर्षें दुष्काळ पडला व सरकारानें भगीरथ प्रयत्न केले तरी लोक थोडे मेले व त्यांची त्रेधा थोडी झाली असें नाहीं. उडीसा प्रांतांतील दुष्काळाची स्थितिहि सर्वांचे नजरेपुढें आहेच; तेव्हां काश्मिरचे महाराजांचेविषयीं दुष्काळाचे कामीं कमिशन नेमण्याचें किंवा दुसरा कांहीं सक्त विचार करण्याचें कारण नाहीं, त्यांनीं पाहिजे तर एक पत्र लिहून चांगला बंदोबस्त ठेवण्या विषयीं सांगावें ह्मणजे पुरें आहे.

## उत्तरेकडून सार्वभौम राजा येण्याचीं फिरतीं पत्रें.

असें ह्मणतात कीं एक प्रकारचीं पुष्कळ पत्रें नागपुर प्रांतांत व वऱ्हाडांत फिरत आहेत त्या संबंधानें अलाहाबादच्या वर्तमानपत्रांत कोणी मजकूर लिहिला आहे कीं हा रशियन सरकारचा कावा आहे. लोकांच्या मनामध्यें पहिल्या राजाविषयीं वाईट भाव उत्पन्न करण्याच्या इराद्यानें अशा खटपटी रशियन लोक करीत असतात. सन १८७५ व १८७६ सालीं बलगेरियाप्रांतांत त्यांनीं अशीच खटपट करून लोकांचीं मनें चालू राजाविरुद्ध तयार केलीं आणि आपला बेत साधला. गुप्त हेराकडून रात्रीं लोकांचे दरवाजांचे आंत अशा मतलबाचीं पत्रें टाकून द्यावीं असा त्यांनीं तिकडे प्रयत्न केला होता त्याचप्रमाणें सन १८७६ सालीं तुर्कस्थानचें मुख्य शहर कानस्टंटिनोपल एथेंही अशी खटपट झाली होती. व तोच प्रकार आतां हिंदुस्थानांत करण्याचें त्यांनीं मांडलें आहे. पुढें जें पत्र प्रसिद्ध केलें आहे तें. समरकंद किंवा बुखारा एथील हिंदू व्यापाऱ्याकडून युक्तीनें लिहविलें असावें असें तो बातमीदार ह्मणतो. वास्तवीक पाहतां उत्तरेकडून सार्वभौम राजा हिंदुस्थानांत येण्याच्या गोष्टींत हिंदू लोकांस कांहींच नफा नाहीं. तथापि तशा प्रकारचीं पत्रें पोलिसाचे दृष्टीस पडलीं असतां त्यांनां चौकशीस मार्ग व्हावा ह्मणून त्यांतील मतलब त्यानें इंग्लिश भाषेंत प्रसिद्ध केला आहे त्याचें भाषांतर असें:—

पत्र.

तेहतीस कोटी देवांचा राजा इंद्र त्याच्या एथून ह्मणजे इंद्र लोकाहून श्रीक्षेत्रकाशी एथील विश्वेश्वरास ही पत्रिका सुवर्णाक्षरांनीं आलेली आहे. व ही स्वर्गाहून श्रीविश्वेश्वराचे देवालयांत येऊन उतरली आहे.

शके १८०९ माघ शुद्ध २ शनिवार अश्विनी नक्षत्र मकर संक्रांत मीन लग्न या दिवशीं ६॥ घटका दिवसास कलियुगांत सत्ययुग होईल व तें १००० वर्षेंपर्यंत राहील. व त्या दिवशीं २१ घटका दिवसास उत्तरेकडून राजा येईल व तो सार्वभौम होईल. आणि त्यावेळीं पातकी असतील ते पाताळास जातील आणि पुण्यवान या लोकीं रहातील. ज्या कोणाचे हातीं हें पत्र जाईल त्यानें याची नक्कल करून आपले जवळ ठेवावी आणि अस्सल पुढें पाठवावें ह्मणजे त्याला सहस्त्र गोप्रदानें केल्याचें पुण्य लागेल व जे कोणी या प्रमाणें करणार नाहींत व यावर भरवसा ठेवणार नाहींत ते शापदग्ध होतील आणि त्यांचा नाश होईल. तसेंच जे कोणी हें पत्र वाचून हासतील व याची थट्टा करितील ते नरकास जातील.

(सही) माधवराव पूजारी
देवस्थान काशी विश्वेश्वर.

आह्मांस वाटतें कीं हा रिकामटवल्या व भोळे भाविक लोकांचा उद्योग आहे. व लोकांचे मनांत उगीचें कुतर्क भरवून देऊन मजा पाहत बसण्याचें हें काम आहे. मागें बंडाचे वेळीं चपात्या फिरल्या होत्या तसाच हा प्रकार आहे. सबब कोणी विचारी मनुष्य यावर सहसा भरवसा ठेवणार नाहीं. व भरवसा ठेवण्यासारखें यांत कांहीं हाशील नाहीं. उत्तरेकडील राजा आह्मांस नको आहे. ज्याचे स्वतांचे राज्यांत प्रजेस अनेक प्रकारचीं दुःखें व अस्वस्थता आहे तो इकडे येऊन आह्मांस काय सुख देणार आहे? हें दिसतच आहे. व आमचे परम प्रतापी रणशूर इंग्लिश बहादूर उत्तरेकडच्याच काय पण दाही दिशांकडील दहाही राजे सामन्यास आले तरी त्यांचा समाचार घेण्यास समर्थ आहे सबब उत्तरेकडच्याची आह्मांस बिलकूल काळजी नाहीं व कोणी करूंही नये. व सुखाचा जीव दुःखांत घालू नये. कृपाळु परमेश्वरानें इंग्लिश सरकारचें छत्र आह्मांवर अखंड ठेवावें व त्यापासून आह्मांस सर्वतोपरी सुख व्हावें हतकीच आमची इच्छा आहे.

## काबूलची स्थिति.

काबूल शहरांतील एका हिंदु व्यापाऱ्यानें पंजाबप्रांतीं आपले घरीं पत्र पाठविलें त्यांतील हकीकत स्टेट्समन पत्रांत प्रसिद्ध झाली आहे व ती भरवशाची आहे असें ह्मटलें आहे सबब तिच्यांतील तात्पर्य आह्मी आपले वाचकांस कळवितों.

त्या पत्रांत लिहिलें आहे कीं हें पत्र तुह्मास अमुक मनुष्याच्या हातून अमुक मुलखांतून पोंचेल. त्या मनुष्याला तुह्मी अमुक अमुक सामान द्यावें. हुंड्या सकारण्याची एथें अगदीं मंदी झाली आहे. बालीहिसार मध्यें असलेले फिरंगी साहेब सर्व मारले गेले. व त्यांचे शिपाईही मारले. गोष्ट मजलेला येऊन पोंचली. अमीर साहेबांनीं फिरंगी साहेब बालाहिसारमध्यें ठेविल्याच्या योगानें पठाण लोक फार रागावले. आणि त्याकरितां त्यांनीं त्यांची वासलात लाविली. पठाण लोक बाजारांत उघड बोलत कीं अमीर साहेब बालाहिसारमधून फिरंगी साहेब लोकांस परत लावून देणार नाहींत तर आह्मी त्यांची व अमीर साहेबाचीही कत्तल करूं. व त्यांचे वतीचे स

रदार लोकांसही ठार मारू. व फिरंगी साहेबांस परत लावून देण्याविषयीं त्यानीं अमीर साहेबांस निक्षून सांगितलेंही होतें. साहेबांचे शिपाई व अमीर साहेबांचे लोक जेव्हां जेव्हां बाजारांत कांहीं घ्यावयास येतु तेव्हां तेव्हां त्यांच्याशीं त्यांचे नित्य कज्जेही होत होते. व मुल्लांजी तसें करण्याविषयीं मशिदींत नित्य त्यांस चेतवीत होते. ते ह्मणत कीं ईश्वरासाठीं व धर्मासाठीं तुह्मी फिरंगी काफर लोकांनां आपल्या मुलखांतून नाहींसे करा. आणि रमजानच्या रोज्जाच्या दिवसांत प्रार्थनेच्या वेळीं ते त्यांस हेंच पढवीत कीं आपले मुलखांत महामारी येण्यास व व ईश्वराची अवकृपा होण्यास हेंच कारण आहे कीं मुसलमान राष्ट्रांत फिरंगी काफर यांचा शिरकाव झाला. आणि जेव्हां जेव्हां साहेब लोक हवा खाण्यास बाहेर निघत तेव्हां तेव्हां लोक त्यांस शिव्या देईत आणि थुंकत देखील असत. व जेव्हां सरदार व ग्इस लोक यांनीं अमीर साहेबांस ही गोष्ट कळविली तेव्हां त्यांनीं साहेबांस कळविलें कीं तुह्मी किल्याबाहेर निघत जाऊ नका. अशा प्रकारें लोकांचे डोक्यांत जेव्हां हे पूर्ण वेड भरलें व अमीर साहेब फिरंगी साहेब काढून देईनात तेव्हां ते बालाहिसार किल्यांत शिरले आणि ज्या हवेलींत फिरंगी साहेब रहात होते तिला आग लावून त्या सर्वांस त्यांनीं जागच्या जागीं ठार मारलें आणि शहरांत येऊन लुटालूट केली. व आह्मी हिंदू असल्यामुळें फिरंगी लोकांच्या तर्फेचे व त्यांच्या हुंड्या वटवितो या सबबेनें आमची ही हवेली आणि दुकान त्यांनीं लुटलें आतां फिरंगी लोक मोठी फौज घेऊन येतील आणि मागच्याप्रमाणें सर्व शहराचा विध्वंस करून टाकतील. सबब आह्मी आपलें देणें घेणें व दुकान बंद केलें आहे. साऱ्या आफगाणिस्थानांत अव्यवस्था व भय उत्पन्न झालें आहे. जे जे मुशाफर लोक रस्त्यानें जातां येतां आढळतात त्यांस लुटतात व ठार मारतात. पठाणांपठाणांतही यादवी सुरू झाली आहे आतां माल कांहीं पाठवींत जाऊ नका. व इकडून कांहीं पाठविण्याविषयीं जरखेखातर व धाका खातर पत्रें येत जातील तरी त्याप्रमाणें कांहीं पाठवीत जाऊ नका. आमच्या हवेलींतून व दुकानांतून सर्व चीजवस्त लुटून नेली, बायकांचे आंगावरील दागिनेदेखील नेले. अमीर साहेबाच्यानें फिरग्यांचें रक्षण झालें नाहीं. शहाण्यास एक शद्ब पुरें आहे. याहून अधिक कांहीं आतां लिहीत नाहीं. काशीक्षेत्रीचे ज्योतिषी यांस आह्मांविषयीं प्रश्न पुसावे आणि ते काय सांगतील तें लिहून कळवावें. आणि अमृतसार एथील दरबार साहेबाचे देवालयांत जाऊन गुरुप्रसाद चढवावा. आमचें आतां काय होणार तें परमेश्वर जाणे. प्रस्तुत आमच्यानें काबुल शहर सोडवत नाहीं. [illegible]कडून अमक्या रस्त्यानें कासींद पाठविण्या[illegible] योजना करावी. अमूक अमुकास रामराम सांगावे. आमच्या मातुश्रीस आणि बहिणीस आह्मांसाठीं सिद्धपूजा करण्यास सांगावें.

## प्राचीन हिंदु लोकांची हद्द.

हिंदुलोकांची हद्द पूर्वीं कोठपर्यंत होती याचें अनुमानच करवत नसून सर्व पृथ्वीच हिंदूंची होती असेंच ह्मणावें लागतें. आलीकडे मात्र हिंदु लोकांची हद्द अठक नदीपर्यंत अगदीं कडेलोटाची झाली असून त्या पलीकडे एकादा हिंदु गेल्यास त्यास प्रायश्चित घेऊन शुद्ध व्हावें लागतें असा सर्वत्र आमच्या लोकांचा समज झाला आहे. हा समज आमच्या मतानें अगदीं वेडगळ समजुतीचा असून आमचे पूर्वज सुमारें २००० वर्षांपूर्वीं पाहिजे तिकडे पर्यटन करीत असत असें आतां कित्येक पुरातन हिंदूनीं परकीय परकीय देशांत केलेल्या गोष्टी बाहेर येऊं लागल्यामुळें स्पष्ट दिसूं लागलें आहे. हें आमचें ह्मणणें कितपत खरें आहे ह्याचा अनुभव आह्मीं या खालीं एका हिंदु देवळाबद्दल जी हकीगत दिली आहे त्यावरून उघड दिसून येईल. थोड्या दिवसांपूर्वीं बालंटाईन नावाचे कोणी विलायती गृहस्थ पृथ्वी पर्यटन करण्यास निघाले असून त्यांनीं हिंदुस्थानांत आल्यावर इकडील एक गोपाळ नावाचा चाकर बरोबर घेऊन रशियांत प्रवेश केला. व त्या प्रवासांत जे चमत्कार त्यांनीं प्रत्यक्ष पाहिले त्यांपैकीं हाही एक चमत्कार असून त्यांतील तात्पर्य पुढील प्रमाणें आहे. रशियन लोकांच्या अमलांत कास्पियन समुद्राच्या किनाऱ्यावर बकू नावाचें एक शहर असून त्या शहरापासून सुमारें पांच कोसांच्या अंतरावर " सुरखाणी " ह्मणून एक हिंदूचें देवालय आहे. हें चांगलें रंगविलेलें असून याच्या भोवतालीं मोठमोठ्या दगडी भिंती आहेत. याचा मुख्य दरवाजा मोठा, बळकट व लांकडाचा केलेला आहे. या देवालयास मोठमोठ्या ओवऱ्या असून त्यांत पूर्वीं पुष्कळ हिंदु राहत असत असें तिकडील लोकांच्या सांगण्यावरून कळतें. या मोठ्या दगडी कोटाच्या आंत एक वाटोळें कंपाउन्ड असून त्यांत देऊळ आहे. याचा गाभारा बरोबर चौकोनी असून याची उंची सुमारें १०० फूट आहे व गाभाऱ्यापासून फक्त घुमट व कळस याची उंची ५० फूट असावी. हें देवालय फारच पुरातन बांधलेलें आहे असें दिसतअसून नेहमी उत्तम दुरस्तींत असतें. गाभाऱ्याच्या घुमटापासून एक लांबलचक दोरी बांधली असून तिच्या टोंकास एक सुबक व मोठी तांब्याची घांट बांधलेली आहे. गाभाऱ्याच्या फरसबंदी जमीनीवर सुमारें एकेक हात उंचीच्या कांहीं धातूच्या नळ्या उभ्यां केल्या असुन त्यांच्यां शेवटांस विजेच्या यंत्राप्रमाणें कांहीं आकार केलेला आहे. हें यंत्र फिरवून त्याच्या तोंडाशीं पेटवलेलीं काडि धरली ह्मणजे आपोआप दिवे लागतात व हे दिवे कांहीं दैविक कृतीनें लागतात असा त्या लोकांचा समज आहे. परंतु हे दिवे खचित ग्यासलाईटचे असोवत असें मि. बालंटाईन खात्रीनें सांगतात. तेथें जो हिंदु पुजारी आहे तो तेथीलच एका ओवरींत राहतो. त्या ओवरींत गणपतीचीं वगैरे अनेकचित्रें काढलेलीं असून कांहीं सोन्यारूप्याच्या मूर्तींहि मांडलेल्या आहेत. या मूर्तीं मध्यावर एका सिंव्हासनासारख्या चवुऱ्यावर असून त्यांच्या सभोंवती वर सांगितलेले ग्यासाचे दिवे आहेत. हे दिवे बालंटाईन यांच्या समक्ष लावण्यांत आले होते. ह्या देवाच्या जागत्या जोतीविषयीं सर्व धर्मांचे लोक वचकतात. या देवाचा खजिनाहि मोठ असून पाहिजे त्या धर्मांचे हजारो लोक येऊन देवापुढें अगणित द्रव्य ठेवितात व त्या द्रव्याची खजिन्यांत नेहमी भर पडते. तेथें जो हल्लीं पुजारी आहे तो हिंदु असून लाहोरचा राहणारा आहे. आजपर्यंत तेथील देवास हिंदूंच्या हातूनच पूजा मिळते, ह्या हकीकतीवरून अटक नदी वलांडावयाची नाहीं हें केवळ थोतांड असून पूर्वींचे हिंदुलोक पाहिजे तिकडे जात असत व राहात असत हें स्पष्ट दिसतें.

अ. द.

It is with some concern andregret, we observe an advertisement in the Times of India, for an Head Clerk for the Berar secretariat, what is to become of the Berar applicants ? Considering the appointment is one, created for the exclusive management of Berar affairs, sanguine hopes were entertained, that none, but a Berar candidate would have succeeded to the post, the more especially, as there is a stagnation in promotion in this small Province and no scope whatever elsewhere.

We believe in no out-siders being allowed to fill such appointment in the Central province, as the Heads of Departments keenly protect the interests of the men serving immediately under them and in fact all Departments divide the plum among their own crue; and Berar, we ventnre to think, will not be an exception.

There are able Head clerks in the province such as the one of Akola, Oomraoti, Woon &c. but all expected that the Head Clerk of Akola would have been selected, for as far as we are aware of, he has 20 years approved Berar Service and experience, has risen step by step from the lowest grade of Rs 20 to Rs 200, worked in all branches of the Department with high success, as a perusal of his certificates will shew, and was always selected for important and hard work.

Appointments from the Recidency into Berar and vice versa would certainly not be distasteful, as it would give scope, and it is believed, the Resident will, in his goodness, protect the interests of the Berar men whose, advancement is lamentably, slow and if now thrown out, will have to wait many long years, before a similar chance offers itself.

## वऱ्हाड

गेल्या आठवड्यांतील झडीचा पाऊस संपून या आठवड्यांत हवा स्वच्छ झाली होती पण शुक्रवारपासून हस्ताचा सपाऱ्याचा पाऊस सुरू झाला आहे. शुक्रवारीं तिसरे प्रहरीं दोन सरी मोठाल्या पडल्या, कालही मळभ आणि गडगडाट दोन प्रहरून चालू होता. व सारी रात्र पुन्हा बुरबुर लागली होती.

कमिशनर साहेब एथेंच आहेत. सोमवारीं मिडल क्लास स्कूल पाहण्यास गेले होते.

मि. ला साहेब जेलर यांची उमरावतीस बदली झाली व तेथील मि. टेलर साहेब एथें नेमिले.

मि० अय्याकानु यांची इलिचपुरची बदली त्यांचे खटपटीनें रहित होऊन उमरावतीस झाली असे उ० अ० कर्ते ह्मणतात.

पोलिस कान्स्टेबल लोकांनां महागाई भत्ता मिळण्याचा ठराव झाला.

मि० मेफेट साहेब पोलिस सुप्रिंटेंडेंट विलायतेचे रजेवरून मुंबईस परत आले.

क्या० गनत्राप साहेब पोलिस सुप्रिंटेंडेट मेजर झाले.

स्यानिटरी कमिशनर डा० लिटल साहेब देवी काढण्याकरितां या आठवड्यांत पेठेंत गेले होते व शहरांतही आले होते. हल्लीं ते बुलढाण्यास गेले आहेत.

शहरांत पाणी आणण्याच्या संबंधानें विचार करण्याकरितां आज टौन हालांत म्युनिसिप्यांलिटीची जनरल कमिटी भरणार आहे.

रा. रा. श्रीराम भिकाजी जटार इजुकेशनल इन्स्पेक्टर उमरावती हायस्कुलाचे वार्षिक परिक्षेकरितां आज तिकडे जाणार आहेत.

एथील पोस्टमास्तर मि० ग्ल्याकन साहेब यांची जबलपुरास बढतीवर बदली झाली. व रा. रा. व्यंकटराव कृष्ण पोस्टाकडील हेड क्लार्क यांची वर्ध्यास बदली झालेली रहित झाली. यांनां मागें जबलपुरास बदलले होते व आतांही पुन्हा बदली करणार होते पण तसें झालें नाहीं हें पाहून आह्मांस संतोष वाटतो.

रा. रा. चिंतामण मोरेश्वर रजिष्टर खात्याकडिल इन्स्पेक्टर हे येथील सबरजिस्ट्रार आफिसचे तपासणीकरितां शिगावाकडून एथें आले होते ते दोन दिवस राहून मूर्तिजापुराकडे गेले.

बुलढाण्याचे पोलीस इन्स्पेक्टर यांस मागें लिहिलेल्या त्यांच्या येका दरवडेखोर धरण्याच्या योग्य कामाबद्दल " रावबहादुर " असा किताब देण्याविषयीं शिफारस झाल्याचें प्रमोदसिंधूवरून कळतें.

असें ऐकतों कीं साल मजकूरच्या हायर स्यांडर्डचे परीक्षेत बसलेल्या गृहस्थांपैकीं कोणीच पास झाले नाहींत. हायर साठीं बसलेल्या पैकीं लोअर मध्यें २ पास झाले. व शिवाय लोअर मध्यें ६ पास झाले त्यांत अकोल्याचे ४ व उमरावतीचे २ आहेत.

देऊळगावाहून पत्र आल्यावरून समजतें कीं तिकडे उत्तरा नक्षत्र कोरडें गेलें. व हस्त नक्षत्र लागल्यापासून झड लागली आहे.

उद्या एथील हायस्कुलाची वार्षिक परीक्षा सुरू होणार आहे

## वर्तमानसार

जनरल बेकर यांचे सैन्यावर हल्ला करण्या करितां आफगाण लोक मोठी मजबूत तयारी करीत आहेत असें समजतें.

काबूल येथें बंडवाले लोकांचा उद्योग जारीनें सुरू आहे. पुष्कळ व्यापाऱ्यांनीं या कामास वर्गणी दिली आहे व एका श्रीमान व्यापाऱ्यानें वर्गणी देण्याचें नाकारल्यामुळें त्यास ठार मारलें.

अमीर शेर अली हे अद्याप जिवंत असून ते रशियाचें जें सैन्य मर्व्हवर गेलें त्याबरोबर होते. नुकतीच झालेली काबुलांतील कत्तल त्यांचे सांगण्यावरून झाली असें लाहोर येथील वर्तमान पत्राचा पेशावर येथील बातमीदार लिहितो.

जपानमध्यें पटकीचा उपद्रव इतक्या जारीनें सुरू आहे कीं, दोन महिन्यांत ४२,५०० लोक मेले.

आतां होणाऱ्या आफगाण लढाईंत काबुलचें सैन्य ४०,००० आहे असें समजतें.

कलकत्ता एथील इंडियन आसोसिएशन विलायतेस हिंदुस्थान तर्फे वकील पाठविणें तो नेहमी तेथें राहवा अशी तजवीज करण्या करितां कांहीं वर्गणी जमविण्याची खटपट करित आहे व त्याकरितां बाबु सुरेंद्रनाथ बानर्जी हे डाका एथें जाणार आहेत.

मद्रासेतील म्युनिसिप्यालिटीनें धंद्यावर बसविलेला कर आह्मांवर नसावा ह्मणून तेथील सुमारें १०० नायकिणींनीं अपील केल्यावरून त्यांजवरील कर अजीबात कमी केला. याचप्रमाणें वकील लोकांनीं आपणावर प्राप्तीपेक्षां जास्त कर बसला आहे असा अर्ज केला होता पण तो नामंजूर झाला असें समजतें.

रशिया एथें जेव्हां नुकतीच सैन्याची लुटुपुटीची लढाई झाली ती पाहण्याकरितां फक्त इंग्रज सरकारासच पाचारण केलें नव्हतें असें ह्मणतात.

एका मनुष्याचे कानांत माशी गेली होती ती कांहीं केल्या बाहेर निघेना तेव्हां त्यानें तंबाकू ओढून त्याचा धूर पोटांत गेल्या बरोबर ती आपोआप कानांतून बाहेर आली.

पांडिचरी वैगैरे इतर फ्रेंच सरकारचे ताब्यांतील हिंदुस्थानांतील प्रांत यांतील सरकारी नोकरांस लग्न करणें झाल्यास त्या सरकारची परवानगी लागतें असें ह्मणतात. ने. ओ.

पुणें एथें कांहीं पारशी मुलांनीं लुटारूपणाचा धंदा सुरू केला आहे. यांनीं थोड्या दिवसांपूर्वीं दोन चोऱ्या दिवसां केल्या. या लोकांचा अद्याप पत्ता लागला नाहीं परंतु पोलिसाचा शोध चालू आहे,

रशिया व चीन या दोन देशांमध्यें झालेल्या तहावर सही करण्याकरितां चिनी सरकारचा वकील लिव्हेडिया येथें गेला आहे. चिनी सरकारचें बाकीचें वकीलमंडळ सेंटपिटर्सबर्ग येथेंच राहून हा वकील मात्र चीन देशास परत जावयाचा आहे.

खेलातचे गव्हरनर महमद ताहिरखान हे पळून गेल्याची खबर आली आहे.

सातारा— श्री. छ. आबासाहेब महाराज यांनीं येथील सर्व साहेब लोकांस गेल्या शनवारीं रात्रीं बडा खाना दिला.

हिंदुस्थान सरकारास लढाईचे संबंधानें दररोज दहा लक्ष रुपयांहून अधिक खर्च येतो असें सरकारी तिजोरीच्या पत्रकावरून बाॅम्बे रिव्ह्यूकर्त्यानें अनुमान काढिलें आहे.

लायसन्स ट्याक्स आकारणें तो ज्यांचे उत्पन्न १०० रुपयांचें होतें त्यापासून आकारला होता परंतु डाका एथील सभेनें अर्ज करून ज्यांचें २५० रुपये उत्पन्न असेल त्या लोकांपासून पुढें आकारावा असा अर्ज केला होता तो हिंदुस्थान सरकारानें सर्व बंगाले इलाख्यास लागू केला.

---

## महायात्रेसंबंधी अवश्यक खर्च.

आमच्या नगर जिल्ह्यांतील एका मित्रानें १२ वर्षांमागें महायात्रा केली तिच्या खर्चाचें टिपण त्यानें आह्माला दिलें होतें तें बहुता दिवशीं आह्माला आढळलें. आणि हल्लीं रेलवेच्या सोईनें जाण्या येण्याच्या अवधींत फरक झाला आहे तरी सामान्य प्रतीच्या गृहस्थास रस्त्याचा खर्च शिवाय करून धर्मकर्माप्रीत्यर्थ खर्च किती येतो हें या कागदावरून कळणार आहे. व काळजीनें आणि मेहनतीनें जो कागद तयार झाला तो गैरविल्हेस लागण्यापेक्षां त्यांतील माहिती भाविक वाचकांच्या सेवेस सादर करावी हें आह्मांस बरें वाटलें ह्मणून हें टिपण खालीं लिहिलें आहे.

या टिपणांत आरंभीं लिहिलें आहे कीं, महा यात्रेस १६ महिने लागतात व तितक्या काळांत दर एक मंगळवारीं काल भैरवाचे शेरणीसाठीं सवा पैशाचा गूळ वाटीत जावा त्याचा आकार १ रुपया व दररोज वाटेनें ब्राह्मणभोजनानिमित्य स्नानसंध्या झाल्यावर एक पैसा ब्राह्मणास देण्याचें उदक सोडून जो कोणी अतीत अभ्यागत भेटेल त्यास तो द्यावा त्याचा आकार ७॥ रुपये मिळून हे ८॥ रुपये आतां गाळाऊ समजावयाचे. कारण सोळा महिन्यांचे ठिकाणीं सोळा दिवसांतही आतां यात्रा होते तेव्हां त्या मानानें जितके दिवस लागतील तितके पैसे व जितके मंगळवार मध्यें येतील तितके सवापैसे लागतील.

२८५८३ प्रथमतः पैठणावर गंगा नदी लागते तेथील खर्च. तीर्थविधि यांत ८१ क्षौर ८८६ गंगाभेट नारळ, ८३ प्रायश्चित्त निमित्त निष्क्रय एक गुंज सोन्याचा आकार, व ८८३ संकल्पाबद्दल ब्राह्मणास धर्मादाय मिळून तीर्थ विधि ८४८९. आतां तीर्थ श्राध्ध. ८१२ दोन ब्राह्मण व यजमान यांचा भोजन खर्च, ८४ ब्राह्मणदक्षिणा, ८२ पिंडा पुढें व ८८६ तिलोदक यवोदक मिळून तीर्थ श्राध्ध १८२८६. आतां देवब्राह्मण ८२ गंगापुजेस वायन वगैरे, ८१२ सवाष्ण ब्राह्मण व यजमान मिळून तिघांचा भोजन खर्च उक्त ठराव. मिळून ८१४ व एकंदर २८५८३.

पुढें नर्मदेवर तीर्थविधि, तीर्थश्राद्ध व देवब्राह्मण सदरी पैठणचा खर्च लिहिल्या प्रमाणें.

३८१४८३ प्रयागराज एथें तीर्थविधी-- ८१ क्षौर, ८४८६ गंगाभेट नारळ व पावली मिळून, ८६ प्रायश्चित्त दोन गुंजा सोन्याचा आकार, ८८३ संकल्पाबद्दल ब्राह्मणास, मिळून ८११८९. आतां तीर्थ श्राद्ध ८१२ भोजन खर्च २ ब्राह्मण व यजमान मिळून, ८६८६ भोजन दक्षिणा, पिंडाची दक्षिणा व तिलोदक यवोदक, मिळून १८२८६ देव ब्राह्मण ८४ गंगापूजेस वायन, ८१२ सवाष्ण ब्राह्मण व यजमान मिळून भोजन खर्च उक्त ठराव व प्रयागवळ यास संभावने बद्दल एक रुपया मिळून प्रयागास खर्च ३८१४८३.

११८२८३ श्री क्षेत्र काशी एथें. प्रथम दिवशीं तीर्थविधीकडे प्रयागच्या प्रमाणें चक्र पुष्करणिका तीर्थीं ८११८९ शिवाय मनकर्णिकेवर गंगाभेटीस १ नारळ व दोन कच्छ निष्क्रय प्रायश्चित्ताबद्दल उदक सोडून ते ८ आणे मिळून १८३८९. तीर्थ श्राद्ध दिवस दुसरा. भोजन खर्च दोन ब्राह्मण व यजमान मिळून सहा आणे पात्रीं प्रमाणें १८२ व ब्राह्मणांस दक्षिणा चार चार आणे, पिंडापुढें चार आणे व किरकोळ एक आणा मिळून १८५. दिवस तिसरा देव ब्राह्मण. सवाष्ण ब्राह्मण व यजमान यांचा भोजन खर्च पुरणावरणाचा उक्त ठराव बारा आणे, गंगापूजेकडे वायन वगैरेचा उक्त ठराव आठ आणे विश्वेश्वरास व मनकर्णिकेस एकादसणी व पूजा करण्याकरितां आठ आणे, व गंगापुत्राची संभावना दोन रुपये मिळून ३८१२. दिवस चौथा पंचतीर्थी यात्रा. पिंड प्रदानास तांदूळ पाउण आणा व सुपारी पाव आणा, तिर्थावर संकल्पास एक आणा व पिंडापुढें एक आणा मिळून ८३ दिवस पाचवा कालभैरवाष्टक. भोजनाकडे ब्राह्मण आठ सुवासीन एक व यजमान मिळून दहा पात्रांस दर तीन आणे प्रमाणें. जेवण पावशेराचें पुरण घालून चिनीपुरींचें, त्याचा उक्त ठराव एक रुपया चौदा आणे, भोजनदक्षिणा अर्धा आणा प्रमाणें साडे चार आणे, व भैरवपूजेकडे अर्धा आणा मिळून २८३

आतां पंचक्रोशीयात्रा. प्रथम दिवस मुक्काम कर्दमेश्वर- तीर्थावर संकल्पास पाव आणा, देवापुढें पाव आणा, चटश्राद्ध सवा आणा, यांत तिलोदक यवोदक पाव आणा, चटाची दक्षिणा अर्धा आणा, व पिंडाकडे तांदूळ पाव आणा मिळून, भोजनखर्चाबद्दल ब्राह्मण व यजमान मिळून दोन आणे व दक्षिणा पाव आणा, मिळून एकंदर ८४, दुसरा दिवस मुक्काम रामेश्वर. वर लिहिल्याप्रमाणें चार आणे खर्च. तिसरा दिवस मुक्काम भीमचंडी खर्च चार आणे. चवथा दिवस मुक्काम कपिलधारा तीर्थ खर्च चार आणे. पांचवा दिवस वाराणसी संगमावर व पूर्वीं जाते वेळेस असी संगमावर मिळून धर्मादाय पाऊण आणा व किरकोळ तांदूळ तीळ वगैरे पाऊण आणा मिळून पंचक्रोशी यात्रा खर्च १८१८६ किरकोळ धर्मादाय तिथि पर्वणीस गंगेवर स्नानास व देवता दाखविणारास दर रोज एक पैसा मिळून च्यातुर्मास्यांतील खर्च ८१२ एकूण श्री क्षेत्र काशीस खर्च अकरा रुपये दोन आणे तीन पै.

२७८१२ गयावर्जनखर्च. काशीहून गयेस जातांनां घृतश्राद्ध प्रथम करून आपण न जेवतां मुक्कामास गेल्यावर मग जेवावें लागतें. त्या श्राद्धास खर्च. भोजन खर्च दोन ब्राह्मणास उक्त ठराव आठ आणे, ब्राह्मण दक्षिणा चार आणे, पिंडा पुढें दोन आणे, किरकोळ अर्धा आणा मिळून ८१४८६ पुनःपुनः नदीवर क्षौर करून तीर्थविधी करावा त्यास खर्च आरंभीं पैठण सदराखालीं लिहिल्याप्रमाणें २८५८३. आतां गया एथें खर्च करावयाचा तो. फल्गू श्राद्धाकडे प्रथम दिवस. फल्गूभेट व विष्णुभेट आठ आणे भोजन खर्च दोन ब्राह्मण व यजमान बारा आणे, दक्षिणा चार आणे. पिंडापुढें दोन आणे, किरकोळ अर्धा आणा मिळून १८१०८६. नऊ दिवस तीर्था तीर्थांचे ठिकाणीं चरू पिंडाचीं श्राद्धें ४९ करावीं लागतात त्या दरएक श्राद्धास पिंडापुढें एक पैसा व सुपारी व या शिवाय किरकोळ धर्मादायास पैसे दिल्यास चार आणे मिळून एक रुपया. आतां वटश्राद्धाकडे-- भोजन खर्चाकडे दोन ब्राह्मण व यजमान मिळून एक रुपया दोन आणे, ब्राह्मणास दक्षिणा दोन रुपये, पिंडापुढें एक रुपया, किरकोळ एक आणा मिळून ३८१. गयावळास संभावना अलंकार सहीत द्यावयाची त्याचा उक्त ठराव ३ रुपये. मिळून वटश्राद्ध संबंधी खर्च ७८३ सात रुपये तीन आणे. आतां विष्णु श्राद्ध. भोजन खर्चाबद्दल दोन ब्राह्मण व यजमान मिळून उक्त ठराव एक रुपया दोन आणे, ब्राह्मणास दक्षिणा ८ आणे, पिंडापुढें आठ आणे व विष्णुपदावर पिंडदान समपर्ण झालें ह्मणजे गोप्रदानानिमित्त निष्क्रय द्रव्य आठ आणे, व किरकोळ दोन आणे मिळून विष्णु श्राद्धाकडे २८१२. आतां विष्णुपद देवाची महापूजा. एकादसणीबद्दल चार आणे, देवास तुळसीसहस्त्रनामावळी समर्पण करण्यास तुळसीबद्दल चार आणे, देवापुढें महा दक्षिणा चार आणे, भोजन पुरणपोळीचें सवाष्ण ब्राह्मण व यजमान मिळून पात्रीं पांच आण्याप्रमाणें उक्त ठराव पंध्रा आणे मिळून एकंदर १८११. आतां संभावने बद्दल शोडशी ब्राह्मण यांजला अडीच रुपये, वाणी याजला अडीच रुपये, रामपर्वत व प्रेतपर्वत एथील बोंबा मारणारे प्रेते यांस दोन रुपये, माळी यास दररोजच्या फुलेंतुळसीबद्दल चार आणे, व गयावळची जागा रहाण्यास घेतली असतां भाड्याबद्दल एक रुपया मिळून संभावना ८८४. शुद्ध श्राद्धास एक रुपया, काशीस परत येतांच दधि श्राद्ध करावें लागतें त्याचा खर्च आरंभीच्या घृतश्राद्धाप्रमाणें चवदा आणे सहा पै, व किरकोळ वाटेनें धर्मादाय एक आणा मिळून गयेसंबंधी खर्च सत्ताविस रुपये बारा आणे.

एकूण तपशील:—

२८५८३ पैठणास खर्च.
२८५८३ नर्मदेवर खर्च.
३८१४८३ प्रयागराज एथें खर्च.
११८२८३ श्री क्षेत्र काशी एथें खर्च.
२७८१२ गयावर्जनाकडे खर्च.
-----
४७८७

येणेंप्रमाणें सत्तेचाळीस रुपये सात आणे अवश्यक खर्च साधारण प्रतीच्या मनुष्यास जरूर लागतो. यांत महागाई स्वस्ताईच्या संबंधानें भोजनखर्चांत कांहीं अधिक उणें होईल व धार्मिक लोक उदार बुद्धीनें अधिक खर्च करतील तर याचे दुप्पट, चौपट, दसपट वगैरे दिल्यास ती श्रेयस्कर गोष्ट आहे. बाकी वर दिलेल्या टिपणांत खर्च बेताचा लिहिला असून त्यांत महायात्रेसंबंधी अवश्य धर्मकर्मे सर्व आलीं आहेत असें माहिती देणाराचें ह्मणणें आहे.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० १२ माहे अक्टोबर सन १८७९ इसवी. अंक ४०


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळी पुढें दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८३ |
| ,, दुसरे खेपेस | ८२ |

## मुंबई ब्यांक.

अमानत ठेविलेल्या पैशावर व्याजाचे दर.

१२ महिने ठेविल्यास दरसाल दर शेकडा ४ रुपये.

६ महिने ठेविल्यास (ह्मणजे तारीख १ नोवेंबर पासून ता० ३० जूनपावेतों एकसारखे कोणतेही सहा महिनेपर्यंत) दरसाल दर शेकडा ३ रुपये प्रमाणें.

सदहू प्रमाणें न ठेविल्यास दरसाल दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याज मिळेल.

तात्पुरची किंवा मुद्दाम व्यवस्था केल्याशिवाय कमी मुदतीपर्यंत अथवा अधिक व्याजानें अमानत पैसा ठेविला जाणार नाहीं.

चालू अमानत पैशाच्या खात्यावर व्याज दिलें जाणार नाहीं.

मुंबई.

तारीख १ आगष्ट सन १८७९ इसवी.

## सन १८८० इसवी साला करितां रोजनिशी.

सन १८८० सालाकरितां जें रोजनिशीचें पुस्तक आह्मी तयार करीत आहों त्याच्या नमुन्याचा साऱ्या पूर्वी इतकाच असून त्यांत पूर्वीं पेक्षां उपयुक्त विषयांची बरीच ज्यास्त सुधारणा करणार आहों. हें पुस्तक येत्या नोवेंबरच्या २५ वे तारखेचे आंत छापून तयार होईल. त्यांत सरसालचे दिनचर्येसंबंधी मराठी तिथी, वार, महिने, सूर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें, सण व त्या संबंधें सरकारी आफिसांत व दिवाणीकोर्टांस असणाऱ्या सुट्या, मौंजी विवाहाचे मुहूर्त, त्याच प्रमाणें इंग्रजी व मुसलमानी वार, तारखा महिने, सण इत्यादिकांचा समावेश केला जाईल. तसेच रेलवे, तारायंत्र, स्टांप, मनिआर्डर्स, पोस्ट, मुंबईब्यांकेच्या रूळी वगैरे नेहमी जरूर लागणाऱ्या विषय संबंधानें अवश्य तितकी बरीच माहिती दिली जाईल. शिवाय सिव्हिल प्रोसिजर, मुदतीचा, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टांप, कोर्ट फी, पोलिस गाईड डिस्ट्रिक्ट आणि गांवचे पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर इत्यादि अनेक नेहमी जरूर लागणार कायद्या संबंधी उपयुक्त अशी अवश्य तितकी माहिती दिली जाईल. कापीव तुळया, तक्ते वगैरे लांकडांचे घनफूट कसे मोजावे या विषयींची माहिती दिली जाईल. ही माहिती कंत्राटदार व लांकडे खरेदी करणारे लोकांस विशेष फायद्याची होईल. अजमासे २० रुपये दरमहा पगाराचा रोजमोरा कसा चुकता करावा याजविषयींच्या माहितीचें कोष्टक दिलें जाईल. पुस्तकाच्या अखेरीस कोरीं पृष्ठें व जमाखर्चाच्या सदराचेही कागद जोडले जातील. एकंदरींत हरएक प्रकारची होईल तितकी ज्यास्त सुधारणा करण्यांत येईल.

रोजनिशीची आगाऊ किंमत.

रोजनिशी प्रत नंबर १ ब्लॉटिंग पेपरसहित जाडे पुट्ठ्यानें बांधलेली किंमत अकरा आणे, ट. १ आणा.

नंबर २ साधी जाड पुट्ठ्यानें बांधलेली किंमत सात आणे, ट. १ आणा.

नंबर ३ साधी विलायती कापडानें बांधलेली किंमत साहा आणे ट. १ आणा.

वर लिहिलेल्या अन्वयें जी किंमत आक्टोबर अखेर आह्माकडे येईल त्या नंबरची रोजनिशी तयार झाल्या बरोबर रवाना करण्यांत येईल. एकदम दहा प्रति घेणारास टपाल खर्च पडणार नाहीं. घेणारानीं त्वरा करावी.

भाऊ गोविंद सापकर.
ज्ञानचक्षूचे मालक.

## बुकसर्क्युलर नंबर ७ सन १८७९

अलीशान रेसिडेंट साहेब बहादुर यांनीं मुलूख अमानी हैदराबाद यांतील सर्व दिवाणी कोर्टांचे न्यायाधीश यांचे माहितीकरितां "दिवाणी मुकदम्याचे चौकशी संबंधी वहिवाटीचें टिपण" याजबद्दल ५६ कलमांचें एक सर्क्यूलर नुक्तेंच प्रसिद्ध केलें आहे त्याचें मराठी भाषांतर मे० जुडिशियल कमिशनर साहेब बहादूर यांनीं छापविलें त्याच्या प्रति आमचेकडे विक्रीस आहेत. किंमत चार आणे. बाहेरगावीं एक आणा टपाल खर्च पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## सुईण

किंवा.

प्रसूति आणि तत्संबंधीं अज्ञानमूलक व अनर्थकारक परिपाठ.

या नावाचें नवीन पुस्तक मिसेस रेबेका सिमीयन ग्रांट मेडिकल कालेजांत पास झालेली सुईण यानीं तयार केलें आहे. त्याच्या प्रति आह्माकडे विक्रीस आल्या आहेत. हें पुस्तक कुटुंब वत्सल सर्व लोकांनीं संग्रहास बाळगण्याजोगें आहे. याची किंमत सहा आणे. बाहेरगावीं नेणारास टपाल खर्चाबद्दल एक आणा अधिक पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## विक्रावयाचीं पुस्तकें.

| | |
|---|---|
| **कायद्या संबंधी** | |
| मुलकीखात्याचीं सर्क्युलरें | ४ |
| नादारीचे नियम ( वऱ्हाडाकरितां ) | ८८ |
| दिवाणी सर्क्युलरें | ८६ |
| पोलिसाची रूळ | ८३ |
| जाइंट रूळ | ८३ |
| **संस्कृत.** | |
| अध्यात्म रामायण | ४ |
| प्रायाश्चित्तेंदुशेखर | ८१२ |
| रजोदर्शनशांती | ८६ |
| धातुरूपावळी | ८३ |
| कोश-त्रिकांडशेष, मेदिनी, हारावलीव एकाक्षरी ( आडगिराइकी ) | १ |
| भगवत्‌गीता | ८६ |
| गोत्रमालिका | ८४ |
| **प्राकृत** | |
| मंत्ररामायण आर्या मोरोपंती | १८८ |
| विराटपर्वनाटक | ८१३ |
| वालीवध नाटक | ८६ |
| रुक्मिणीहरण नाटक | १८८ |
| हरिश्चंद्र नाटक | १८८ |
| भास्कर दामोदर कृत रत्नमाला ईश्वरस्तव | ८६ |
| सौभाग्यरत्न ( पुनर्विवाहसंबंधी ) | ८३ |
| विवेकसिंधू | ८१४ |
| काव्यमाधुर्य (प्राकृत कवितांतील, | ८४ |
| शिवराजलीला ( केशवराव जोरवेकर कृत कविता ) | ८१२ |
| गायनप्रकाश | ८४ |
| नलाख्यान आर्या मोरोपंती | ८३ |
| चतुश्लोकी भागवत | ८६ |
| आरत्या | ८१ |
| हरिपाठ | ८१ |
| भूपाळ्या | ८१८६ |
| व्यंकटेशस्तोत्र | ८१ |
| चक्रव्यूह | ८२ |
| ध्रुवाख्यान | ८१ |
| धावे | ८१ |
| गणपतीचे श्लोक | ८८३ |
| रामनवमीप्रतमहात्म | ८१ |
| विष्णुसहस्रनामावली | ८२ |
| शिवसहस्रनामावली | ८२ |
| **मनोरंजक** | |
| गोपीचंद नाटक हिंदुस्थानी | ८१२ |
| सिंव्हासनबत्तिशी ,, | ८१२ |
| फ्रेंच व जर्मन लढाई | ८१४ |
| वसंतमाला ( कादंबरी ) | ८१२ |
| इंग्रजांची बखर | ८६ |
| काशीयात्रा | ८८ |
| काशीप्रकाश | १ |
| भ्रांतिकृतचमत्कार | ८६ |
| अनंतफंदीच्या लावण्या | ८८ |
| रामजोशाच्या लावण्या | ८८ |
| थोर पुरुषांचे व स्त्रियांचे पवाडे | १८८ |
| बापुगोखल्यांचें चरित्र | १ |
| व्यवहारोपयोगी तारतम्य | ८२८६ |
| हिंदुस्थानच्या दरिद्राचीं कारणें | ८२ |
| **वैद्यक** | |
| वैद्यसुधाकर | १८४ |
| महामारी | ८६ |
| कुटुंबमंत्री | ८६ |
| गजकरणाचें औषध ( डबी ) | ८६ |
| **मुलांच्या उपयोगी.** | |
| तिसऱ्या बुकाच्या दुसऱ्या भागाचें भाषांतर | १ |
| पहिले बुकाचें भाषांतर | ८२ |
| स्कूल डायलाग | ८२ |
| बालज्ञान | ८१ |
| अंकलिपी | ८१ |
| भूगोल विद्या | ८१८६ |
| बालव्याकरण | ८८९ |
| मोडी वाचन | ८३ |
| किस्से मोडी मध्यम | ८८६ |
| मुलांकरितां पहिलें पुस्तक बाळबोध | ८१ |
| वाचन विद्या | ८१ |

## वऱ्हाडसमाचार.

मिति अधिक आश्विन वद्य १२ शके १८०१

## पुस्तकांचें आभारपूर्वक स्वीकार.

"सुईण किंवा प्रसूति आणी त्यासंबंधी अज्ञानमूलक व अनर्थकारक परिपाठ," "हुन्नरसंग्रह भाग दुसरा ," व "कुटुंबवत्सल" हीं पुस्तकें त्यांच्या त्यांच्या कर्त्याकडून आह्मांस नजर आलीं तीं आह्मी अत्यादरें स्वीकारून पाठविणारांचे आभार मानितों. व त्या त्या पुस्तकाविषयीं दोन शद्ब लिहितों.

सुईण.

हें पुस्तक मिसेस रेबेकाबाई नावाच्या इस्रायल स्त्रीनीं केलें आहे. व त्यांच्या पतीनीं त्यांस त्या कामांत सहाय केलें आहे. या बाई ग्रांट मेडिकल कालेजांत सुईणीचें काम शिकविण्याच्या वर्गांत शिकून परिक्षेंत पास झालेल्या आहेत. त्यामुळें या विषयावरचे त्यांचे विचार केवळ उखरवाखर व ऐकिव नव्हत. शास्त्रोक्त माहीत करून घेतलेले, व पुष्कळ प्रसंगीं स्वतां हजर राहून अनुभविलेले आहेत ह्मणून त्यांचें पुस्तक सर्वांचे आदरास पात्र आहे असें आमचे मत आहे. प्रार्थना समाजांत नेटिव स्त्रियांपुढें रेबेकाबाईनीं मागें व्याख्यान दिलें होतें तेंच कित्येक लोकांच्या शिफारसीवरून त्यानीं वाढवून पुस्तक रूपानें छापून प्रसिद्ध केलें आहे.

या पुस्तकांत गर्भिणी प्रसूत होण्याचा काल ठरविणें, प्रसूतिसूचक चिन्हें, सत्य मिथ्या वेदना, प्रसूतीची व्यवस्था, बालकाची व्यवस्था, तसेच लोकी स्त्रियांत चालू असलेले अज्ञानपणाचे व अपकारक प्रकार यांविषयीं चांगले, समर्पक व सुबोध असे विचार

सांगितले आहेत. गर्भ राहिल्यापासून प्रसूतीचा दिवस ठरविण्याकरितां बारा महिन्यांचीं कोष्टकें घालून ३६५ दिवसांचें फेरिस्त दिलें आहे. प्रसूतीच्या वेळेस लागणारे पदार्थांची यादी दिली आहे. व जागोजाग चांगले विचार प्रसिद्ध केले आहेत. उदाहरणार्थ पायाळू मनुष्य दैववान असा आपल्यांत समज आहे त्या विषयीं त्यांनीं लिहिलें आहे कीं इतर मुलांपेक्षां यांच्या बाबदींत अधिक उणें ठरविण्यास विचारानें पाहिलें असतां मला व दुसरे कोणासही अधिकार नाहीं. आणखी पायाळू मनुष्याच्या पायांत कांहीं औषधी गुण आहे असा अद्याप कांहीं शोध लागला नाहीं, आणि जर तसा शोध लागता तर प्रत्येक दवाखान्यांत एकेक पायाळू मनुष्य ठेवण्याचा सरकारानें ठराव केला असता.

अडलेल्या गर्भिणीची लवकर सुटका व्हावी ह्मणून अज्ञान व भोळसटपणाचे जे प्रकार होत असतात त्यांविषयीं या बाईनीं सांगितलें आहे तें असें:—

स्त्री लवकर प्रसूत व्हावी ह्मणुन मसाला बांधून ठेविलेल्या कापडाच्या गांठी सोडतात. " बारा पोरांनो या, सुटी जागा आहे " असें ह्मणून सुपांत केरसुणीनें घराच्या कोनाकोपऱ्यांतील भिंती झाडून तें सूप प्रसूतस्त्रीच्या अंगावर पाखडतात. तिच्या अंगावरून नारळ उतरून टाकतात. भक्ताला देण्यासाठीं तांदूळ काढितात. जें जें कांहीं घरांत झांकलेलें असेल त्यावरचें झांकण काढितात. कोणी कोणी आपल्या धर्मपुस्तकांतील कांहीं भाग वाचून प्रसूत स्त्रीच्या पोटावरून खालीं पांच वेळां फुंक मारितात. कोठें कोठें देव खेळवितात. कोणी आपल्या कुळदेवास अर्पणें करितात. त्यानें कांहीं होत नाहींसें झालें ह्मणजे ह्मणतात कीं, देवांनां अर्पणें करून दमलों आतां भुतांला अर्पणें करूं. कोणी नवऱ्याचे पायाचे आंगठे धुऊन प्रसूत स्त्रीस प्यावयास देतात व नवऱ्यास ह्मणतात " रे बाबा, ही बायको तुला अधिक उणें बोलली असेल, तुझी सेवा चाकरी करण्यास चुकली असेल तर माफ कर, तिची सुटका होऊं दे. " जमीन भुकेली ह्मणजे स्त्री लवकर प्रसूत होत नाहीं असा कित्येकांचा समज आहे ह्मणून दूध जमीनीवर टाकितात. प्रसूत होणाऱ्या स्त्रीस जें दूध देतात त्यांत थुंकतात व तें तिला प्यावयास देतात. प्रसूत होणाऱ्या स्त्रीच्या नवऱ्यास वाहत्या नळाखालीं उभें करून तेथें त्याच्या पागोट्याचे पेंच सोडतात. असे अनेक प्रकार आहेत. अशानें काय बरें लाभ होणार आहेत! लाभ तर नें होतां उलटे अपकार मात्र व्हावयाचे; ह्मणून असे वेडगळपणाचे व अनर्थकारक प्रकार टाकून योग्य उपाय केले पाहिजेत. कोणत्याही प्रकरणांत योग्यायोग्य जाणून जें योग्य असेल तेंच आह्मीं आचरिलें पाहिजे. कोणत्याही प्रकारचे व कितीही काळाचे जुने परिपाठ चालत आलेले असले तरी ते अयोग्य आहेत असें समजलें ह्मणजे असत्याची भीड न बाळगतां, जें योग्य तेंच आह्मीं करावें, तेंच आमच्या अंतःकरणावर बिंबावें, त्याजविषयींच आमची सन्मान्य बुद्धि असावी. ह्यांतच मानवी प्राण्यांस लाभ, ह्यांतच त्यांचें सुख, व ह्यांतच त्यांचें कल्याण आहे: अन्यथा नाहीं.

हे व या पुस्तकांतील दुसरे एकंदर लेख पाहून आह्मी या पुस्तकाची तारिफ करितो. व कुटुंबवत्सल लोकांनीं हें लहानसें पुस्तक आपल्या संग्रहास ठेवावें व वक्तावर यांत लिहिल्या गोष्टींचा अवश्य उपयोग करून घेत जावा अशी आमची सर्वांस शिफारस आहे.

हुन्नरसंग्रह.

दुसरें पुस्तक " व्यवहारोपयोगी हुन्नरसंग्रह भाग दुसरा," हें आहे. याचे कर्ते मुंबईचे रा. रा. गोविंद मोरोबा कार्लेकर हे आहेत. त्यांनीं पुस्तकाची किंमत सहा आणे ठेविली आहे. गुदस्त सालीं याच प्रकारचा पहिला भाग त्यांनीं छापवून त्याची किंमत आठ आणे ठेविली होती. पुढें तिसरा तयार करणार त्याची किंमत च्यार आणे ठेविली आहे. अशा प्रकारच्या टाण्याटोण्या पुस्तकांचा बराच खप आहे असें दिसतें. ज्ञानप्रकाशांत व ज्ञानचक्षूत अशीं छोटीं छोटीं पुस्तकें कित्येक निघालीं आहेत. त्याच मासल्याचें हें आहे. या पुस्तकांत विद्या, कलाकौशल्यें, या संबंधी अनेक प्रकारच्या १०० हुन्नरांचा समावेश केलेला आहे. पण एकेक हुन्नरांच्या माहितीस अगदी लहान साच्याचें पुस्तक असतां ५।४ ओळींहून अधिक जागा अडविली असेल असे फारच थोडे हुन्नर असतील व तेही हुन्नर वैद्यक, दारूकाम, रंग देणें, मिश्रधातु, खतें वगैरे महत्वाच्या बाबदींतील आहेत. सबब या कामीं कांहीं विस्ताराचे लेख पाहिजेत असें आमचें मत आहे. पण लोकांस निवांतपणीं पहाण्यास सदर्हू बाबदींत मोटमोठाले ग्रंथ आहेतच तेव्हां त्यांचें टिपण किंवा अनुक्रमणिका अशा भावें या लहान चोपड्या करण्याचा ग्रंथकारांचा विचार असल्यास तो बरा आहे. व ज्यांनां साद्यंत वाचावयास नको व तीं पुस्तकें ज्यांजवळ नाहींत त्यांस या पुस्तकाचा उपयोग चांगला आहे व तो खपाचे मानावरून ग्रंथकर्त्यास सफळही हेत आहे तेव्हां ही संतोषाची गोष्ट आहे.

कुटुंबवत्सल.

तिसरें पुस्तक " कुटुंब वत्सल यानें आपल्या आयुष्याची सांगितलेली संक्षिप्त हकीकत " या नावचें आहे. हें मुंबईतील यूनियन क्लबच्या एका सभासदानें छापून प्रसिद्ध केलें आहे. यांत विलायतेंतील एका गृहस्थाची गोष्ट आहे. तो वीस रुपये पगारापासन वाढत वाढत लक्षाधीश झाला. त्याचें मुख्य व्रत " मद्यमांस निषेध " हें होतें व सुदैवानें त्याला बायकोही तशीच चांगली व त्याच व्रताची मिळाली होती तेणेंकरून तें कुटुंब फार योग्यतेस चढलें व त्यांचे योगानें शेकडो लोक निर्व्यसनी व त्यांसारखे दृढव्रती झाले. ही गोष्ट वाचण्या सारखी असून चांगली बोधाची आहे. जे लोक मद्यमांसाचे व्यसनांत गढून गेले असतील त्यांनीं हें पुस्तक वाचून बोध घ्यावा. पुस्तक छापविणारे ह्मणतात कीं या कुटुंबवत्सलाची हकीकत वाचल्यापासून आमच्या स्वतांच्या मनावर पुष्कळ बोध झाला व आमच्या वृत्तींतही एकंदरींत बराच फेर पडला. ही गोष्ट खोटी नसेल, व अशी पुष्कळांची वृत्ती बदलल्यास फार चांगलें होईल. ग्रंथाची भाषा सुबोध असून रसाळ आहे व याची किंमत तीन आणे आहे.

---

## ब्रह्मदेशांतील रेसिडेन्सी उठविली.

ब्रह्मदेशाचा राजा थिबा आलीकडे चांगले प्रकारें वागत नाहीं. जुलूम जबरदस्ती फार करितो व कित्येक मोठमोठ्या कुळांतील व निकट आप्त मनुष्येंही त्यानें हाल करून ठार मारिलीं ही गोष्ट आमचे वाचकांस ठाऊक आहेच. ब्रिटिश सरकारचे तेथें रेसिडेंट आहेत त्यांनी कित्येक वेळां राजास तसें न करण्याविषयीं सूचना केल्या पण त्यांचा फार सा उपयोग झाला असें दिसत नाहीं. रेसिडेन्सीचे बच्यावाकरितां कांहीं फौजही तिकडे रवाना झाली होती परंतु दिवसानुदिवस तेथील स्थिति बरी दिसत नसल्यावरून ब्रिटिश सरकारानें ब्रह्मदेशाची राजधानी मंडले एथें आपले रेसिडेंटाचें ठाणें होतें तें उठविण्याचा ठराव केला व त्याप्रमाणें रेसिडेंट साहेब सर्व मंडळानिशी ब्रह्मदेश सोडून निघून आले. याविषयीं प्रेस कमिशनर यांनीं ७ वे तारखेच्या तारेंतील दिलेल्या माहितीवरून टाइम्स आफ इंडियांत आलेला मजकूर आह्मीं आपले वाचकांकरितां एथें घेतों.

कर्नल ब्राऊन साहेब आगष्ट महिन्याच्या अखेरीस मंडले शहर सोडून निघाले त्यानंतरच्या हकीकतीवरून असें दिसतें कीं रेसिडेन्सींत राहिलेले ब्रिटिश आफिसर लोकांची स्थिति समाधानकारक नाहीं. राज दरबारचे कामदार जाणून बुजून त्यांच्याशी असभ्य रीतीनें वागतात. व राजा आणि त्याचें मंडल यांचा असा रोख दिसून येतो कीं ब्रिटिश सरकारासी जो त्यांचा संबंध आहे त्याच्या धोरणाकडे ते लक्ष्य पुरवीत नाहीत एवढेंच नव्हे तर नित्याचा कामकारभार चालण्याचे बाबदींतही ते बेपर्वा वागतात. दुसरी गोष्ट, राजवाड्यांत राजानें जीं अनन्वित राक्षसी कृत्यें केलीं व ज्यांजबद्दल मि. शा साहेब यांनीं राजास निषेध केला तीं कृत्यें अजून चालूच आहेत, व राजमंडळांतील लोकांचा पगडा बराच चढला आहे व ते ब्रिटिश सरकारचे कामदाराचा धिक्कार करितात या एकंदर प्रकारावरून हल्लींच्या स्थितींत त्या दरबारांत ब्रिटिश रेसिडेंट ठेवणें केवळ निरर्थक आहे एवढेंच नव्हे, तर खरोखर धोक्याचें आहे असें सरकारास वाटतें. यास्तव हिंदुस्थान सरकारानें मंडले एथें असलेले मि. सेंट बार्बी साहेब यांस हुकूम पाठविला कीं, तुह्मीं रेसिडेन्सीच्या छावणीचा सारा तळ उठवून येववेल तितकें लवकर इकडे निघून यावें. व त्याप्रमाणें आक्टोबरच्या ६ वे तारखेस ह्मणजे गेले सोमवारीं सदर्हू साहेब तेथील आपले सर्व लोकांनिशी आगबोटींत बसून इकडे यावयास निघाले व त्यांस कांहीं हरकत झाली नाहीं.

हा मजकूर सरकारानें भामो एथें व मंडले एथें जी ब्रिटिश रयत आहे तिला जाहिरनामे लावून समजाविला.

या प्रमाणें ब्रह्मदेशांत अव्यवस्था झाली आहे व तेथील राजानें ब्रिटिश सरकाराचें सख्य मोडून त्यांस चेतविलें आहे येणेंकरून आपण होऊन आपले पायावर दगड पाडून घेण्याचें कृत्य त्यानें केलें आहे तेव्हां याचा परिणाम काय होईल तो ब्रिटिश सरकारच्या पराक्रमावरून वाचकांचे ध्यानांत येईलच. ब्रिटिश सरकाराशी विरूद्ध वागून पेशव्यांची काय अवस्था झाली? व सातारचे थोरले महाराजांची काय दशा झाली? मल्हारराव महाराज गायकवाड कोणत्या स्थितीस पोंचले? हें पाहावें. व या थोड्या कालाच्या मागील गोष्टी आहेत असें ह्मटलें तरी झुलूलोकांच्या राजाचा काय परिणाम झाला, व काबूलचे अमीर शेर अल्ली यांची कशी वाताहत झाली, व हल्लीं काबुलावर कोणता प्रसंग आहे हें सर्व मनांत आणिलें ह्मणजे ब्रह्मदेशच्या थिबा महाराजांचें चालू नाटक भारतांतील गदापर्व किंवा रामायणांतील युद्ध कांड या थरावर कधींनाकधीं गेल्याशिवाय सहसा राहणार नाहीं असें आह्मांस वाटतें.

---

## काबूल प्रकरण.

जनरल राबर्ट साहेब सहा सात हजार फौज घेऊन काबुलावर चाल करून गेले आहेत. व गेले रविवारापर्यंत ते काबुलास जाऊन दाखल होतील असें वर्तमान होतें परंतु त्याप्रमाणें घडून आलें नाहीं. व या आठवड्यांत ३—४ दिवस तिकडील कांहींच वर्तमान सरकार मार्फत अगर इंग्रजी पत्रांचे बातमीदार मार्फत प्रसिद्ध झालें नाहीं, ह्मणून लोकांचें त्या कामीं फार चित्त लागलें होतें पण शुक्रवारच्या तारखेचीं मुंबईचीं नित्याचा वर्तमानपत्रें आलीं व त्यांतून सरकारी व त्यांच्या बातमीदारांची खासगीच बातमी लिहून आली आहे त्यावरून तिकडील हकीकत कळून येतें.

चारासियाब नावाचें गाव काबुलाचें अलीकडे ५ कोसांवर आहे तेथून जनरल राबर्ट साहेबानीं ६ वे तारखेस रात्रींचे ८ वाजतां तारायंत्रांतून खबर पाठविली आहे तिजवरून समजतें कीं काबुली फौजेच्या व ब्रिटिश फौजेच्या वाटेंत २ लढाया झाल्या. इंग्लिश फौजेस हरकत करण्याकरितां शत्रू काबुलाहून निघून वाटेंत टेकड्या टेकड्यानीं आश्रय धरून राहिले होते त्यांस तेथून धुडकवावें व टेकड्या ताब्यांत घ्याव्या ह्मणून ब्रिटिश फौजेतून जनरल बेकर साहेब डाव्या बाजूनें व मेजर व्हाइट साहेब उजव्या बाजूनें दोहो आंगनें त्यांवर चालून गेले. पुढें शत्रूंचा व त्यांचा निकराचा संग्राम होऊन अखेरीस इंग्लिश सैन्यानें काबूलवाल्यांस पिटावून लाविलें व त्या टेकड्या आपल्या ताब्यांत घेतल्या. जाहिदाबादचे रस्त्यावरही काबुली लोकांनीं गडबड मांडिली होती व त्या बाजूनें जनरल मेकफर्सन साहेब दारूगोळा व सामानसुमान घेऊन येत आहेत त्यांस हरकत होईल ह्मणून राबर्ट साहेबानीं त्यांस अगाऊ सुचना पाठविली व त्यांचे सहायार्थ घोडेस्वार पाठविले. टेकड्यावरून जमलेलें काबुली सैन्य मागें हटलें तेव्हां त्याच्या १२ तोफा व २ निशाणें इंग्लिश फौजेच्या हातीं लागलीं. ही लढाई बरीच मोठी झाली. व हिजमध्यें बेकर साहेबाबरोबरचे सर्जन डकन, क्या. यंग, व ले० फर्गुसन हे जखमी झाले. व सुमार ७० शिपाई मेले व जायां झाले. शत्रूंचें नुकसान किती झालें तें समजलें नाहीं. पण बरेंच झालें असेल. व्हाईट साहेबाचे बरोबरचे लोकांतून ३ हायलंडर मेले, ६ जखमी झाले, तसेच थोडे शिपाइ मेले व जखमी झाले. आणि एक ल्यानूसर जखमी झाला.

चारासिया येथून काबूलची गढी दिसते. काबूल शहराबाहेरच्या चार्दे नावाच्या नजीक गावचे जाहागिरदारानीं राबर्ट साहेबास पत्र पाठविलें आहे कीं आह्मीं आपली भेट घेऊं इच्छितों. व दुसरेही कित्येक लोक असें करावयास खुशी आहेत असें समजतें. राबर्ट साहेब ८ वे तारखेस थेट काबुलावर जाणार होते. अमीराचे सांगण्यांत असें आहे कीं, बाल्हिसार किल्ला शत्रूनीं बळकावला असाचा व माझी बायका मुलें शहरांत गेलीं असावीं. राबर्ट साहेबांचे मत आहे कीं तिकडील लोकांस आतां ब्रिटिश फौजेस हरकत करून आपला निभाव लागणार नाहीं, असें वाटूं लागलें आहे व त्यावरून थोड्याच दिवसांत सर्व धीरथावर होईल.

## मुलकी कामांत वकील.

मे० रिविन्यु कमिशनर साहेब मुलकी कामांत वकील कां घेत नाहींत व तसें होणें योग्य आहे कीं काय? याविषयीं आह्मी आपले विचार दोन आठवड्या पूर्वीं प्रसिद्ध केले होते. आतां गेले आठवड्यांत एथील सर्व वकील मंडळी सहजगत्या साहेबबहादुरांचे भेटीस गेली होती तेव्हां त्यांच्या त्यांच्या भाषणांत वरील विषयाचे संबंधानें कांहीं गोष्टी निघाल्या व त्यावरून कमिशनर साहेबाचे या विषयींचे विचार पोक्त आहेत असें दिसून आलें तो मजकूर आह्मी आपले वाचकांस कळवितों.

रिविन्यू कमिशनर साहेब ह्मणाले, मुलकी कामांत सर्वकाल वकील घ्यावयाचे नाहींत असें आमचें मत मुळींच नाहीं. अलीशान रेसिडेंट साहेब बहादूर यांस या बाबदींत आह्मी असें कळविलें आहे कीं ज्या कामांत सरकार प्रतिपक्ष चालवितें, ज्या कामांत दिवाणी कोर्टप्रमाणें मुलकी कोर्टांत काम चालतें, ज्या कामांत पक्षकार स्वतां हजर राहू शकत नाहींत, तशा सर्व कामांत वकिलास हजर राहून काम चालविण्याची परवानगी असावी. त्याचप्रमाणें पाटिलकीचें कामांत सर्व काल जे तंटे असतात ते फक्त कामगारांच्या निवडणुकीपुरते असतात सबब त्यांत वादविवादाचा किंवा तक्रारीचा विशेष संभव नाहीं, सबब त्या कामांत वकील लोकांस हजर राहण्याची सवड देऊं नये, तथापि एकादा भानगडीचा पाटिलकीसंबंधीही मुकद्दमा असल्यास त्यांतही वकील घेण्याची परवानगी असावी. रेसिडेंट साहेबाकडून या विषयींची मान्यता आली ह्मणजे हे नियम प्रांतांत प्रसिद्ध करूं असें रिविन्यू कमिशनर साहेबानीं वकील लोकांस सांगितलें. वकील मंडळी या उद्देशानें साहेबांचे भेटीस गेली नसून साधारण भेटींत व भाषणांत साहेबानीं त्यांच्या संबंधांतील आपले विचार काय आहेत व आपण काय करणार हें मोकळे मनानें त्यांनां सांगितलें. व त्यांच्याशी बराच वेळ ते बोलत होते हें पाहून आह्मांस फार संतोष वाटतो व त्यांचा चांगुलपणा दिसून येतो. असेंच सर्व अंमलदार सर्वकाळ वागतील अशी आह्मी आशा करितों.

## वऱ्हाड

मे. जोन्स साहेब कमिशनर शुक्रवारीं दोन प्रहरचे गाडीनें उमरावतीकडे परत गेले.

उमरावतीच्या देवीडाक्टराचा पगार तेथील म्युनिसिप्यालिटीनें द्यावा अशा विषयीं मागणें झालें होतें पण म्युनिसिप्यालिटीनें कबूल केलें नाहीं.

साल मजकुरच्या लोअर स्टांडर्डचे परीक्षेंत एकंदर आठ गृहस्थ पास झाले त्यांचीं नावें:—

अकोला

१ रा. रा. कृष्णराव हरी कोल्टकर

२ मि. नबाब किशोरखान

३ रा. रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर

४ मि. महमद इस्मायल

उमरावती.

५ रा. रा. गिरराव रामचंद्र

६ रा. रा. गणेश बापुजी

७ रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर

इलिचपुर

८ रा. रा. गणेश गोविंद

रा. रा. श्रीकृष्ण नरहर यांचे कोर्टांतील मूर्तिजापुरचे रा. रा. जनार्दन गोविंद जमादार यांजवरील फौजदारी मुकद्दम्याचा निकाल सांगण्याची ६ वी तारीख नेमली होती पण आरोपी आजारी असल्यामुळें २०वी तारीख नेमली व त्याच दिवशीं रा. रा. वामनराव गोविंद जमादार यांजवर दुसरा मुकद्दमा चालू होणार आहे. याच गृहस्थावर मूर्तिजापुरास रा. रा. रामराव गोविंद याजसमोर एक फौजदारी मुकद्दमा शुक्रवारीं चालणार होता त्याचें काय झालें तें समजलें नाहीं.

इलिचपुरच्या कमळजा औरतेच्या चोरीचा पत्ता लागला व ३ आरोपी बाळकृष्ण वेंडर, विठू जड्या व बाळा सोनार हे दोषी ठरले. त्यांस तीन तीन वर्षें कैद व दोन दोन शें रुपये दंड अशी शिक्षा झाली. रा. रा. बजाबा वकील यांस निरपराधी ह्मणून सोडून दिलें.

जमीनीचे साऱ्यावर शेकडा १ रुपया सडकपट्टी, १ रुपया स्कूलपट्टी, व ६८४ जागलपट्टी अशा अधिक बाबी आहेत पैकीं मोजणी होऊन दर ठरोती झाल्यावर सडकपट्टी कमी झाली व बाकीच्या दोन पट्ट्या मिळून शेकडा ७८४ कायम राहिले. हल्लीं असा ठराव झाल्याचें ऐकतों कीं सर्व बाबी मिळून रुपयास सवा आणा घेत जावा. तसें झाल्यानें शेकडा ७८१३ ह्मणजे पहिल्यापेक्षां ८९ अधिक होतात. ही एक नवीनच बाब झाली ह्मणावयाची.

एथील धर्मार्थ दवाखान्यावरील डाक्टर अय्या कानू यांची उमरावतीस बदली झाल्या प्रमाणें ते तिकडे गेले व मि० डिसोजा चांदुराहून एथें आले.

मि० मोफाट साहेब पोलिस सुप्रिंटेंडेंट एथें येऊन रुजू झाले-

रा. रा. व्यंकटराव मल्हार खामगावचे नायब तहशिलदार यांस मूर्तिजापुरास नेमिलें.

जुडिशियल कमिशनर साहेब वाशिमास गेले आहेत.

क्या० बार साहेब जोधपुरचे असिस्टंट पोलिटिकल एजंट यांस हैदराबादेस फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट नेमिलें.

दि ओरिजिनल विक्टोरिया थीएट्रिकल क्लब नावाची मुंबईची पारशी नाटककार मंडळी नागपुराकडे गेली आहे. व तिचे म्यानेजर मि० करशेटजी हे थोड्या दिवसांत अकोल्यास येणार आहेत. व एथें नाटक आणावें असा त्यांचा विचार आहे उर्दू भाषेंत ही मंडळी नाटक करीत असून देखावे वगैरे फार उत्तम करीत असते.

उमरावती जिल्ह्यांत चांदूर तालुक्यांत कुऱ्हें एथें सब रजिस्ट्रार आफिस मुकर केलें व त्यावर रा. रा. जयकृष्ण रघुनाथ यांची नेमणूक केली.

जून महिन्याचे जननमरणाचें पत्रक रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिद्ध झालें आहे त्यावरून समजतें कीं, त्या महिन्यांत २४४७ मनुष्यें मरण पावलीं. यांत महामारीनें २९ देवी येऊन ३, तापानें १३८१, पोटांतील रोगानें ४५१, आत्मघातानें १०, जखमानीं ३, अपघातानें ७३, सर्प दंशानें अथवा घातक जनावरांकडून १७, व इतर प्रकारच्या रोगानें ४८० मिळून २४४८. यांत पुरुष १३३० व स्त्रिया १११७ आहेत. या महिन्यांत जन्म पावलेल्यांची संख्या ४६७८ आहे त्यांत पुत्र २४०२ व कंन्या २२७६ आहेत.

मि. स्केबि साहेब असिस्टंट इंजिनियर यांस पश्चिम वऱ्हाडाकडून पूर्व वऱ्हाडाकडे दिलें.

मि. टी हामिल्टन साहेब असिस्टंट सुप्रिंटेंडिंग इंजिनियर यांस तीन आठवड्यांची हक्काची रजा दिली होती ती रद्द केली.

आगष्ट अखेर पांच आठवड्यांत उमरावती रेलवेस मालाचें उत्पन्न काय झालें व कोणकोणते प्रकारचा किती माल तिजमधून गेला त्याचा हिशेब निझाम स्टेट रेलवे म्यानेजर क्या. इंग्लंडु यांनीं रेसिडेन्सी आर्डरमधून प्रसिद्ध केला आहे त्यावरून समजतें कीं सवा महिन्यांत ११९३ रुपये मालाचे भाड्याबद्दल आले व ६७४ टन माल आला गेला. यांत कच्चा कापूस १८१ टन मीठ १०६ टन तांदूळ ७४ टन वगैरे जिन्नस आहेत.

कैदी त्रिंबक अनंत नातू याजवरील चोरीचे मुकद्दम्याची चौकशी डिपुटी कमिशनर साहेबापुढें पुन्हा व्हावी असा ठराव होऊन दहावी तारीख नेमिली होती पण त्या दिवशीं कैदी आजारी असल्यामुळें काम चाललें नाहीं. आतां २२वी तारीख नेमिली आहे.

मे. रतनजी जामासजी साहेब मोगलाईंतील सदर तालुकदार व मे. दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. ई. यांचे बंधू आजारी असून हवा पालटण्याकरितां एथें आले आहेत.

सर्जन मेजर जे ला साहेब स्यानिटरी कमिशनर विलायतेस रजेवर आहेत त्यांनां तीन महिन्यांची तिकडे जास्ती रजा स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं दिल्याविषयीं रेसिडेन्सी आर्डर मध्यें लिहून आलें आहे.

निजाम स्टेट रेलवेविरुद्ध जे दावे असतील ते सर्व सिकंदराबादचे क्यांटनमेंट माजिस्त्रेटचे कोर्टांत चालावे असें निजाम सरकारचे संमतानें रेसिडेंट साहेबांनीं जाहीर केलें आहे.

मेडिकल स्कूलाची परिक्षा देऊन वऱ्हाडांतील आस्पिटल असिस्टंटच्या जागेस ६ इसम लायक ठरले व त्यांनीं एक वर्ष हैदराबादेस रेसिडेन्सी डिस्पेन्सरी मध्यें शिक्षण मिळवावें असा त्यांस हुकूम झाला आहे त्यांचीं नावें:—

इंग्लिश व मराठीमध्यें पास.

१ एम अब्दुल लतीफ

२ नूरमहंमद

३ महंमद याकुब

फक्त देशभाषेंत पास.

४ फाजील उदीन.

५ महंमद अबदुल रजाक

६ शेखबनू

७ राजाराम

हिंदुस्थान सरकारानें अपराधी वर्गाविषयींचा सन १८७१ चा आक्ट २७ बरहुकुम वऱ्हाडाकरितां नियम केलेआहेत त्यांत असें लिहिलें आहे कीं सदर्हु आक्टप्रमाणें नोंदणी बुकांत दाखल असलेला कोणी मनुष्य अगर कैदेंतून निघालेला मनुष्य पासाशिवाय कोठें जातो आहे असा पोलिसास, किंवा जागल्यास, किंवा कोणा जमीनीच्या वहिवाटदारास आढळेल तर त्यानें तात्काळ त्या विषयी जवळच्या पोलीस स्टेशनावर खबर द्यावी; तसें नकेल्यास पिनलकोडचें कलम १७६ चे प्रथम भागाप्रमाणें ते गुन्हेगार आहेत असें समजलें जाईल.

नोटिस.

राजश्री लाधूराम वल्लद पनराज मारवाडी रहाणार मूर्तिजापुर जिल्हे उमरावती यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, मौजे हिरपुर एथील दुकानांतील तुह्मी पातीदार असून तुह्मी घेतलेला पैसा सदर्हू दुकानच्या वह्यांत आपले नवकरीबद्दल रुपये ५०० अक्षरी पांच शें प्रमाणे जमा केले तेव्हां तुह्मी नवकर नसून पातीदार असतांनां ठहराव झाल्याप्रमाणें खर्चाकरितां रुपये घेऊन आपले नावानें लिहून घेण्याचें आहे. तसें न करितां आपले नवकरी बदल रुपये जमा करून खर्च खाते नावें लिहिले हें बरोबर केलें नसोन खोटा जमाखर्च केला व दुकाना पैकीं कागद पत्र सर्व सामान वगैरे आह्मास समजाऊन दिला नसून तुमचे नोटिशीवरून असें समजतें कीं, एक वही तुह्मापाशीं आहे. तेव्हां दुकानांतील हिशोब वगैरे आह्मास तुह्मापासून सर्व घेणें असोन तुह्माला मागितला असतां दिला नाहीं. व तुह्मी दुकान सोडून निघून गेले याजकरितां हल्लीं तुह्मास नोटिस देण्यांत येते कीं, सदर्हू नोटिस दिल्याचे तारखेपासून एक महिन्याचे आंत तुह्मी आह्मापाशीं येऊन दुकानाचा हिशोब व कागद पत्र व सामान सोनें चांदी वगैरे चा व्यवहार समजाऊन देऊन सर्व सफाई करावी. अगर आपण येऊन हिशोब वगैरे समजाऊन सफाई न केल्यास तुमचे वर कायद्या प्रमाणें सरकारांत फिर्याद करण्यांत येईल. कळावें. तारीख ७ माहे आक्टोबर सन १८७९ इसवी.

( सही ) लक्षीमणदास रामरतन

दुकान हिरपुर

दस्तुर रामरतन.

## वर्तमानसार

चीन देशांत लढाऊ सामानाची तयारी चालली आहे. असें ह्मणतात कीं रशियाचे शिरजोरपणाचा त्यांनां धाक आहे व त्यांच्याशी लढाई करण्याचा चिनी लोकांस प्रसंग येईल.

आसाम प्रांतांत ६७ मैल रेल्वे करण्याविषयीं विलायत सरकारानें परवानगी दिली.

नवानगरच्या जाम साहेबानीं कांहीं गावांच्या आपल्या हद्दीविषयीं मुंबई सरकारानें केलेल्या ठरावावर विलायतेस अपील केलें होतें तिकडून लिहून आलें कीं या कामांत हात घालण्यास आह्मांस कारण दिसत नाहीं.

दक्षिण हिंदुस्थानांत वैनाद ह्मैसूरकडे सोन्याच्या खाणींचें काम चालू आहे व त्यांत चांगला फायदा होईल असें अनुभविक लोकांचें मत पडल्यावरून नवीन कंपन्यांची त्या कामाकरितां उभारणी झाली आहे असें कळतें.

मुंबईचे गवरनर सर रिचर्ड टेंपल साहेब ९ वे तारखेस कराचीकडे गेले.

बारोनेट सर जमशेटजी जिजीभाई यांचे बंधू मि० कावसजी यांस सिविल सर्विसपैकीं एखादि जागा मिळण्याचा संभव आहे.

तारीख १ एप्रिल सन १८७९ पर्यंत विलायत सरकारास ७,७७,०७,९८,४०० रुपये कर्ज होतें व सन १८७८-७९ सालांत ६,२८,८१,२३० रुपये कर्ज झालें. व त्या वर्षांत कर वगैरे बद्दल उत्पन्न ४,३३.९८,५००,रुपये झाले पैकीं ८०,३१,२६०रु. कर्ज परत दिलें.

मुंबई सरकारावर पांच हजार घोडीं पाठविण्याचें मागणें तारीख १२ रोजीं आलें आणि त्या सरकारानें तेरा दिवसांत सहा हजार घोडीं विकत घेऊन सामान तयार करून पाठवून दिलीं असें कळतें.

सोलापूर व नाशिक येथें नुक्तेच जे दोन इसम पकडले ते वासुदेव बळवंत फडके याचे साथी आहेत ह्मणून आह्मीं मागें प्रसिद्ध केलें होतें, परंतु हल्लीं असें समजतें कीं, त्यांनीं मल्हारराव महाराज माजी गायकवाड यांचे नांवावर कांहीं इसमांस ठकविलें आहे व या गोष्टीचे वहिमावरून त्यांस पोलिसानें अटकेंत ठेविलें आहे.

सोलापुरचे कल्पतरू पत्रांत लिहिलें आहे कीं गाणगापुरास पकडलेल्या वासुदेव बळवंत फडक्या खोटा आहे सबब खरा वासुदेव बळवंत फडक्या जो पकडून देईल त्यास ५०० रुपये इनाम दिलें जाईल ह्मणून हैदराबादेस जाहिरनामे लागले आहेत असें आमचा एक मित्र आह्मांस कळवितो.

जनरल राबर्ट साहेबांनीं काबुलास जाहिरनामा पाठवून कळविलें आहे कीं इंग्लिश सरकारची फौज काबूल शहर हस्तगत करण्याकरितां येत आहे याजकरितां जे निरुपद्रवी लोक आहेत व ज्यांनीं रेसिडेन्सीवर हल्ला करण्याचे व शहर आणी रेसीडेन्सी लुटण्याचे कामांत कोणत्याही प्रकारें आपला हात ठेविला नाहीं त्यांनीं आपला स्वतांचा व मुला लेकरांचा बचाव करण्याची तजवीज पाहावी. हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर काबूल शहरांत व काबुलाचे जवळपास हत्यारबंद लोक आढळतील ते ब्रिटिश सरकारचे शत्रू समजले जातील.

गेले महिन्याचे २९ वे तारखेस ब्रिटिश फौजेनें डाका शहर पुन्हा आपले हस्तगत करून घेतलें.

राशियन लोकांनीं डेनजिल्टेयगा गांवावर बारांचा भडीमार सहा तास करून तुर्कोमन लोकांचा मोड केला ही गोष्ट खरी आहे असें लं० च्या तारेवरून समजतें. त्या गांवांत पंधरा हजार तुर्कोमान लोक, ५००० बायका व शिवाय मुलें होतीं. अंधार पडे तोंपर्यंत लढाई चालून बाहेरची बाजू राशियन लोकांनीं घेतली. अंधार पडल्यावर ते लोक रात्रीं पळून गेले.

पंजाबांत रावी नदीच्या कांठीं ता० १९ सप्टेंबर रोजी मि० हारीस हे शिकारीस गेले असतां त्यांनीं १४ फूट १० इंच लांब व मध्यें घेर ६ फूट असा मोठा मगर पाहिला आणि त्यास गोळी घातली. तो जखमी होऊन पाण्यांत बुडी मारून दुसऱ्या बाजूस जाऊन पडला. इतक्यांत हे साहेब होडींत बसून जाऊन त्याचा पत्ता लावून पुनः आणखी पाचं गोळ्या मारल्या तेव्हां त्याचा निकाल झाला. याचें पोट चिरलें तेव्हां त्यांत एक अगदी लहान मूल व दुसरा एक सहा वर्षांचा मुलगा निघाला. हे दोनही प्राणी त्यानें गिळले होते. त्यांचीं डोकीं व अवयव कांहीं कुजलीं होतीं.

नवीन सिविल सर्विसच्या नियमांप्रमाणें तीन उमेदवारांचीं नावें सुचविण्याविषयीं हिंदुस्थान सरकारचा हुकूम मुंबई सरकारास आला आहे व ते एक हिंदु, एक पार्शी व एक मुसलमान अशी निवड करणार आहेत

वासुदेव बळवंत फडके याची चवकशी आणखी एक महिना होत नाहीं; परंतु त्याचे बंधु यांणीं हत्यारें चोरटे लोकांस पुरविल्याबद्दलच्या खटल्याची चवकशी लवकर होणार आहे असें पू. अ. कर्त्ते ह्मणतात.

नुक्त्याच पडलेल्या हिंदुस्थानांतील दुष्काळ संबंधानें चवकशी करण्याकरितां सरकारानें एक कमिशन नेमलें होतें त्यांत मि० केअर्ड यांची विलायतेहून नेमणूक केली होती. सदर्हू विषयाचे संबंधानें त्यांनी आपलें मत प्रसिद्ध केलें आहे त्यांत ते असें ह्मणतात कीं, मनुष्य उत्पत्तीचे मानानें उत्पन्न कमी होत चाललें आहे. त्यास ते असा उपाय सुचवितात कीं. सरकारचा खर्च पुष्कळ कमी करावा. कलाकौशल्याची जास्त प्रस्टती व्हावी व शेत सारा कमी करून त्या योगानें शेतकीस उत्तेजन द्यावें.

रंपा येथील दंग्याचा अद्याप शेवट लागत नाहीं. त्यांतील प्रमुख लोक बिलकुल सांपडत नाहींत व तिकडे पाठविलेल्या सैन्यांत तापाचा अजार फार सुरू होऊन पुढील महिन्यांत बिलकुल सैन्य ठेवतां येणार नाहीं असें ह्मणतात.

---

## भुइमुगाची लागवड.

भुइमुगाची आपल्या देशांत अधिक लागवड व्हावी, तीस उत्तेजन यावें व परदेशांत या जिनसेचा बराच खप असल्यामुळें या जिनसेचा निर्गतीचा व्यापार वाढावा ह्मणून या जिनसेचे लागवडीचे संबंधानें हिंदुस्थान सरकारानें एक रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध केला आहे. या रिपोर्टांत आपल्या देशांत भुइमुगाची कोणकोणत्या देशांत किती लागवड होते व एकंदर लागवड किती होते. प्रत्येक एकर जमीनींत सरासरी किती भुइमुग पिकतो त्याचे लागवडीस कोणकोणत्या प्रांतांत जमीन पाहिजे तशी आहे, कोणत्या उपायानीं त्याचें पीक वाढेल, परदेशांत या जिनसाचा कोणत्या ठिकाणीं खप आहे, त्याचे लागवडीपासून कोणत्या लोकांस हल्लीं फायदा होत आहे व आपल्या देशांतून हल्लीं हा विवड किती बाहेर जात आहे अशा कित्येक गोष्टींची माहिती देऊन शेवटीं परदेशांत माल पाठविणारे व्यापाऱ्यांनीं या गोष्टीकडे लक्ष दिल्यास व त्याचा फायदेशीर रीतीनें परदेशांत खप होतो असें दिसल्यास आपल्या देशांत भुइमुगाची लागवड जास्त होण्यास हरकत नाहीं असें लिहिलें आहे. व या गोष्टीकडे आमच्या देशांतील व्यापाऱ्यांचें लक्ष जावें ह्मणून सरकारानें हा रिपोर्ट प्रसिद्ध केला आहे. आमचे वाचकांचे माहितीकरितां आह्मीं या रिपोर्टांतील कित्येक गोष्टींची थोडी माहिती खालीं दिली आहे.

भुइमुगाचें तेल सर्व देशांत जाळण्याला व खायाला फार चांगलें व उपयोगी आहे. तेल काढल्यानंतर जी खळ राहते ती गुरांस खाण्यास व शेताच्या खतास फारच उपयोगी पडते. गवरनर जनरल साहेब यांचें मत असें आहे कीं, दुसऱ्या देशांतून झाडें आणून या देशांत लावून त्याच्या शेंगा कोणत्या प्रकारच्या होतात ही परीक्षा पहाण्यापेक्षां जो (भुइमुग) एथें होता त्याच्याच लागवडीस उत्तेजन देणें फारच चांगलें आहे. मद्रास इलाख्यांत तर याची लागवड फारच होते, परंतु त्याचा तेथें योग्य उपयोग होतोसें दिसत नाहीं. १८७५ व १८७६ सालांत मद्रास इलाख्यांतून परदेशीं हा पदार्थ सुमार २९,७७४ रुपये किमतीचा गेला व मुंबईहून १३,८४५ रुपये किमताचा गेला. या दोहोंच्या मानानें बंगाल्यांतून विशेष गेलासें दिसत नाहीं. ब्रिटिश ब्रह्मामध्येंही याची लागवड थोडीच होते.

गवरनर जनरल साहेबांकडून प्रत्येक इलाख्याचे सरकारास त्यांणीं आपल्या इलाख्यांत याची लागवड कितपत होते व त्याचा कितपत उपयोग होतो याची चवकशी करून त्याबद्दल रिपोर्ट करावा व या कामास उत्तेजन येण्यासारख्या जर कांहीं सूचना असतील तर कराव्या. असें लिहून गेल्यावरून स्थानिक सरकारांनीं दिलेली माहिती येणें प्रमाणें:-

मद्रास एथील बोर्ड रेविन्यू कडून याबद्दल जो रिपोर्ट झाला त्याचें तात्पर्य.—या इलाख्यांत लागवडीच्या एकंदर १९ कोटि एकर जमीनींपैकीं फक्त ३४,६३२ एकर जमीनींत याची लागवड होते. समुद्रा जवळची भुसभुसीत जमीन किंवा नदी किनाऱ्याची जमीन याच्या लागवडीस फारच चांगली आहे.

मुंबई एथील रिपोर्ट-—सिंध प्रांतांत याची लागवड मुळींच होत नाहीं. पुष्कळ नेटिव लोक याचा पुष्कळ प्रकारचा उपयोग करितात, मुंबई इलाख्याच्या उत्तर भागांत तर याची लागवड फारच थोडी होते व तेथील जमीनही भुइमुगाच्या लागवडीस चांगली नाहीं. नाशीक जिल्ह्यांत याची लागवड बरीच होते व त्यापैकीं अर्धे उत्पन्न मुंबईस पाठविलें जातें व अर्धे तेथील लोकांच्या निर्वाहास लागतें. खानदेशांतील जमीन चिवट असल्या कारणानें तींतील सर्व उत्पन्न शेतकऱ्यांस प्राप्त होत नाहीं. पुणे प्रांतांतील लोकांस जर याच्या व्यापारापासून बरेंच उत्पन्न होतें असें समजलें तर हल्लीं होतो त्यापेक्षां तेथें भुइमूग पुष्कळ होईलसें दिसतें. सातारा जिल्ह्यांतही याचें बरेंच उत्पन्न होतें.

याप्रमाणें एकंदर मुंबई सरकारच्या ठरावाचें तात्पर्य असें आहे कीं, हल्लीं या इलाख्यांत लोकांच्या बेगमी पुरताच सरासरी भुईमुग उत्पन्न होतो परंतु जर याच्या व्यापारांत फार फायदा आहे असें लोकांच्या नजरेस येईल तर याची लागवड फार वाढेल यांत संशय नाहीं. बंगाल इलाख्याच्या.दक्षिण भागांत याचें उत्पन्न फारच थोडें होतें. वायव्य प्रांतांत लोक आपल्या बागांत भुइमूग लावितात. याचे मळे कोठेंही आढळत नाहींत. व यामुळें त्याचें उत्पन्न या प्रांतांत फारच थोडें होतें. पंजाब प्रांतांत याचें उत्पन्न थोडें होतें. तेथील लोक याचा फक्त खाण्यास ऊपयोग करितात व त्याकरितां मुंबई व ग्वालेर प्रांतांतून हा माल तिकडे बराच जातो. याचें तेल निघतें हें तेल तेथील लोकांस ठाऊकच नाहीं. तेथील जमीनदार नवीन पदार्थाच्या लागवडीला अगदीं विरुद्ध असल्या कारणानें या पदार्थाची लागवड त्या देशांत पुष्कळ होईलसें दिसत नाहीं.

मध्य प्रांतांतही पंजाबप्रमाणेंच याची लागवड थोडी होते. तेथील लोकांसही याचें तेल काढणें ठाऊक नाहीं व तेही लोक याचा फक्त खाण्याकडे उपयोग करितात.

ब्रिटिश ब्रह्मा व आसाम या प्रांतांतही याची लागवड थोडी होते व तेल मुळींच निघत नाहीं. ह्मैसूर प्रांतांत व बंगलोर व कोलार खेरीज करून याचें उत्पन्न मुळींच होत नाहीं.

१७७७-७८ सालांत वऱ्हाड प्रांतांत अमरावती, अकोला व बुलढाणा येथें पुष्कळ एकर जमीनींत याची लागवड केली होती व तेथून मुंबईस व्यापाराकरितां हा जिन्नस बराच गेला. परंतु एकंदरींत तेथील जमीन याच्या लागवडीस योग्य नाहीं व डुकरांचाही तेथें फार उपद्रव आहे. अजमीर प्रांतांत याची लागवड मुळींच होत नाहीं.

मुंबई, मद्रास, वऱ्हाड व ह्मैसूर खेरीज करून सर्व हिंदुस्थानांत १,१२,००० एकर जमीनींत भुइमुगाची लागवड होते मुंबई इलाख्यांत ७०,३५० एकर जमीनींत याची लागवड होते व मद्रास इलाख्यांत ३४,६३० एकर जमीनींत लागवड होते तथापि मुंबईपेक्षां मद्रास इलाख्यांतून हा जिन्नस परदेशांत फार जातो. याचें पीक प्रत्येक एकरास १० हंडरवेट पासून एक टन पर्यंत होतें. उत्तर व मध्य हिंदुस्थानांत याची लागवड तेथील लोकांच्या निर्वाहा पुरतीच होते. मुंबई मद्रास पूर्व बंगाल व ब्रह्म देशांत याची लागवड पुष्कळ होण्यासारखी आहे. याचें चांगलें उत्पन्न असून त्याचा फ्रान्स देशांत फार खप आहे. आफ्रिकेंतून फ्रान्स देशांत हा जिन्नस फार जात असून आफ्रिकेंतील निग्रो लोकांस त्यापासून पुष्कळ पैसा मिळत आहे. सन १८७८-७९सालांत हिंदुस्थानांतून २५४७२ हंडरवेट भुइमुग फ्रान्स देशांत गेला ह्मणजे फ्रान्स देशांत एकंदर जितका हा जिन्नस परदेशांतून गेला त्याचा एक शंभरांश हिंदुस्थानांतून गेला.

ने. ओ.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० १९ माहे अक्टोबर सन १८७९ इसवी. अंक ४१

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळी पुढें दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८३ |
| ,, दुसरे खेपेस | ८२ |

## मुंबई ब्यांक.

अमानत ठेविलेल्या पैशावर व्याजाचे दर.

१२ महिने ठेविल्यास दरसाल दर शेकडा ४ रुपये.

६ महिने ठेविल्यास ( ह्मणजे तारीख १ नोवेंबर पासून ता० ३० जूनपावेतें) [illegible] कोणतेही सहा महिनेपर्यंत दरसाल दर शेकडा ३ रुपये प्रमाणें.

सदर्हू प्रमाणें न ठेविल्यास दरसाल दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याज मिळेल.

तात्पुरची किंवा मुद्दाम व्यवस्था केल्याशिवाय कमी मुदतीपर्यंत अथवा अधिक व्याजानें अमानत पैसा ठेविला जाणार नाहीं.

चालू अमानत पैशाच्या खात्यावर व्याज दिलें जाणार नाहीं.

मुंबई.

तारीख १ आगष्ट सन १८७९ इसवी.

## सन १८८० इसवी साला करितां रोजनिशी.

सन १८८० सालाकरितां जें रोजनिशीचें पुस्तक आह्मी तयार करित आहों त्याच्या नमुन्याचा साऱ्या पूर्वीं इतकाच असून त्यांत पूर्वीं पेक्षां उपयुक्त विषयांची बरीच ज्यास्त सुधारणा करणार आहों. हें पुस्तक येत्या नोवेंबरच्या २५ वे तारखेचे आंत छापून तयार होईल. त्यांत दरसालचे दिनचर्ये संबंधी मराठी तिथी, वार, महिने, सूर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें, सण व त्या संबंधें सरकारी आफिसांस व दिवाणीकोर्टांस असणाऱ्या सुट्या, मौंजी विवाहाचे मुहूर्त, त्याच प्रमाणें इंग्रजी व मुसलमानी वार, तारखा महिने, सण इत्यादिकांचा समावेश केला जाईल. तसेच रेल्वे, तारायंत्र, स्टांप, मनिआर्डर्स, पोस्ट, मुंबईब्यांकेच्या रुळी वगैरे नेहमी जरूर लागणाऱ्या विषय संबंधानें अवश्य तितकी बरीच माहिती दिली जाईल. शिवाय सिव्हिल प्रोसिजर, मुदतीचा, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टांप, कोर्ट फी, पोलिस गाईड डिस्ट्रिक्ट आणि गांवचे पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर इत्यादि अनेक नेहमी जरूर लागणारे कायदा संबंधी उपयुक्त अशी अवश्य तितकी माहिती दिली जाईल. कापीव तुळया, तक्ते वगैरे लांकडांचे घनफूट कसे मोजावे या विषयींची माहिती दिली जाईल. ही माहिती कंत्राटदार व लांकडे खरेदी करणारे लोकांस विशेष फायद्याची होईल. अजमासें २० रुपये दरमहा पगाराचा रोजमोरा कसा चुकता करावा याजविषयींच्या माहितीचें कोष्टक दिलें जाईल. पुस्तकाच्या अखेरीस कोरीं पृष्ठें व जमाखर्चाच्या सदराचेही कागद जोडले जातील. एकंदरींत हरएक प्रकारची होईल तितकी ज्यास्त सुधारणा करण्यांत येईल.

रोजनिशीची आगाऊ किंमत.

रोजनिशी प्रत नंबर १ ब्लॉटिंग पेपरसहित जाड पुठ्ठयानें बांधलेली किंमत अकरा आणे, ट. १ आणा.

नंबर २ साधी जाड पुठ्ठयाने बांधलेली किंमत सात आणे, ट. १ आणा.

नंबर ३ साधी विलायती कापडानें बांधलेली किंमत साहा आणे ट. १ आणा.

वर लिहिलेल्या अन्वयें जी किमत आक्टोबर अखेर आह्माकडे येईल त्या नंबरची रोजनिशी तयार झाल्या बरोबर रवाना करण्यांत येईल. एकदम दहा प्रति घेणारास टपाल खर्च पडणार नाहीं. घेणारानीं त्वरा करावी.

भाऊ गोविंद सापकर.
ज्ञानचक्षूचे मालक.

## बुकसर्क्युलर नंबर ७ सन १८७९

अलीशान रेसिडेंट साहेब बहादुर यांनीं मुलूख अमानी हैदराबाद यांतील सर्व दिवाणी कोर्टांचे न्यायाधीश यांचे माहितीकरितां "दिवाणी मुकदम्याचे चौकशी संबंधी वहिवाटीचें टिपण" याजबद्दल ५६ कलमांचें एक सर्क्युलर नुक्तेंच प्रसिद्ध केलें आहे त्याचें मराठी भाषांतर मे० जुडिशियल कमिशनर साहेब बहादूर यांनीं छापविलें त्याच्या प्रति आमचेकडे विक्रीस आहेत. किंमत चार आणे. बाहेरगावीं एक आणा टपाल खर्च पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## सुईण

किंवा.

**प्रसूतिं आणि तत्संबंधी अज्ञानमूलक व अनर्थकारक परिपाठ.**

या नावाचें नवीन पुस्तक मिसेस रेबेका सिमीयन ग्रांट मेडिकल कालेजांत पास झालेली सुईण यानीं तयार केलें आहे. त्याच्या प्रति आह्माकडे विक्रीस आल्या आहेत. हें पुस्तक कुटुंब वत्सल सर्व लोकांनीं संग्रहास बाळगण्याजोगें आहे. याची किंमत सहा आणे बाहेरगावीं नेणारास टपाल खर्चाबद्दल एक आणा अधिक पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## नोटिस.

बनाम सखारामजी व तानबा व नोकर वहिवाटदार माधोबा वल्लद नारायणजी लाड राहणार कुरूम तालुके मूर्तिजापुर जिल्हा उमरावती यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, आह्मीं तुह्मांस वऱ्हाडसमाचार पत्रांत नोटिस दिल्याप्रमाणें तुह्मी आमचे हिशाचा आजपर्यंत कांहीं एक निकाल केला नाहीं. तरी ही नोटिस पावेल दिवसापासून आठ दिवसांचे आंत आमचे हिशाचा निकाल करावा. तुह्मांस नोटिस दिल्याप्रमाणें तुह्मीं कोणतेही प्रकारचा व्यापार बंद ठेवला नाहीं सबब तुह्मावर दिवाणी दावा करणें जरूर आहे. आमचे हिशाचा निकाल होईपर्यंत खालीं लिहिलेल्या मालास तुह्मीं बिलकूल हात लावूं नये. त्या मालाचा तपसील येणें प्रमाणें:—

लक्ष्मण वल्लद पिलाजी बारी याचे घरीं जवारी खंडी पंचवीस २५, गंभिरजी वल्लद आंबुजी जवारी खंडी १५ पंधरा, हंबीरजी वल्लद रामजी टेण्या जवस खंडी पंचवीस २५, येगाजी वल्लद मनाजी गहु खंडी नऊ ९, जनाजी अमले जवस खंडी पंधरा १५, खाजगी राहते घरांतील जवारी ३० तीस खंडी व तीळ खंडी दहा १०, सरकी खंडी १००, गूळ खंडी दहा १०, कपडा विकण्याचा ७०००० चा, किराण्याची दुकान सुमारे अडीच हजाराची वगैरे १५ लाख. येणें प्रमाणें माल सदर्हू ठिकाणीं आहे त्याचा तुह्मी विक्रा किंवा खाजगी कारितां उपयोग करूं नये. विक्रा केल्यास आमचे सल्यानें विकून त्याची किंमत हिशेरसी होईपर्यंत अमानत कोणा सावकाराजवळ ठेवावी. असें न झाल्यास त्या मालाची हल्लीच्या भावानें किंमत धरून दिवाणींत दावा करून खर्चासुद्धां पैसा भरून घेतला जाईल. कळावें तारीख ११ माहे आक्टोबर सन १८७९ इसवी.

( सही ) बापु वल्लद इयापराजी लाड
राहणार कुरूम तालुके
मूर्तिजापुर जिल्हा उम
रावती दस्तूर खुद.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

मूर्तिजापुराहून— वि. वि. - हस्त नक्षत्राचा पर्जन्य १५ दिवसपर्यंत दररोज पडत होता त्यामुळें कांहीं ठिकाणीं ज्वारीचे पिकास थोडा धक्का बसला ह्मणून लोक बोलत आहेत. चित्रापासून मात्र पर्जन्यानें उघाडी दिली आहे.

ता. १२ रविवार मिनहू रोजीं मे० तहशिलदार साहेब यांनीं सरकारी शाळेंत दवाखान्याच्या वर्गणीकरितां सभा भरविली होती, परंतु गावांत कियेक बेबनाव असल्यामुळें बरेच संभावित गृहस्थ सभेस आले नव्हते तत्रापि वर्गणी १२६ रुपये त्या दिवशीं जमली. आणखीही जमविण्याचा त्यांचा हेतु आहे. त्यांनां एथील मास्तर व रा. रा. विश्वनाथ आत्माराम भडंग यांची सार्वजनिक कामांत बरीच मदत आहे. रा. रा. वामन गोविंद जमादार यांचा विचार सदर्हू सभेस येण्याचा असून वर्गणीही बरीच देण्याचा मानस होता, परंतु आजपर्यंत ते अशा कामांत कधीं आले नसून त्यांनां कोणी बोलाविलें नाहीं ह्मणून सदरील दिवशींही बोलाविलें नाहीं असें ऐकतों. त्यांचा खरोखरी मानस वर्गणी देण्याचा असल्यास त्यांनीं जनाब डे. क. साहेब यांस अर्ज केल्यास अगर कमिटीचे लोकांस कळविल्यास साहेब बहादूर कदाचित त्यांची देणगी स्वीकारतील असें कळतें.

एथील मराठी शाळेचें काम हल्लीं बरेंच चाललें आहे. स्कूलकमेटीनें शाळेंत मुलें जास्ती झाल्याचें पाहून सहा महिने पावेतों आपले पदरचे खर्चानें एक ६ रुपये दरमहाचा असिस्टंट दिला होता त्याची मुदत सप्तंबर १८७९ अखेर पुरी झाली तत्रापि सरकारांतून आणखी कांहीं दिवस असिस्टंट मिळण्यास अवकाश आहे असें पाहून येत्या डिसेंबर १८७९ अखेर सदरील असिस्टंटचा पगार आणखी देण्याचें कबूल केलें आहे. एथील स्कूलकमेटींत ३ मेंबर आणि एक प्रेसिडेंट आहेत त्यापैकीं प्रेसिडेंट साहेब यांचें लक्ष्य या कामीं मेंबराप्रमाणें नाहीं त्यामुळें वाईट वाटतें ते जर या कामीं लक्ष पुरवतील तर चांगलें होईल.

जमादार यांजवरील फौजदारी मुकदमा रा. रा. रामराव गोविंद ए० अ० क० यांचे कोर्टांत असलेल्याचा निकाल झाला. मुनसफ साहेबांनीं रा. रा. दिनकर गंगाधर वकील यांचे योग्य तक्रारीवरून दावा काढला असें ह्मणतात. सदरील असिस्टंट साहेब यांचे कोर्टांत योग्य न्याय होत असल्याबद्दल सर्व लोक बोलतात. त्यांजकडे आणखीही तालुक्याचें काम आल्याचें ऐकून सर्वांस आनंद झाला.

एथील लायब्ररी अगदीं मोडकळीस आली आहे कारण रोख पैसे शिल्लक नसून वर्गणीदारांकडे बरेंच येणें आहे परंतु ते देत नाहींत. शिवाय नवीन कांहीं पैसा जमविण्याचा विचार होत नसल्यामुळें कदाचित बंद होण्याचा संभव दिसतो. त्यास गावांतील सभ्य लोक लक्ष पुरवतील तर बरें होईल. कळावें बहुत काय लिहिणें लोभ असावा ही विनंती.

आपला
बातमीदार

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसीः—

वि. वि. मेहेरबानगी करून पुढील मजकुरास येत्या अंकीं जागा द्याल अशी अशा बाळगून आहो.

अकोट एथें रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं पाऊस ही चांगला उत्तम रीतीचा आहे. अकोट एथें प्रानसुक हरलालजी बजाज हे नामांकित सावकार होऊन गेले. हल्लीं त्यांचे दुकानीं वहिवाटदार रामचंद्र लाला परवार हा गुमास्ता आहे. त्यानें तरी मालकाचें मागें काम चांगलें चालविलें आहे.

एथें एक पोटपाडीचें काम गुप्त रीतीनें चाललें आहे. गुमास्ते मालकाचे सुनेसी यथेच्छ वर्ततात. व चार महिन्यांचा गर्भ राहिला. तो बेभाट मिटण्या साठीं औषध पाण्यास दोन अडीचशें रुपये खर्च झाला. हा मजकूर आपण प्रसिद्ध केल्यानें कदाचित गर्भपात होणार नाहीं. व मूल किंवा मुलगी जन्मास येईल ती पुण्याची गोष्ट होईल ह्मणून प्रसिद्ध व्हावी. कळावें तारीख ११-९ सन १८७९ इसवी.

महाजन
अकोटकर.

मेहेरबान वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

पहिले वर्गांतील विद्यार्थी सरकारी मराठी शाळा असेगाव तालुके अकोट यांजकडून विनंती करण्यांत येते कीं, तुमचें पत्र नंबर २९४ ता. १४ आगष्ट सन १८७९ चें आलें त्या बरहुकूम आह्मीं सर्व विद्यार्थी मिळून ६॥ साडेसहा रुपये वर्गणी जमवून तुमचे लिहिल्याप्रमाणें ता. अकोट एथें सदर्हू रुपये काल रोजीं भरले व तेथील पत्र तुह्मांस घेतलें आहे तें या सोबत अस्सल पाठविलें आहे.

सदर्हू वर्तमानपत्राची वर्गणी आह्मीं पहिले वर्गांतील सर्व विद्यार्थी आहो तरी वर्तमान पत्रावर नाव आह्मां पैकीं रा. रा. विश्वासराव टिकाराम पाचडे पाटील याचेंच लिहित जावें.

आमच्या शाळेंतील दुसऱ्या वर्गांतील विद्यार्थ्यांनींही आमचे प्रमाणेंच वर्गणी जमवून परतवाडा एथील वऱ्हाडमित्र सुरू केलेलें आहे तर मेहरबानी करून हे दोन्ही मजकूर आपण आपल्या येत्या अंकीं प्रसिद्ध करण्याची मेहरबानी कराल तर आमच्या सारख्या खेड्यापाड्यांतील कियेक विद्यार्थ्यांस उत्तेजन येऊन आणखीही कियेक ठिकाणीं अशीच सुरवात झाली असतां आह्मां वऱ्हाडवासी विद्यार्थ्यांस मोठें भूषणास्पद असून आह्मांस सरकारोंन दिलेल्या हल्लींच्या दयाळु हेड मास्तरासारख्या दुसऱ्या हेड मास्तरास ही भूषणास्पद आहे. मेहेरबान साहेबास कळावें ता. ४ माहे आक्टोबर सन १८७९ इसवी.

विश्वासराव टिकाराम पाचडे विद्यार्थी शाळा असेगाव

सूर्यभान बदुजी देशमुख शाळा असेगाव.

सिवराम सोनाजी कोकाटे विद्यार्थी शाळा असेगव.

---

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

पत्रकर्ते महाराज आपल्या येत्या अंकीं मजकडून आलेल्या चार ओळी छापून प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

थुगाव हें गाव वस्तीनें मोठें असून परगणा आहे. एथें पूर्वीं तहशिली होती. हल्लीं पोस्ट शाळा वगैरे सरकारी आफिसें आहेत. याचप्रमाणें जर या गावास सब रजिष्टर झाल्यास गावास जास्ती शोभा येणारी आहे व अशी सोय झाल्यास एथील सावकारांस व आसपास एक मैलापासून तर ६ मैलांपर्यंत जीं कांहीं पुष्कळ गावें आहेत तेथील लोकांस रजिष्टर करण्यास उमरावतीस जाण्यास जी तकलीफ होती ती दूर होऊन शिवाय सरकारचा फायदाही पुष्कळ होईल. यावर दयाळु सरकार लक्ष पुरवितील अशी आशा बाळगून आहे.

महाराज, या गावीं सरकारी शाळा स्थापन होऊन ११ वर्षे झाली सरासरी ४ वर्षांपूर्वीं ही शाळा इतकी वाईट स्थितींत आली होती कीं. दररोज ४–५ मुलें येत असत परंतु नवीन हेडमास्तर आल्यापासून शाळा सुधारली आहे. ह्मणजे शाळेंत ७५ मुलें आहेत. शिवाय या मास्तरानीं श्रम करून मुलांचा अभ्यास वाढविला आणि हिंदुस्थानी असिस्टंट व मराठी असिस्टंट मिळविला तेव्हां असे मेहनती मास्तरास वरिष्ठ अधिकारी बदली देतील अशी आशा आहे कळावें तारीख १०—१०—७९ इसवी.

एक

थुगावकर.

---

# वऱ्हाडसमाचार.

मिति आश्विन शुद्ध ४ शके १८०१

---

## रशियन व इंग्लिश.

अफगाणी लोकांबरोबर दुसरी लढांइ सुरू झाल्यापासून सर्व लोकांचीं मनें धागधूग करूं लागलीं आहेत कीं काय होईल कोण जाणे. इकडे सरकारानें तर लढाईविषयीं कडीकोट तयारी चालविली आहे. वस्तुत: पाहूं गेलें तर इंग्रज सरकाराचे मानानें काबूलचें राज्य पाहिलें तर त्याचे पासंगासही पुरणार नाहीं असें असतां लोकांचीं मनें धागधूग कां करतात व सरकारानें अशा सामान्य शत्रूबरोबर युद्ध करण्यास एवढ्या झपाट्यानें कां तयारी चालविली आहे असा प्रश्न सहज निघतो.

काबूलचें राष्ट्र ज्याला जरी इंग्रजांचे राष्ट्राच्या मानानें सामान्य आहे तरी काबुली लोकांस रशियन लोकांचें पाठबळ आहे अशी सर्व लोकांस कांक्षा आहे तर ही कांक्षा केवळ निरर्थक आहे असेंही ह्मणवत नाहीं. कारण कीं रशियाचे वर्तणुकीविषयीं एकंदरीनें विचार केला असतां असें दिसतें कीं त्याचा हिंदुस्थानाविषयीं डोळा आहे. पूर्वीं त्यानें काबुलास मिशन पाठविल्यामुळेंच इंग्रज सरकारास काबूलचे लोकांबरोबर लढाई करणें भाग पडलें व आतां तरी इंग्रज लोकांचे काबुलांतील एनव्हायची कत्तल होण्यास आंतून रशियाच कारण आहे असें ह्मणतात. शिवाय इंग्रजांची व आफगाणी लोकांची लढाई सुरू आहे अशा संधीस रशियानें आपलें मोठें सैन्यही आफगाणिस्थानचे वरील अंगास आणिलें आहे. तेव्हां त्याच्या मनांत कांहीं तरी चलबिचल करणें आहेसें दिसतें.

रूसचे लोकांमध्यें आणि इंग्रेज लोकांमध्यें युद्ध जर युरोपांत सुरू झालें असतें तर आपणास इतका विचार करण्यास नको होता.' ह्या उभयतमांध्यें कदाचित इकडे सामना झालाच तर त्यांत आपल्या हिंदुस्थानच्या बऱ्या वाईटाचा संबंध आहे त्याकरितां आपणास त्याबद्दल विचार करणें जरूर आहे.

आमचें मत असें आहे कीं इंग्रज सरकारास आपल्या देशाच्या हातून ह्या वेळीं जितकी मदत होईल तितकी त्यानें करावी. कारण असें करणें हें एक प्रकारें त्यांचें कर्तव्यकर्म आहे व दुसरें, असें केल्यापासून आपले अनेक हेतु साधणार आहेत.

ह्या वेळीं सरकारास साह्य देणें हें आपलें कर्तव्यकर्म कसें? ही गोष्ट साहजिक रीतीनें आमचे वाचकांचे लक्षांत येण्यासारखी असल्यावरून तिजबद्दल आह्मी चर्चा करीत नाहीं, परंतु या वेळीं सरकारास मदत करण्यामध्यें अनेक हेतु साधणार आहेत असें जें आह्मी ह्मटलें तें कसें याविषयीं मात्र थोडेंसें विवेचन करतों.

एक तर ही लढाई दिसण्यांत अफगाण लोकांबरोबर आहे आणि ते लोक प्राचीन कालापासून आपले द्वेष्टे आहेत याकरितां त्यांचा होईल तितका सूड घेणें हें उचित आहे. कियेक वेळां त्या देशचे लोकांनीं आपणावर हल्ले करून आपले लाखो लोक विनाकारण मारून टाकिले आहेत. परंतु आपले लोकांचे हातून त्या लोकांस मिळावें तसें अद्याप शासन मिळालें नाहीं. याकरितां आतां सूड घेण्याची चांगली संधी आहे तिचा आपण फायदा करून घेतल्याखेरीज कधीही राहूं नये.

दुसरी गोष्ट अशी कीं, रूस लोकांनीं इंग्रजाशी साम्ना केल्यास ती गोष्ट आपणास इष्ट होणार नाहीं. आतां कोणी अशी पृच्छा करतील कीं, इंग्रज हेही परकीय लोक आहेत व रूस लोक हेही परकीयच आहेत तर एक राष्ट्राचा अंमल जाऊन दुसऱ्या राष्ट्राचा झाला तर आपणास काय होय? आपली स्थिति इसाफनीतीतील शहाण्या गाढवाचे गोष्टीप्रमाणें आहे. आपले स्वतांचें जर राज्य असतें तर रशिया आपल्या देशावर हल्ला करणार आहे ह्मणून आपणास काळजी वहाण्यास पाहिजे होती. या वेळेस आपणास रिकामी उठाठेव पाहिजे कशाला?

यावर आमचें ह्मणणें असें आहे कीं, खरी पतिव्रता जी स्त्री आहे तिजला स्वपती बरोबरच विलास करणे इष्ट असतें. परंतु कर्मधर्म संयोगानें स्वपति जर नष्ट झाला किंवा हीन झाला आणि यामुळें जर पराचे अंकित रहाण्याचा समय आला तर अशा स्त्रीनें कसें वर्तावें ह्या गोष्टीचा आपण विचार करावा.

कोणीही समंजस पुरुष ही गोष्ट कबूल करणार आहे कीं, एखादे साध्वीस जर वरील दशा प्राप्त झाली तर तिनें दारोदार जाण्याची इच्छा धरितां ज्या पुरुषाबरोबर पतीप्रमाणें बरेच दिवस काढिले त्याच पुरुषाबरोबर तो आपणावर राजी राहून मुक्त करीपर्यंत दिवस कंठावेत हें युक्त आहे. 'एकोदेव: केशवो वा शिवो वा' कारण तिच्या मनानें पहिला पुरुष वाईट आहे असें घेऊन ती जर दुसऱ्याची इच्छा करील तर तो तरी तिच्या मनासारखाच मिळतो किंवा नाहीं ही कांक्षा आहेच. व तो मनासारखा न मिळाला ह्मणेज तिसरा चवथा असें करण्यांत दुर्दशा मात्र होणार आहे.

हीच स्थिति सांप्रतकाळीं आपल्या लोकांची आहे. इंग्रज लोकांमध्यें यत्किंचित वैगुण्य आहे असें कोणा कोणास वाटतें. येवढ्याच कारणावरून जर दुसऱ्याची इच्छा केली आणि तो पहिल्याच्या शतपट जुलमी, अव्यवस्थित, व बुभुक्षित असा निघाला तर मग कसें? आणि रशिया तसा आहे याविषयीं त्याचे पवाडे जगजाहिर झाले आहेतच. शिवाय दुसरी गोष्ट अशी कीं आज आपल्या हजारो लोकांचा बळी देऊन हा देश काबीज करण्याची इच्छा रशिया जो करीत आहे तो केवळ परमार्थ बुद्धीनें थोडीच करीत असेल. इंग्रज लोक ह्या देशामध्यें येऊन सरासरी शंभर वर्षे जरी झालीं तरी त्यांची तृष्णा जितकी मंद व्हावी तितकी अद्याप झाली नाहीं. तथापि पूर्वींचे त्यांच्या कृतींत आणि आतांचे कृतींत जमीन अस्मानचें अंतर पडलें आहे. आतां त्यांस आपण ह्या देशाचे राजे आहोत असें वाटत आहे आणि त्यामुळें ते अधिक स्वस्थ होत चालले आहेत. परंतु या वेळींच जर आणखी दुसरें एकादें राष्ट्र गडबड करूं लागलें तर आपली "पुनरपि जननं पुनरपि मरणं" ही अवस्था होणार आहे.

आणखी अशी गोष्ट आहे कीं इंग्रेजांचे आणि आपले बरेच दिवस संघट्टण झाल्यामुळें त्यांस आपण खरोखर रीतीनें ओळखूं लागलों व तेही आपणास खरोखर रीतीनें ओळखूं लागले आहेत. आपली दिवसेंदिवस खात्री होत चालली आहे कीं ह्या राष्ट्राची शैली पायाशुद्ध असल्यामुळें आपले हक्क आपणांस आज नाहीं उद्या तरी हे देतील; व त्यांसही असें वाटूं लागलें आहे कीं हिंदु लोक केवळ इतर खंडांतील त्यांचे प्रजेप्रमाणें नाहींत. ह्यांस आपल्या बरोबरीस चढविण्यास हरकत नाहीं. सारांश त्या लोकांशीं आपले लोकांचें बरेच रीतीनें हल्लीं सौजन्य वाटूं लागलें आहे. ह्मणून त्यांचाच दृढ सहवास आतां आपणास पाहिजे त्यांत आपलें कल्याण आहे. दुसरे रशियासारखे गडबडे राजे काबुलासारख्यास तोंडीं देऊन आडून गोळ्या मारणारे यांचे मुखावलोकन आपणास सहसा नको. त्यांपासून आपले देशाची सर्वतोपरी हानि होणार आहे, सबब या लढाईंत इंग्लिश सरकारास आपण सब नेटिव लोकांनीं व संस्थानिकांनीं पूर्णत्वें मदत करावी. व रशियाचा काबुल प्रकरणांत कावा असल्यास तो समूळ फसवून टाकावा.

---

**काबूल**— जनरल राबर्ट साहेब काबुलावर जाऊन दाखल झाले. आलेल्या शत्रूंच्या सर्व क्षुल्लक हरकतींचें निवारण करून, त्यांनीं काबूल गाठलें. १२ वे तारखेस शहरांतून मोठ्या थाटानें अमीरास बरोबर घेऊन साहेब बहादूर बालाहिसार किल्यावर जाणार होते व त्यावेळेस काबूलच्या दरवाजावर ब्रिटिश सरकारचें ते निशाण लावतील. हल्लीं बालाहिसार किल्ला दोन पलटणींच्या ताब्यांत आहे. शहरांत शत्रूची कोठें फिरीक नाहीं. सर्व सामसूम आहे.

ज० राबर्ट साहेबानीं काबुलास आपल्या सहीचा जाहिरनामा पाठविला होता तो असा:—

### जाहिरनामा.

सर्व लोकांस जाहिर व्हावें कीं ब्रिटिश सरकारचें सैन्य काबूल शहरावर चाल करून तें हस्तगत करून घेण्या करितां येत आहे. जर सुरळीत रीतीनें तसें झालें तर चांगलें आहे. आणि जर तसें न होईल तर बलात्कारानें शहर हस्तगत केलें जाईल. याजकरितां सर्व निरुपद्रवी व सुस्वभावी लोक ज्यांनीं ब्रिटिश रेसिडेंटास ठार मारण्याचे व रेसिडेन्सी लुटण्याचे कामीं कांहीं दखल केली नाहीं त्यांनां सावध केलें जात आहे. आणि प्रतिबंध मना करण्यास जर ते कमकुवत असतील तर त्यांनीं इंग्लिश सरकारचे सैन्यांत यावें व अमीराचे हुकमतींत रहावें अशी तजवीज किंवा दुसरी कांहीं तजवीज आपले बचावा करितां जरूर केली पाहिजे. ब्रिटिश सरकार बायकांवर व मुलांवर

शस्त्र चालविणार नाहीं. याजकरितां त्यांस निर्भय जागीं नेऊन ठेवण्याची तजवीज त्यांनीं केली पाहिजे. ब्रिटिश सरकार सर्व जातीच्या लोकांशीं न्याय नीतीनें वागण्यास इच्छितें, त्यांच्या धर्मास, मनोवृत्तीस, व चालीरीतीस मान देण्यास इच्छितें आणि गुन्हेगारांस त्यांच्या कर्माचें योग्य फळ देऊं इच्छितें. याजकरितां अपराध्यां बरोबर निरपराध्यांस नाहक पीडा न व्हावी याकरितां हरएक तजवीज करण्यास तें खुशी आहे. परंतु आमचे कामास निरर्थक हरकत न व्हावी ह्मणून योग्य सावधगिरी घेणें जरूरीचें आहे यासाठीं हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर जे लोक काबुल शहरांत किंवा त्याचे आसपास हत्यारबंद आढळतील ते ब्रिटिश सरकारचे शत्रू मानिले जातील. आणखी हेंही सर्वांस स्पष्ट समजावें कीं जर ब्रिटिश फौजेस शहरांत शिरण्यास प्रतिबंध होईल आणि त्या गर्दींत कोणी भला मनुष्य या जाहिरनाम्यावरून सावध न राहून त्यास किंवा त्याचे मालमिळकतीस कांहीं नुकसान होईल तर त्याचे आह्मी जबाबदार नाहीं.

( सही ) एफ राबर्ट्स.

---

**पुस्तकांची पोंच**—अलीशान रेसिडेंट साहेब बहादूर मुलूख अमानी हैदराबाद यांजकडून या सालचे खालीं लिहिलेले वार्षिक रिपोर्ट अह्मांस आले आहेत ते अत्यादरपूर्वक स्विकारून आह्मी त्यांचे आभार मानितों.

१ दिवाणी आणि फौजदारी खात्याचा.
२ विद्या खात्याचा.
३ पोलिसचा.
४ रजिस्ट्रर खात्याचा .
५ धर्मार्थ दवाखान्यांचा
६ तुरुंगांचा.
७ स्यानिटरी कमिशनरचा.

या प्रत्येक रिपोर्टांतील माहिती व त्या संबंधानें स्थलविशेषीं आह्मी आपले विचार पुढील अंकापासून प्रसिद्ध करूं.

## वऱ्हाड.

या आठवड्यांत हवा फार सुंदर झाली आहे. पाऊस जाऊन चित्रांचें कडकडीत ऊन पडूं लागलें आहे.व पहाटे थंडीही पडते. थोडें थोडें दव पडूं लागलें आहे यावरून पाऊस अगदीं गेला असें वाटतें. या वर्षी सार्‍या नक्षत्रांनीं मनावर घेऊन चांगली वृष्टी केली तथापि पिकें खराब होण्याजोगी अतिवृष्टी झाली नाहीं ही संतोषाची गोष्ट होय.

---

एथे आपले लोकांचें क्लब होण्या विषयीं बरेच दिवस वाटाघाट चालू आहे. त्याच्या सर्व अडचणी दूर होऊन दसऱ्याचे दिवशीं तें सुरू होण्याचा निश्चय होऊन तयारी चालू झाली आहे. मि. स्टेती साहेब यांचा बंगला मंडळीनीं २००० रुपयांस या कामाकरितां गहाण घेतला आहे. या कार्मी आस्थापूर्वक झटणाऱ्या पुढारी मंडळींच्या प्रयत्नास यश आलें याबद्दल आह्मांस संतोष वाटतो. पुढेंही हें आरंभिलेलें काम मंडळी अगत्यानें चालवील अशी आह्मी उमेद बाळगतों. मि. केकाऊसजी टाटा करेन्सी कहिल हेरकर्क यांनीं अकोला मुंबईसमाचार नांवानें एक गुजराथी पत्र गेले आठवड्यांत पाहायास पाठविलें होतें त्यांत या क्लबविषयीं लोकांस उत्तेजक असा चांगला मजकूर छापला आहे.

---

रा. रा. कृष्णाजी गोविंद काळे यवतमाळचे क्लार्क आफ दि कोर्ट घरगुती कामाकरितां ८ दिवसांची रजा घेऊन एथें आले आहेत.

---

अकोल्यास शहरांत गेल्या सोमवारी रात्रीं चोरटे लोकांनीं शेट मुकुंदलाल न्हनामल साहू यांचे घराची भिंत फोडून ५०१६० रुपयांचा माल नेला. चोरट्यांनीं त्या लगत त्याच्या ४।५ घरांस बाहेरून कड्या घालून आपलें काम यथेच्छ चालविलें होतें. ही चोरांची एक नवीनच युक्ती समजावयाची. पत्ता अजून लागला नाहीं.

---

मे. मेकंजी साहेब या आठवड्यांत रजेवरून परत येणार आहेत.

---

यवतमाळच्या एका पोलिस कान्स्टेबलास त्रायकोल्या शस्त्रानें जबर मारल्यावरून ७ वर्षांची शिक्षा झाली.

---

या आठवड्यांत एथें युरोपियन लोकांत क्रिकेट, शर्यती वगैरे खेळ होणार आहेत.

---

रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे बी.ए. यांनीं उमरावतीस दुसरें एक उत्तम व्याख्यान गेल्या आठवड्यांत दिलें.

---

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं, उमरावतीच्या प्रदर्शनाविषयीं कमिशनर साहेबांनीं अभिमान धरल्याप्रमाणें रेसिडेंट साहेबांकडून खर्चाच्या मंजुरीचें सांगणें आणविलें व असें मोठे काम यथावकाशें चांगलें झालें पाहिजे ह्मणून सभा भरवून सन १८८१ च्या जानेवारींत हें प्रदर्शन व्हावें असें ठरविलें.

---

गोकूळ नावाच्या एका बदमाशा जवळ कांहीं दागिने सापडल्यावरून त्याला ६ महिन्यांची शिक्षा झाली. हल्लीं असें कळतें कीं, ते दागिने नांदेडाकडे एका बाईचा खून झाला तिचे अंगावरील आहेत.

---

वाशीमचे जेलर मि. सोनेशिंग यांस इलिचपुरास नेमून तेथील मि. थामसन यांस वाशिमास नेमिलें.

---

देऊळगाव संस्थानचें पत्र आल्यावरून कळतें कीं श्री बालाजीची वार्षिक यात्रा विजया दशमीस शुक्रवारीं सुरू होईल. व ललीत आश्विन वद्य ३ रविवार रोजीं होईल.

---

पारस येथून पत्र आल्यावरून कळतें कीं १४ वे तारखेस तेथें शाळेची वार्षिक परीक्षा होऊन डिपुटी इन्स्पेक्टर यांनीं मुलांस बक्षिसें वाटलीं त्या प्रसंगीं तेथील हेडमास्तर रा. रा. रामकृष्ण रावजी यांनीं बरीच मंडळी बोलाविली होती व ती आली होती, त्यांत रा. रा. भोलासिंग चीफ कानस्टेबल प्रमुख होते. त्यांनीं शाळेस घड्याळ नाहीं ही अडचण पाहून वर्गणी करून १८ रुपये जमविले व एक घड्याळ आणि घंटा घेण्याची तजवीज केली.

---

एथील मिडल क्लास स्कूलांतील फर्स्ट असिस्टंट मास्तर रा. रा. हरी धोंडदेव भातवडेकर यांनीं आजारीपणाकरितां पुन्हा एक महिन्याची रजा घेतली- त्यांचे बदली रा. रा. मारुती हरी विद्यार्थी कालेजांत शिकत असून सुटींत एथें आलेले आहेत त्यास नेमिलें.

---

नवीन आलेले डाक्टर मि० डिसोजा चांगले हुशार असून आपलें काम मोठ्या तत्परतेनें करीत असतात. व स्वभावानें फार नम्र व मनमिळाऊ आहेत. व मराठी भाषा चांगली जाणतात यावरून त्यांचा उपयोग शहरवासी लोकांस पूर्वीचे अध्यापेक्षां विशेष होईल. व ते लोकांचे आदरास पात्र होतील असें दिसतें.

---

एथें व्हालंटियर पलटणीचें काम उत्तम रीतीनें सुरू आहे. एक दिवसां आड क्रिकेटचे जागीं त्यांच्या कवायती होत असतात. युरोपियन व युरेशियन लोक यांत असून चार पार्शी गृहस्थही आहेत.

---

शिगावचे गुडूत क्लार्क व त्रिंबक अनंत नातू यांवरील फौजदारी मुकदमे येत्या आठवड्यांत चालणार आहेत. या आठवड्यांत वेरगावचे गोसाव्याचीं दि० मुकदमीं डिपुटी कमिशनर साहेबापुढें मोठ्या कडाकोटीनें चालला दोहोही बाजूस वकील व बारिस्टर यांची गर्दी होती. पुढें नोवेंबरची ९ वी तारीख नेमिली.

---

बुलढाण्याचे मास्तर रा. रा. महादाजी गंगाधर लिमये यांची शिगावास बदली झाली व ते आपले कामावर येऊन दाखल झाले.

---

उमरावतीच्या धर्मार्थ दवाखान्यावरील नेटिव डाक्टर मि. दुर्गया फार लोकप्रिय होते व त्यांची तेथून बदली झाली ती करूं नये व त्यांनां तेथेंच ठेवावें अशाबद्दल शहरवासी लोकांचा पुष्कळ सह्यानिशीं अर्ज झाला व म्युंनिसिप्यालिटीनेंही त्यांची बदली रहित व्हावी असा अभिप्राय दिला. पण स्यानिटरी कमिशनर साहेबांनीं बदली रहित होत नाहीं असा तरेंतून आलेल्या अर्जावर शेरा देऊन डाक्टर मजकूर यांस अंजनगावास पाठविलें. हें बरोबर झालें नाहीं असें आह्मांस वाटतें. ज्या शहरच्या लोकांची मि. दुर्गय्या यांजवर इतकी प्रीति व ज्याच्या हातगुणावर लोकांचा इतका भरवसा त्यास वरिष्ठांनीं एकदम तेथून काढून खेड्यांत नेऊन टाकावें व लोकांस असे नाराज करावें याचें कारण आह्मांस समजत नाहीं. अजूनही कांहीं हरकत नसल्यास या गोष्टीचा विचार होईल.

मागाहून आलेली नोटिस,

तीर्थस्वरूप मातुश्री गंगाबाई जवजे नारायणराव देशमुख परगणें अडगाव यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं आपण उर्दूअखबार तारीख ३० माहे आगष्ट सन १८७९ इसवीचे अंकांत दत्तक घेण्याविषयीं आपली इच्छा दर्शवून जाहिरात प्रसिद्ध केली आहे, व कोणाची हरकत असल्यास एक महिन्याचे आंत कळवावी असें लिहिलें आहे, परंतु सदर्हू पत्र आह्मांस तारीख १४ अक्टोबर रोजीं पोंचलें याजविले सबब मुदतींत कळवितां आलें नाहीं हल्लीं कळवितों तो मजकूर येणेंप्रमाणें:—

संपतराव याचा मुलगा जयवंतराव यास आपण दत्तक घेणार ह्मणतां ही गोष्ट शास्त्रविरुद्ध व गैरशिस्त आहे, आह्मीं प्रत्यक्ष तुमचे पुतणे असतां तुह्मांस दत्तक घेण्य चें कारण नाहीं, असें असतां तुह्मांस दत्तक घेणेंच आहे तर नजीक संबंधी आमचा मुलगा अगर आमचे चुलत्याचा मुलगा दत्तक घेणें रास्त व विहित आहे व दूरचा घेणें गौण आणि अप्रशस्त आहे हें तुह्मांस कळावें.

शास्त्राप्रमाणें नवऱ्याचें पाठीमागें स्त्रीनें दत्तक घेणें आहे तर नवऱ्याचे अंतकाळीं तिनें त्याची परवानगी घेऊन ठेवावी लागते. तसें तुमचें कांहीं झालें नाहीं. कैलासवासी नारायणराव देशमुख तुमचे भरतार हे ज्या वेळीं मौजे अकोली तालुके अकोट या गावीं मरण पावले त्यावेळेस तुह्मी तेथें हजर नव्हतां हें सर्व लोकांस माहित आहे. त्यावरून तुह्मांस भताराची दत्तक घेण्याची परवानगी नाहीं हे सिद्ध आहे. आणि इतके उपर घेणेंचा आग्रह असेल तर वरलिहिल्याप्रमाणें आमचा पुत्र किंवा चुलत बंधु यास घ्यावें असें आमचें आपणास सांगणें आहे. व हें न ऐकतां संपतराव याचा मुलगा घ्याल तर त्यास आमची हरकत आहे. त्याउपरही आपण न ऐकाल तर दत्तविधानाचे प्रसंगींही ही हरकत पुढें आणू याविषयीं आपण योग्य विचार करून उगीच दुराग्रह न धरितां आह्मी आपले अतिनजीकचे आप्त आहो तर आमच्या सल्यानें व मेळानें आपले व आमचे घराण्यातला मुलगा घ्यावा यांत राजी खुषी आहे व उभय लोकीं कीर्ति आहे. कळावें तारीख १७ माहे आक्टोबर सन १८७९ इसवी.

( सही ) लक्ष्मणराव शिवराव देशमुख परगणे अडगाव दस्तूर खुद.

## वर्तमानसार.

दक्षिण महाराष्ट्र देशांत लाखों उंदीर मारले व त्यांची कातडी आजपर्यंत फुकट जात होतीं; परंतु विलायतेंतील इंडिया आफिसानें तीं सर्व कातडीं स्टेट सेक्रेटरी यांच्या नावानें तिकडे मागविलीं असून तीं सर्व तेथील बाजारांत विकणार व त्यापासून जें द्रव्य उत्पन्न होईल तें हल्लीं नवीन सुरू झालेल्या अफगाणचे लढाईच्या खर्चास देणार असें अट्लस पत्रकर्ता लिहितो.

वायव्य प्रांतांत आफगाणिस्थानाकडे मजूरदार लोक पाठवावयाचे ते पकडून त्यांस एक कांबळी व पराकाष्ठा पांच रुपये देऊन रेलवेचे गाडींत भरून त्यांची खुषी नसतां तिकडे पाठवितात असें दिल्लीग्याझेटकर्ता लिहितो.

थीवाच्या मुलुकरितां दोन पाळणे केले आहेत त्यास आंतून बाहेरून सोन्याचे पत्रे व हिरे लाविले असून त्यांची किंमत अजमासें पांच लाख रुपये आहे ने. ओ.

रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलीक सी. एस. आय. यांच्या पत्नीस एकाएकी प्रकृति बिघडून गेल्या रविवारीं पहाटेस देवाज्ञा झाली.

मुंबई एथें थोड्या दिवसांपूर्वी पार्शी जातीच्या एका गृहस्थानें आपली पहिली बायको जीवंत असतां पुनर्विवाह केला

## आरोग्यशास्त्र.

इंग्रज सरकारचें राज्य झाल्यापासून, विद्येची वृद्धि आपल्या भरतखंडांत दिवसेंदिवस जास्त होत चालली आहे. गृहस्थांची व भिक्षुकांचीं मुलें शरीरास इजा होई तोंपर्यंत

रात्रंदिवस अभ्यास करून, बी. ए,एम् .ए., इत्यादि किताब मिळवून मोठमोठाल्या पदव्यांस चढत आहेत. जर अशा आमच्या शिकलेल्या मंडळीस, त्यांच्या उद्योगावर असतां कोणी परदेशी गृहस्थ येऊन त्यांस वकिलीचें किंवा कालेजांतील गुरुजींचें काम करतांना पाहील, तर खचित तोंडांत बोट घालून ह्मणेल कीं "शाबास, खरे हुशार हे लोक" परंतु तोच परकी गृहस्थ त्यांच्या घरीं गेला तर घरची अव्यवस्था पाहून त्यास कधीं वाईट वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. एक तर बुवा घाणेरड्या गल्लींत राहिलेले, जेथें उभें राहावें तेथें अतिशय दुर्गंधी, घराचा पाया सखल असल्यानें जमिनी बऱ्याच ओलसर असतात, प्रत्येक खोलींत एक मोरी, तिचें तोंड बाहेरील गटारावर असल्यानें, बाहेरील खराब हवा आंत येतच आहे, स्वच्छ हवा आंत येण्याचे मार्ग पाहिले, तर जितकी करवेल तितकी लहान खिडकी तीही एकापेक्षां जास्त मिळणें कठीण व बहुत करून बंद केलेली, अशा ह्या कोठडींत जितकी गर्दी करून निजवेल किंवा बसवेल तितकीं मनुष्यें आंत बसतात, तेथेंच ओलीं चिरगुटें वाळत लावलेलीं असतात, तेणेंकरून तर घरांतील हवा अतिशय सर्द राहाते. जमिनीवर बिछाना टाकून निजणें ह्मणजे त्याचा त्यांना कांहीं त्रासच नाहीं. शौचकूपाची तर दुर्गंधी जवळच कोठे तरी असते. मुखमार्जन व स्नानादिक्रिया शास्त्रांतें कराव्या ह्मणून सांगितल्या आहेत ह्मणूनच करायाच्या, शरीराच्या आरोग्याकरितां कांहीं नाहीं. भोजन ह्मटलें ह्मणजे त्याशिवाय जीव संरक्षण होत नाहीं ह्मणून करायाचें, आपण कोठल्या प्रकारचें काम करतों, व त्याकरितां कोठल्या प्रकारचें अन्न खालें असतां सहज पचन होईल अणि आपणांत शक्ति येईल ह्या गोष्टीचा विचार आमचा शिकलेल्या मंडळीकडून कधीं होत नाहीं. हे आमचे नवीन पंडीत आसनावर बसून जेव्हां मिल, बेकन्, होरेस, आरिस्टाटल, पाणिनी इत्यादि महान् विद्वानांच्या पुस्तकांतलि गहन विषयांचें विवेचन करितात, तेव्हां त्यांस असें विचारलें कीं, तुमचें काळीज, प्लीहा, यकृत इत्यादि कुठेंसीं आहेत तर उजवीची डावी व डावीची उजवी बाजू दाखवूं लागतील. कियेकांना तर मुळींच कांहीं ह्या विषयाची माहिती नसते. आपणास मोठमोठाल्या गहन विषयांची माहिती असून, अन्नपचन कसें होतें, श्वासोच्छ्वासादि क्रिया कशा चालतात, झोंप कशी लागते, कोणत्या प्रकारच्या वाईट आचरणानें शरीरव्यापार बिघडून रोग उत्पन्न होतात, ह्या गोष्टींचें ज्ञान कांहींच नसावें हें बरोबर नाहीं, तर अशा ह्या आरोग्यशास्त्राची माहिती करून घेतली असतां कित्येक रोग टाळतां येतील व मुलेंबाळें सशक्त होऊन पुढें होणारी संतति सदृढ होऊन, आयुष्याची व ज्ञानाची वृद्धि खचित होत जाऊन आमच्या आर्यबंधूंची हल्लींची निकृष्ट दशा लवकरच जाईल यांत संशय नाहीं.

असे हे सर्व विचार मनांत आल्यावरून हें आरोग्यशास्त्र लिहिण्याचा उद्योग सुरू केला आहे व त्यांतील "मुखमार्जन" ह्या पहिल्या विषयाला आरंभ केला जाईल. त्यांत मुखमार्जन, स्नानक्रिया, भोजनविधी' व्यायाम इत्यादि नित्यक्रमांतील विषयांचें विवेचन एकामागून एक केलें जाईल.

## एक वर्तमानपत्र व माजिस्त्रेट.

अलहाबादच्या केसरूल अखबार पत्र कर्ते मौलवी सिराजूदीन अहमदखान असून त्या पत्रांतील तारीख १७ आगस्टच्या अंकांत आग्रिकलचरल खात्याचे डिरेक्टर मि. बक यांणीं एका मनुष्यास लाथ मारली व त्यास दुसरी कांहीं इजा केली ह्मणून मजकूर लिहिला आहे. आतां चाली प्रमाणें हा मजकूर खोटा आहे असें त्या साहेबांनीं पत्रकर्त्यास कळवावयाचें होतें व त्यांणीं तो पत्रांत छापावयाचा होता अथवा त्यांणीं फार झालें तर सरकारच्या कायद्याच्या मर्यादा घालून दिल्याप्रमाणें, त्या पत्रकर्त्यावर कोर्टांत फिर्याद करावयाची होती, परंतु तसें कांहींच न होता तेथील माजिस्त्रेट मि. मार्कहाम यांणीं पत्रकर्ते यांस खासगी रीतीनें बोलावून आणून तुह्मी लिहिलेला मजकूर खोटा आहे सबब २४ तासांच्या आंत लिहिलेला मजकूर खोटा आहे ह्मणून पत्रांत प्रसिद्ध करा अथवा लिहिणारा कोण त्याचें नांव सांगावें असें सांगितलें. मौलवी यांणीं साहेबांस चालीप्रमाणें सलाम केला आणि ते आपल्या घरीं निघून आले.

पुढें विचार केला तेव्हां त्यास मोठी पंचाईत पडली असेल? परंतु त्यांणीं लिहिलेला मजकूर खरा अशी त्यांची खात्री असल्यामुळें त्यांच्यानें माजिस्ट्रेटाच्या सांगण्याप्रमाणें उलट मजकूर लिहवेना. शेवटीं त्यांणीं मार्कहाम साहेबांस असें पत्र लिहिलें कीं बक साहेबांनीं एक्या मनुष्यास लाथ मारल्याबद्दलच्या प्रकरणाविषयीं मला जेवढी खात्री करून घ्यावयाची होती तेवढी घेतली त्याजबद्दल दाहा बारा गृहस्थ तसेंच सांगत असतां त्याजविषयीं संशय रहात नाहीं. तथापि या गोष्टीची मला स्वतां माहिती नाहीं व कदाचित्त सांगणारानें कांहीं वाढवून सांगितलें असेल असें पाहिजे तर मी लिहीन. परंतु जें मी लिहिलें आहे तें खरें आहे असा माझा ग्रह आहे व त्यास प्रमाणही आहे. यास्तव हें खोटें आहे असें लिहिणें मला योग्य वाटत नाहीं. तेव्हां ज्या प्रमाणांच्या आधारावर हा मजकूर लिहिला तो कितपत बरोबर व मिळण्यासारखा आहे याचा शोध करण्याकरितां मला अवकाश द्यावा. पाहिजे तर ज्या मनुष्यास मारलें त्याची जबानी घेण्यास मामलेदारास सांगावें. सारांश हा मजकूर खोटा आहे असें ठरल्यास मी तसें लिहिण्यास फार खुषी होईन.

या प्रमाणें पत्र पाठविल्यावर माजिस्त्रेट साहेबांनीं यांस पुन्हः बोलावून न आणितां पुढें लिहिलेल्या मतलबाचें पत्र लिहिलें. काल सकाळीं तुमची गाठ पडली तेव्हां कानुनगो यांणें हुकूम मोडला ह्मणून बक साहेबांनीं त्यास लाथ मारली, त्याला कामावरून काढून टाकिलें सांगितलें, कानुनगो पुनः खोलींत गेला व जमीनीवर पडून त्याला मूर्च्छा आली व बक साहेबानीं तेवढ्याकरितां त्यास दंड माफ केला. याप्रमाणें ता. १७ माहे गुदस्तच्या अंकांत लिहिलेल्या गोष्टी खोट्या आहेत असें बक साहेब सांगतात ह्मणून तुह्मांस मी सांगितलें, तसेंच मी पसंत करीन त्याप्रमाणें उलट मजकूर तुह्मी छापावा अगर लिहिणाराचें नांव सांगावें असा सरकारचा हुकूम आहे असें सांगितलें व चार बाजेपर्यंत तुह्मी विचार करून कळवा ह्मणून सांगितलें. असें असतां लिहिलेला मजकूर खरा आहे व तो खरा आहे अशाविषयीं शोध करण्यास अवकाश द्यावा ह्मणून पत्र पाठविलेंत. त्यास बक साहेब ही गोष्ट खोटी आहे असें ह्मणतात तें बस्स आहे. तेव्हां आतां तुह्मांस असें कळविण्यांत येत आहे कीं, जर उद्या बारा वाजेपर्यंत आह्मी लिहून पाठविल्याप्रमाणें त्यांत फेरफार न करता अथवा त्याजवर विरुद्ध टीका न करितां मजकूर छापतो ह्मणून अथवा तुह्मांस माहिती कोणी दिली त्याचें नांव लिहून पत्र आलें तर बरें. नाहीं तर हे प्रकरण मला सरकाराकडे हुकुमाकरितां कळविणें भाग पडेल. आतां माजिस्त्रेट साहेबांच्या पत्रा रोबर छापण्याकरितां लिहून पाठविलेल्या मजकुराचा आशय असा होता कीं, आह्मी आपल्या ता. १७ आगष्टचे अंकांत कानुनगो याच्या चवकशी विषयीं मजकूर बक साहेबांनीं त्यास लाथ मारली व तुला बर्तर्फ केलें आहे असें सांगून त्यास कोठडीच्या बाहेर घालवून दिलें व तो पुनः आंत गेला आणि मूर्च्छा येऊन जमीनीवर पडला, ह्मणून साहेबांनीं दंड माफ केला असें लिहिलें आहे; तर तो मजकूर सर्वथै व खोटा असें आतां आह्मांस कळलें. सबब आह्मी उलट लिंहितों आणि आह्मी पूर्वीचा मजकूर खोट्या माहितीवरून लिहिला ह्मणून आह्मांस वाईट वाटतें.

याप्रमाणें माजिस्त्रेट साहेबांचा लेखी हुकूम गेला. परंत मौलवी साहेबांनीं विचार करून आपलें पहिले ह्मणणेंच कायम ठेविलें. त्याजवर त्यानीं त्या माजिस्त्रेट साहेबास असें उत्तर पाठविलें कीं, कानुनगो यास दंड माफ करून पुन्हा कामावर ठेविलें असें पहिल्या मजकुरांत लिंहिलें आहे सबब याजबद्दल कांहीं लिहावयास नको. परंतु बक साहेबानीं त्या मनुष्यास लाथ मारली याजबद्दलच्या लेखा विरूद्ध बक साहेबांस आह्मास लिहिण्यास मोकळीक आहेच तेव्हां त्यांनीं तसें लिहून पौंठविलें असतें तर मी तसें लिहिण्याचे मोठ्या आनंदानें कबूल केलें असतें; परंतु तें तसें लिंहित नाहींत याजमुळें व जरूर पडल्यास आमच्या लेखास पुरावा मिळत असतां तसें उलट लिहिणें हा खरेपणा व न्याय या विरूद्ध प्रकार होतो. यास्तव आपला हुकूम आमलांत आणण्यास मी असमर्थ आहे. असे मी विनयपूर्वक व नम्रतेनें कळवितों. आतां लिंहिणाराचें नाव कळविण्याच्या संबंधानें मी या पत्राचा कर्ता आहे तेव्हां त्याजबद्दलची जबाबदारी मी आपल्यावर घेतों. शेवटीं माझें इतकेंच ह्मणणें आहे कीं आपण व सरकार जें काय करणार तें सर्व चवकशी करून नंतर करावें.

मोलवी साहेब यांचा असा जबाब गेल्यावर प्रकरण सरकाराकडे जाऊन वायव्य प्रांतांच्या सरकारचा हुकूम बक साहेबांनीं या पत्र कर्त्यावर फिर्याद करावी असा आला असें समजतें. ने. ओ.

## नोटिस।

महादू वलद रामा वरठी रहाणार डोंगरगाव प्रगणें पुसद यास भिवराई मर्द महादु वरठी रहाणार उकळी प्रगणें वाशीम इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून आज बारा वर्षे मला सोडून देऊन नांदवीत नाहींस तर आतां तूं फारकतीचा कागद आणून फारकत दिली नाहींस तेव्हां आज तारखेपासून ३ दिवसांत फारखत लिहून द्यावी न दिल्यास तुझा उजर न करितां दुसरा नवरा करण्याची कायदेशीर तजवीज करीन अगर अन्नवस्त्राबद्दल तुझ्यावर दावा करीन कळावें तारीख २२ माहे सप्तंबर सन १८७९ इ०

( सही ) भिवराई मर्द महादू वरटी
निशाणी खुद बांगडी

## नोटिस

हणवती वलद मामोजी राऊत जात कुणबी रहाणार मौजे शेंद प्रगणें पिंजर तालुके अकोलें यास खालीं सही करणार नारोबा वलद भिकाजी कोष्टी व हिरामण वलद भवान माळी दाते रहाणार पातुर नंदापुर तालुके मजकूर याजकडून देण्यांत. येते अशीजे, आमचे तुह्माकडे येणें खाते बाकीवरून सरकीबद्दल ५५ पंचावन रुपये व नक्त नेलेले १० रुपये एकूण ६५ पासष्ट रुपये व या रुपयांचे लगायत मितीपासून व्याज येणें आहे. हे रुपये आह्मी तुह्मास कित्येक वेळा मागितले पण तुह्मी देतों देतों ह्मणता तरी देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस देण्यांत आली आहे तर ही पावल्यापासून एक महिन्याचे आंत सर्व रुपये व्याजासह आणून द्यावे सदर्हू मुदतींत रुपये न दिले तर नोटिशीच्या खर्चासह सर्व रुपयांची दिवाणी कोर्टांत फिर्याद करून कोर्ट खर्चासुद्धां रुपये घेतले जातील हें तुह्मांस कळावें. तारीख १२ माहे आक्टोबर सन १८७९ इसवी.

( सही ) नारोबा कोष्टी व हिरामण
माळी दस्तुर खुद.

## नोटिस.

शेखदावल वलद उक्याभाई मोमीण राहणार ताजनापेठ अकोलें यास. महमद शेमी वलद शेखहमजा मोमीण रहाणार बेलखेड तालुके अकोट याजकडून देण्यांत येते ऐशीजे आह्मी तुह्मास शंभर रुपयांचा कर्जरोखा सुमार तीन चार महिन्यांपूर्वी लिहून दिला व चार घटकांनीं रुपये देतों ह्मणून बोलला व न विच्यारतां निघून गेलां तों दोन महिने पर्यंत नाशकाकडून आला नाहीं सुमार एक महिन्यापूर्वी तुह्मी बेलखेडास आले तेव्हां आह्मी तुह्मास सदर्हू रोख्याचे रुपये मागितले तेव्हां तुह्मी सांगितलें कीं, तुमचे बापाकडे आमचे रुपये आहेत त्या बद्दल हा पुर्जा झाला."तेव्हां मी तुह्मास सांगितलें कीं, अशी दगाबाजी करण्यांत तुह्मास फायदा होणार नाहीं कारण मी आपले बापापासून सुमार सात आठ वर्षांपासून विभक्त आहे ह्मणून त्यां रुपयांचा मी देवाल नाहीं तरी तुह्मी रुपये दिले नाहींत ह्मणून ही मुद्दाम नोटिस देण्यांत येते कीं, ही नोटिस पावल्या बरोबर आमचा सदर्हू दस्तैवज परत द्यावा. व हा नोटिशीचा खर्च द्यावा. न. दिल्यास दगाबाजी बद्दल तुह्मावर फिर्याद करून दस्तैवज व खर्च घेतला जाईल कळावें तारीख १४ माहे आक्टोबर१८७९

( सही ) महमद शेमी वलद शेखहमजा
कचे हातची निशाणी

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० २६ माहे अक्टोबर सन १८७९ इसवी. अंक ४२


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळी पुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## मुंबई ब्यांक.

अमानत ठेविलेल्या पैशावर व्याजाचे दर.

१२ महिने ठेविल्यास दरसाल दर शेकडा ४ रुपये.

६ महिने ठेविल्यास ( ह्मणजे तारीख १ नोवेंबर पासून ता० ३० जूनपावेतों एकसारखे कोणतेही सहा महिनेपर्यंत दरसाल दर शेकडा ३ रुपये प्रमाणें.

सदर्हू प्रमाणें न ठेविल्यास दरसाल दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याज मिळेल.

तात्पुरची किंवा मुद्दाम व्यवस्था केल्याशिवाय कमी मुदतीपर्यंत अथवा अधिक व्याजानें अमानत पैसा ठेविला जाणार नाहीं.

चालू अमानत पैशाच्या खात्यावर व्याज दिलें जाणार नाहीं.

मुंबई.

तारीख १ आगष्ट सन १८७९ इसवी.

## जाहिरात.
## वऱ्हाडवक्तृत्वोत्तेजक मंडळ कडून.

देण्यांत येते कीं येत्या डिसेंबर महिन्याची तारीख २६ रोज शुक्रवारपासून या मंडळीचा पुढें लिहिल्या विषयांत उमेदवारांची परीक्षा घेऊन बक्षिसें देण्याचा वार्षिक समारंभ सुरू होणार आहे याजकरितां ज्या उमेदवारांची परिक्षेस येण्याची इच्छा असेल त्यांनीं लेखी अर्ज खालीं सही करणाराकडे प्रमोदसिंधु छापखान्याच्या पत्यावर ता० १२ डिसेंबरच्या आंत पोचतील असे पाठवावे.

विषय पहिला-- "आपल्या लोकांची घरें व वागण्याच्या रीति यांपासून लोक समाजाच्या आरोग्यतेवर कांहीं वाईट परिणाम होतात काय? होत असल्यास कोणते? व त्यांचे निवारण करण्यास उपाय कोणते? व त्यांतून हल्लींच्या स्थितींत ते कितपत साध्य आहेत."

विषय दुसरा - "सर्वांभूतीं द्यावें अन्न, द्रव्य पात्र विचारून॥ उपतिष्ठे कारण, तेथें बीज पेरिजे॥"

या तुकारामाच्या अभंगाच्या चरणावर व्याख्यान द्यावें.

येणेंप्रमाणें दोन विषय नेमिले आहेत. पहिल्या विषयांत पहिलें बक्षीस ३० रुपयांचें व दुसरें २० रुपयांचें नेमलें आहे. दुसऱ्या विषयांत पहिलें बक्षीस २५ रुपयांचें व दुसरें १५ रुपयांचें नेमलें आहे.

परिक्षेस येणारे उमेदवारांनीं समारंभाचे पूर्वदिवशीं या सभेच्या चिटणिसास भेटावें.

उमेदवारांस लागू असण्योच नियम खालीं दिले आहेत त्यांकडे अवश्य लक्ष द्यावें.

१ उमेदवारानें उभें राहून भाषण करावें व जवळ लेखी टिपण बोलते वेळीं ठेवूं नये.

२ उमेदवारांचें वय १६ वर्षांपेक्षां कमी नसावें.

३ प्रत्येक उमेदवारानें अर्ध्या तासावर भाषण करूं नये, परंतु जरूर वाटल्यास भाषण करणारास अर्ध्यातासा पूर्वींच रजा देण्याचा व वाटल्यास मुदत अधिक एक तासपर्यंत वाढविण्याचा अधिकार परीक्षकांस आहे. कोणी कोणाही व्यक्तीस अनुलक्षून लागून भाषण करील त्याचें भाषण बंद करण्यांत येईल.

४ ज्या उमेदवारांचे निरनिराळ्या विषयांत अधिक गुण लागतील त्या उमेदवारांस बक्षिसें दिलीं जातील. परंतु $\frac{1}{2}$ पेक्षां गुण कमी लागल्यास मुळींच इनाम दिलें जाणार नाहीं.

सन्मानार्थ नेमलेल्या अगर दुसऱ्या एखाद्या स्वतंत्र विषयावर कोणाची भाषण करण्याची इच्छा असल्यास त्यास परवानगी आहे.

उमरावती १६ अक्टोबर १८७९ इसवी.

चिंतामण रामचंद्र
सभेचे चिटणीस.

## जाहिरखबर.

सर्व लोकांस कळावें कीं, रा. बालमुकुंद नंदकिशोर रहाणार कान्हे तालुके पुसद जिल्हा वाशीम यास मी आपले तर्फे कोणतेही काम करण्याबद्दल ८ रुपयांचे कागदावर मुकत्यारपत्र दिलें होतें तें रद्द करून त्यास कामावरून बसविलें आहे. कळावें तारीख १२ माहे आक्टोबर सन १८७९ इसवी.

( सही ) सोनबा वल्लद नागोजी पाटील
मोकद्दम मौजे कान्हे तालुके
पुसद जिल्हा वाशीम.

## नोटिस।

बालाराम परशराम रजपुत दलाल मुक्काम अकोट यास खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी मला साहेबाकडून नवकरी सोडून तुह्मी आपले दलालीचे कामीं अकोट आणि अकोला एथें ठेविलें त्याच हंगामभरचे तनखेचे रुपये ३०० ठरले त्याप्रमाणें आह्मी तुमची नवकरी १८७९ चे हंगामभर केली त्याप्रमाणें तुह्मी आह्मांस रुपये १२८ ते कांहीं तुह्मी व कांहीं नरसिंग पासुन ज्वारी वगैरे मिळून रुपये पावले. बाकी रुपये १७२ राहिले ते आह्मी तुह्मास फार वेळ मागितले तर तुह्मी मांदगीचा आरसा सांगितला होता आतां आह्मी तुह्मास दोन तीन वेळ मागितले तर तुमचे मनांतील बेत असा दिसून आला कीं घरीं बोलावून मार ठोक करून रसीद ध्यावी तर सदर्हू रुपये नोटिस पावल्यापासून दोन दिवसांचे आंत कोणा सराफाचे दुकानीं देऊन माझी रसीद ध्यावी जर तुह्मी रुपये नोटिसीचे मुदतीप्रमाणें न दिले तर तुह्मावर कायदेशीर अडगाव कोडतांत फिर्याद करून नोटिसीचे खर्चासुद्धां रुपये घेऊ कळावें तारीख १९ अक्टोबर सन १८७९ इ.

( सही ) बापुरावजी भुसारी अकोटकर
दस्तुर खुद्द.

## नोटिस.

कृष्णाजी वल्लद निंबाजी अडनाव पोली जात कुणबी राहणार कसबे घाटबोरी तालुके मेहकर जिल्हा बुलढाणें यास खालीं सही करणार मुक्ता मर्द कृष्णाजी पोली राहणार कसबे घाटबोरी इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा आहेस. असें असून मला संसारांत येऊन सुमार नऊ दहा महिने झाले तशी मी आपले चुलत्याचे एथें वास्तव्य करीत आहे. आणि मजला आई बाप वगैरे कोणी नाहींत, मी सर्वस्वी निराधारी आहे असें असतां तुह्मी मजला विनाकारण गैर समजुतीनें पाहिजे तसें तुफान घेऊन मजला मारहाण करून घरांतून काढून दिलें त्यालाही आतां नऊ दहा महिने झाले आहेत. तेव्हां मी कोठपावेतों लोकाचे एथें राहावें. मजला खाण्यास व वस्त्र प्रावर्णास बरोबर मिळत नसल्यामुळें माझे फार हाल होत आहेत याकरितां तुह्मास माझी गरज व माझेपासून संसार करून घेण्याची गरज असल्यास ही नोटिस पावल्या दिवसापासून ८ आठ दिवसांचे आंत मजला घेऊन जावें आणि चांगले रीतीनें नांदवावें अगर तुह्माला माझी व संसाराची गरज नसल्यास मजला देश रिवाजा प्रमाणें फारकती पंचानुमतें स्टांप कागदावर लिहून देऊन मजला दुसरा घरठाव करण्यास परवागी द्यावी. तुह्मी मजला वर लिहिल्या प्रमाणें आठ ८ दिवसांचे आंत जबाब न दिल्यास अगर नांदविण्या करितां घेऊन न गेल्यास तुमचें कांहीं एक न ऐकतां जगरूढी प्रमाणें दुसरा घरठाव करण्याची कायदेशीर रीतीनें तजवीज करीन मग तुमचा कोणतेही प्रकारें मजवर हक्क लागूं होणार नाहीं. हें पक्केपणीं समजावें.

कळावें तारीख १७ माहे आक्टोबर सन १८७९ इसवी.

( सही ) मुक्ता मर्द कृष्णाजी अडनाव पोली जात कुणबी
राहणार कसबे घाटबोरी तालुके मेहकर
निशाणी खुद्द हातची बांगडी.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. पत्रकर्ते महाराज, मी फिरत फिरत वाकदास आलों. हा गांव लहान तर खराच परंतु खेड्यापेक्षां मोठा असून बाहेरून फार टुमदार दिसतो. गावांतील दोन गृहस्थ प्रसिद्ध आहेत. एक देशपांडे व दुसरे देशमुख. देशमुख रा. रा. व्यंकटराव रावजी हे पूर्वीं देऊळगांव राजास श्री· बालासाहेबाचे संस्थानांत होते. तिकडे त्यांनीं आपलें चांगलें नांव गाजविलें. हल्लीं ते रिसोडास आनररी माजिस्त्रेटचें काम करीत आहेत. अशा लहानशा गावांतून अशा मोठ्या हुद्यास चढण्यासारखे गृहस्थ उत्पन्न होणें ह्मणजे आमचे लहानशा गावास मोठें भूषण आहे. ह्या गांवचे गहूं अति उत्तम. अशा प्रकारचे वऱ्हाडांत तर काय परंतु सर्व हिंदुस्थानांत नसतील. मागे एथील गहूं प्रदर्शनास पाठविले होते असें लोक दाट बोलतात. व हल्लीं उमरावतीस प्रदर्शन होण्याचा विचार कर्णीं आल्यापासून कांहीं मंडळी गहूं पाठविण्याविषयीं खटपट करणार आहे असें कळतें. असें केल्यास त्यांची या कामांत तारीफच होणार आहे. वाकद गांव सर्वांत रब्बी विषयीं चांगला आहे.

एथें सरकारी शाळा आहे परंतु तींत विशेष जीव आहे असें ह्मणतां येत नाहीं. पूर्वींपेक्षां शाळेचा दम कमी झाला. पूर्वीं २० रुपयांचा मास्तर असे परंतु अलीकडील वहिवाटीप्रमाणें त्या जागेचा पगार १५ रुपयांवर येऊन धडकला. पुढें आणखी काय होतें हें समजत नाहीं. गावांत विद्येची गोडी आहे व विद्या अवश्य पाहिजे असें ह्मणणोर लोक क्वचित सापडतील परंतु पोकळ ढोल मारणारे एथें बरेच आहे. तद्याचें पागोटें उचलून त्याच्या डोकीवर ठेवणें वगैरे कामांत ह्या गावची बरीच ख्याति असल्याचें दिसतें. पूर्वींचे मास्तर वेणीकोटकडे बदली होऊन गेले. हल्लीं आलेले मास्तर चांगले मेहेनती आपल्या कामांत तत्पर व मनमिळाऊ असे आहेत. यांच्या हातून शाळा सुधारेल असें बहुतांचें मत आहे परंतु यांस एथील पाणी सोसत नाहीं. आल्यापासून आपल्या पत्नी, मुलासह हिवता

पोरें बेजार आहेत तथापि तसेंच शाळेंत जातात व आपलें काम कारितात. पत्रकर्ते महाराज, सरकार पाण्याप्रमाणें विद्यार्थी पैसा खर्च करितें व लोकांना सुधारतें परंतु विद्येच्या कामांत लोकांवर शिकण्याविषयीं सक्ती करीत नाहीं. देवी काढण्याच्या कामांत जशी मदत आहे तशी विद्येच्या कामांत मदत असल्यास सरकारी पैशाची अधिक चीज होणार आहे. कित्येक ठिकाणीं असें ऐकिलें आहे कीं पाटील व पांडे यांचे ह्मणणें असें पडतें कीं आह्मी वतनदार आहोंत आमच्या पोरांनीं शिक्षण न केलें तरी तीं उपाशी मरणार नाहींत, अशा भरवशावर जाऊन मुलें मूर्ख कारितात व त्यांच्यावर विद्येच्या कामांत सरकारचा कांहीं दाब नसल्यामुळें विद्येच्या कामीं मदत देण्याचा अभावच. सहावी यत्ता पास झाल्याशिवाय पाटील व पांड्या कामावर लावावयाचा नाहीं असें जर सरकार करील तर सर्वांचे डोळे उघडून सुधारणेची विशेष मजल वाढेल यांत संशय नाहीं.

दयाळु सरकारनें रयतेच्या सुखासाठीं येथें तळें बांधण्याचें काम सात आठ महिन्यांपासून चालविलें आहे. हजारों रुपये या कामास खर्च झाला असावा व रिसोड मुकामीं ओव्हरसियर पोलीस स्टेशन बांधीत आहेत त्यांच्या देखरेखीखालीं हें काम चाललें आहे. सदरहु ओव्हरसियर हरहमेश काम तपासण्यासाठीं व रोज माप करण्यासाठीं इकडे येतात. वडारी लोकांनीं कंत्राट घेऊन काम चालविलें होतें. रोज कामाची देखरेख करण्यासाठीं परमेश्वरसिंग नावाचा कारकून आठ रुपयांवर होता, त्यानें कंट्राक्टरापासून पैसे घेऊन त्यांत लबाडी केली अशा तर्कावरून त्याजला नवकरीतून बरतर्फ केलें व त्यानें हत्याराच्या बाबदींत खोटी बातमी दिली अशा आरोपावरून त्याजवर हल्लीं खटला सुरू आहे. रिसोड पोलिस स्टेशनचे जमादार चार पांच दिवसांपूर्वीं एथें आले व परमेश्वरसिंग व कांहीं साक्षीदार यांस एथून घेऊन गेले असें कळतें. हा खटला वाशिमास चालणार आहे.

ह्या गावांत पोस्ट नाहीं. रूरल मेसेंजर येत असतो. कधीं कधीं असें घडतें कीं, रिसोडास बाजार करण्याकरितां लोक जातात तेही पत्रें आणितात, हल्लीं ह्या गावीं येत असलेले शिपाई हे फार दिवसांचे जुने असल्यामुळें यांच्याकडून नियमाप्रमाणें खेपा होतात किंवा कसें याचा बरोबर खुलासा कळत नाहीं. कित्येक गावचे नंबरदारांच्या सद्या बाजारांत रिसोडास घेतात व पत्रें त्यांच्याबरोबर इकडे येतात. असो, कशी तरी आह्मास पोंचतात असें लोक बोलतात. पत्राची प्रसिद्धी कराल अशी आशा आहे.

आपला दास

फिरस्ता "क्ष"

# वऱ्हाडसमाचार.

मिति आश्विन शुद्ध १२ शके १८०१

## काबूलची फत्ते.

इंग्लिश सरकारानीं काबुलावर सैन्य पाठविल्याप्रमाणें त्यांनीं थेट काबुलावर जाऊन तें शहर व किल्ला हस्तगत करून घेतला. अमिराविषयीं जनरल राबर्ट साहेबास कांहीं संशय दिसून आल्यावरून त्यांनीं आपले सैन्यांत जरी अमीर येऊन दाखल झाला होता तरी त्यावर युरोपियन लोकांचा रात्रंदिवस पाहारा ठेविला होता. हल्लीं असेंही वर्तमान आलें आहे कीं, अमीर याकुबखान यानें आपणास राज्यपद नको असें सांगितलें. त्यावरून राबर्ट साहेबांनीं स्वतां राज्याचा सर्व बंदोबस्त तूर्त केला आहे. जनरल हिल साहेब यांस गवर्नर नेमिलें. अमिराचा सासरा वै दुसरे दोन अफगाणी सरदार यांसही राबर्ट साहेबानीं कैद केलें आहे. १३ वे तारखेस सैन्यासहवर्तमान मोठ्या थाटानें राबर्ट साहेबानीं काबूल शहरांत मिरवणूक केली. त्यावेळीं अमिरास बरोबर येण्याविषयीं विचारलें असतां त्याने आजारीपणाची सबब सांगितली सबब त्याचे चार वर्षांचे मुलास बरोबर घेऊन गेले होते. काबुली लोकांच्या सुमार २०० तोफा इंग्लिश सरकारचे हस्तगत झाल्या आहेत. मिरवणुकीचे वेळीं शहरांत बिलकूल कांहीं गडबड झाली नाहीं. लोक शांत दिसत होते. राबर्ट साहेबांनीं काबुलांत दाखल झाल्यावर जाहिरनामा लावला कीं, लोकांनीं आह्मास वाटेंत पुष्कळ अडथळे आणिले तेव्हां त्यांस आह्मी आतां आपले शत्रू समजतों. त्यांचे शहराचा आह्मी समूळ विध्वंस करावा हें शासन त्यांस योग्य आहे परंतु ब्रिटिश सरकार दयाळूपणानें तसें करीत नाहीं. आह्मी आतां शहरांत लश्करी छावण्या बांधू व त्यास आड येतील तीं घरें जमीनदोस्त करू. दंग्याची चौकशी आतां सुरू होईल व अपराध्यांस शिक्षा होईल. ५ मैल आसपास कोणीं शस्त्र बाळगूं नये. बाळगल्यास त्यास देहांत शासन होईल.

बालाहिसार किल्यांत दारूखाना आहे. त्यास आग लागून तो सोळावे तारखेस दिवसां दोन वेळां व रात्रीं एक वेळा उडाला तेणेंकरून फार नुकसान झालें. क्या. शाफटो व २० गुरखे लोक मरण पावले. तेथील फौज आतां खालीं आणिली आहे. या भडाक्याचें कारण बरोबर समजलें नाहीं.

## वासुदेव बळवंत फडके याचा खटला.

मुंबई इलाख्यांत दरोड्यांचा उत्पादक ह्मणून प्रसिद्धीस आलेला वासुदेव बळवंत फडके याचे चौकशीस बुधवार रोजीं १० वाजतां पुण्यास मि० किसर साहेब फर्स्ट असिस्टंट कलेक्टर यांचे कोर्टांत सुरुवात झाली. सरकार तर्फे मि० नानाभाई हरिदास व मि० नारायण जगन्नाथ भिडे हे वकील आहेत. आरोपी नंबर १ याचे तर्फे मि० गणेश वासुदेव जोशी व आरोपी नंबर ४-५-७-८ व १६ यांचे तर्फे मि० विसाजी निळकंठ खांडेकर हे वकील आहेत. कोर्टांत मुकदम्यांतील वकील व रिपोर्टर यांशिवाय इतरांस स्थलसंकोचामुळें जाण्याची परवानगी नाहीं. आरोपी नं० १ वासुदेव बळवंत फडके यास तुरुंगांतून कोर्टांत नेते वेळीं मोठी कडेकोट तयारी केली होती. गाडी बंद असून पुढें व मागें नागव्या तरवारीचे स्वार होते. चौकशी पुरी होई तोंपर्यंत ह्या आरोपीस घोरपडी एथें लश्करी तुरुंगांत ठेवणार आहेत. कोर्टापुढें हल्लीं १६ आरोपी आहेत त्यांची नावें येणेंप्रमाणें:— १ वासुदेव बळवंत फडके, २ तुकाराम नारायण, ३ तुकाराम मुऱ्हारी, ४ गोमा रामा, ५ कुशा बाळा, ६ बापू कोंडाजी, ७ लक्ष्मण देवजी, ८ कोंड्या लक्ष्मण, ९ रामा कृष्णा, १० बिठू येतू, ११ नाना वल्लद तुकाराम, १२ भाऊ दारकू, १३ गणेश लिंबा, १४ तुकाराम महादू, १५ कृष्णा बाळक्या, १६ बाबाजी हरी. कोर्टापुढें मुद्देमालाच्या पुष्कळ किरकोळ जिनसा आहेत त्यांपैकीं विशेष महत्वाच्या ह्मणजे २ बंदुकी, ३ तरवारी, २ पट्टे, बंदुकीची दारू, खानदेशचा नकाशा, दोन शिंगे अशा जिनसा आहेत. वासुदेव फडके याचा भाऊ यास आजपर्यंत अटकेंत ठेविलें होतें, परंतु चौकशीचे वेळीं तो व दुसरे दोन इसम यांस सोडून देण्यांत आले. या मुकदम्यांत काल रोजीं ज्या साक्षी झाल्या त्यांच्या जबान्यांतील तात्पर्य थोडक्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.

१ मेजर ड्यानियल पोलिस सुपरिंटेंडेंट:— वासुदेवाचा पाठलाग करण्याकरितां मी गेल्या जुलई महिन्यांत निजामचे मुलखांत गेलों. मजबरोबर फिन्यास आफिसांतील क्लार्क वगैरे मंडळीं होती. ता० २० मिनहू रोजीं रात्रौ खबर लागल्यावरून आह्मी कलादगी जिल्ह्यांत देवनगरी नांवाचे गावीं जावयास निघालों, व सदहू ठिकाणीं एका देवळांत आरोपी नंबर १ व त्याचा साथी असे उभयतां मजला सांपडले, उभयतां निजले असून त्यांनीं उशास ओड्याची पिशवी घेतली होती. कोर्टापुढें पिशवी आहे ती हीच होय. वासुदेवाबरोबर धरलेला साथी हल्लीं कोर्टासमोर नाहीं. उभयतांचा झाडा घेतला तों एक कट्यार व एक तरवार सांपडली. नंतर उभयतांस गांवचे चावडींत नेलें. ओड्याचे पिशवींत ज्या जिनसा होत्या त्यांपैकीं कांहीं येणेंप्रमाणें: — रुद्राक्षाची माळ, लहान मोठे लोटे तीन, नोट बुकें, रोजनिशी, हातानें लिहिलेला एक कागद, जन्म चरित्रें, लढाईबद्दलचें बूक एक, १००० रुपयांचा व एक तीन हजार रुपयांचा जाहिरनामा ह्या सर्व जिनसा कोर्टापुढें आहेत.

२ परशुराम नारायण पाटणकर:—मी पुणें हायस्कुलांत शिकत असतो. मी आरोपी नंबर १ यास ओळखतों. माझी ओळख दोन वर्षांची आहे. मी आरोपी नंबर १ याचे घरीं पट्टा शिकण्यास जात असे, व तो मजला शिकवित असे. रामोशांबद्दल आरोपी नंबर १चे व माझें बोलणें झालें होतें. आरोपी नं० १ ह्मणाला कीं मी रामोशी लोकांस उठविणार आहे. तुह्मीं मदत करावी, परंतु ह्यास मी कांहीं एक उत्तर दिलें नाहीं. ह्या बोलण्यास सुमार १॥-१॥। वर्षें झालीं. येथील सेशन कोर्टांत धामारीचे दरोड्याचे चौकशींत माझी साक्ष झाली आहे.

३ बाळा काशिनाथ उर्फ गणेश काशिनाथ:- उमर वर्षें १५ मी आरोपी नंबर १ यास ओळखतों. तो माझा मेव्हणा आहे. मी त्याचे घरीं जात येत असे. तेथें दुसरी ब्राह्मण मंडळी येत असे त्यांचीं नावें. गणू देवधर, माधवराव करमरकर, बाळा, शिताराम, गोपाळा कर्वे. या नावाचे मनुष्यांस मीं ओळखतों त्यास मी आरोपी नंबर १ याचे घरीं पाहिला होता. ही सर्व मंडळी वर्तमानपत्रें वाचीत असत. पुनाहेरल्ड नावाचें वर्तमानपत्र वाचीत असत. त्यांतील कोणता विषय वाचीत असत याचें मला स्मरण नाहीं. जानकू नावाचा मनुष्य मी ओळखतों. तो रामोशी आहे. तो एक दोन वेळ आरोपी नंबर १ चे घरीं आला होता. आरोपी नंबर १ याजवळ बंदूक, तरवार, पट्टा, पिस्तुल, मोडका पट्टा. इतकीं हत्यारें होतीं. भाला होता किंवा नाहीं हें माझे लक्षांत नाहीं. हीं हत्यारें आरोपी नंबर १ याणें कोणते वेळीं कोणते गावीं पाठविलीं त्याचें मला स्मरण नाहीं. तीं गाडींत पाठविलीं असें मी ऐकिलें; कारण पास आणला होता. या प्रकरणांत माझी सेशन कोर्टांत धामारीचे दरोड्याचे चौकशींत जबानी झाली आहे. सदहू प्रसंगीं ह्यौ हत्यारांबद्दल मजला विचारलें होतें, परंतु मी काय जबाब दिला हें मजला आठवत नाहीं. मी पूर्वीं असें सांगितलें आहे कीं, हीं हत्यारें कडब्याचे गाडींत घालून पाठविलीं, परंतु ही गोष्ट मी घरांत बोलतांनां ऐकली होती व त्याजवरून सांगितलें. वर्तमानपत्रांत दरोड्याचा, लढाईचा व इतर मजकूर वाचीत असत. आरोपी नंबर १३ यास मी ओळखतों व तो आरोपी नंबर १ चे घरीं आलेला मी पाहिला आहे. एक दोन वेळां आलेला पाहिला आहे. हा इसम कर्ज मागण्याकरितां आला होता. दुसरे कांहीं कामाकारितां येत नव्हता.

४. शिताराम बाळकृष्ण:-उमर वर्षें २० पूर्वीं शाळेंत जात होतों. हल्लीं घरीं आहे. शाळेंतून निघाल्यास दोन वर्षें झालीं. मी आरोपी नंबर १ याचे घरीं एक वेळ गेलो होतो त्याजवरून त्यास ओळखतों. आरोपीचें नांव वासुदेव आहे. मी सुमार एक वर्षामागें मुंबईहून आलों, व गणेश कृष्ण देवधर याचे घरीं उतरलों. गणेशानें मला वासुदेवाच्या घरीं नेलें. तेथें मी जानकू यास पहिला, व चिमा मावशीबाई पाहिली. आरोपी नंबर १ याचे घरीं दोन इसम बसले होते. ते रामोशी होते किंवा कोण होते हें मजला ठाउक नाहीं. चिमा ह्मणाली मी ४०-५० मनुष्यें घेऊन येईन. जानकू ह्मणाला मी ३०-२५ मनुष्यें आणीन. तीं मनुष्यें कशाकरितां आणीन ह्मणाला तें मला ठाऊक नाहीं. हें बोलणें चाललें होतें ते वेळेसच मी तेथें गेलों. त्याचे पूर्वीं मी तेथें नव्हतों, यामुळें काय भाषण झालें हें मला ठाऊक नाहीं. बोलणें चालत असतांनां मजला माडीवर जाऊन बसण्यास सांगितलें. मी गेलों त्या वेळेस हें बोलणें मागील दाराचे पडवींत झालें. ज्या घरीं मी उतरण्यास गेलों होतों तें घर सचिवाचे वाड्याजवळ आहे. ह्या घरांत मी एक दिवस राहिलों. वर लिहिलेले इसमाशिवाय आरोपी नंबर एक याचे घरीं एक इसम आला होता त्याला भवानी ह्मणून हाक मारीत असत. त्याचें व आरोपी नंबर एक याचें काय बोलणें झालें तें मी ऐकलें नाहीं. हल्लीं भवानी कोठें आहे हें मला माहित नाहीं. सेशन कोर्टांत ज्या वेळेस माझी जबानी झाली त्या वेळेस भवानी कैदेंत होता.

५. अर्जुना वल्लद हणमंता— आरोपी नंबर १ यास मी ओळखतों. याचें नाव वासुदेव. त्याचे बापाचें नाव व आडनाव ठाऊक नाहीं. हा मुंबई हापिसांत नोकर होता. मुरलीधराचे देवळाजवळ याचें घर आहे. सद-

हे ठिकाणे मी जाऊन भेटलों. त्यास सुमारें ११।१२ महिने झाले. सदर्हू ठिकाणीं एक हातारा बळवंतराव नावाचा मनुष्य होता. आरोपी नंबर एक याचें व माझें बोलणें झालें. मजला आरोपी नंबर १ याणें विचारलें कीं तूं कोण आहेस. त्याजवरून मी जातीचा रामोशी आहे असें सांगितलें. नंतर त्याणें विचारलें कीं तुजला २०० मनुष्यें मिळतील काय? मी मिळणार नाहींत ह्मणून सांगितलें. कशाकरितां पाहिजेत ह्मणून मी विचारलें नाहीं. नंतर मी निघून गेलों. पुढें आठ पंध्रा दिवसांनीं पुनः कलेक्टर आफिसाजवळ आरोपी नंबर १ याची गांठ पडली. मी त्यास रामराम केला. आणि इकडे कोणीकडे गेला होता ह्मणून विचारलें. मी मुंबई आफिसांत नोकर आहे ह्मणून त्यानें उत्तर केलें. ही गोष्ट मी ड्यानियल साहेबांस सांगतली. त्यांनीं मजला मुंबई आफिसांत ओळखण्याकरितां नेलें. तेथें आरोपी नंबर एक भेटला नाहीं. ही गोष्ट मजला धामारीचे दरोड्यानंतर ड्यानियल साहेबांनीं विचारली. त्यास नऊ दहा महिने झाले. आरोपी नंबर एक यास मी एक वेळ त्याचे घरीं व एक वेळ रस्त्यांत पाहिलें. त्यानंतर आज पाहिलें. पूर्वी पाहिलें त्या वेळेस दाढी मात्र नव्हती. ही खबर धामारीचा दंगा झाल्यावर प्रथम मी रा. ब. यांस सांगितल्यानंतर त्यांनीं मजला ड्यानियल साहेब यांजकडे नेलें. ज्ञा. प्र.

X हे पांच व आणखी असेच ७ मिळून प्रथम दिवशीं १२ साक्षीदार झाले. व कोर्टाचें काम बंद झालें. पुढील हकीकत पुढील आठवड्यांत येईल.

## वऱ्हाड.

मे० दस्तुर रतनजी जामासजी साहेब एथें आले होते ते गेले रविवारीं हैदराबादेस आपले कामावर जाण्याकरितां परत गेले. यांस तिकडे हल्लीं २१०० रुपये दरमहा पगार मिळूं लागला आहे असें समजतें.

रा. रा. श्रीराम भिकाजी जटार इजुकेशनल इन्स्पेक्टर उमरावतीहून कारंजाकडे गेले होते ते गुरुवारीं एथें आले. दोन तीन दिवशीं पुन्हा फिरावयास जाणार आहेत.

अकोल्यासमाज नावाचे आपले लोकांचे हवन दसऱ्याचे दिवशीं एथें सुरू झालें.

नागपुरास २८ वे तारखेस वकीलीची परीक्षा होणार आहे. उमेदवार १२ आहेत.

मि० बमनजी फिरोजशा सालिसिटर एथें वकीलीचें काम करण्याकरितां आले होते त्यांस मुंबईपक्षां विशेष सोय व फायदा एथें दिसून न आल्यामुळें त्यांनीं एथें कायमचा रहाण्याचा विचार सोडून दिला. व ते मुंबईस परत गेले. आतां एकादे कामानिमित्त कोणी बोलाविल्यास ते तितक्यापुरते एथें येत जातील. हे गृहस्थ विद्वान, हुशार व फार भले होते.

एक तहशिल्दारांची जागा रिकामी होणार आहे व तिचे वर्गावर्गीत रा. रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर हे कायमचे क्लार्क आफ कोर्ट होतील असें ह्मणतात. दुसरें अशीही वर्तमान आहे कीं मेळघाटचे तहशिल्दार रा. रा. सदाशिव भास्कर यांचा वर्ग होऊन रा. रा. परशराम गणेश इलिचपुरचे क्लार्क आफ कोर्ट यांस त्यांची जागा मिळून रा. रा. गणेश गोविंद डिपुटी क्लार्क यांस परशराम रावांची जागा मिळावी अशीही शिफारस झाली आहे.

खामगावचें स्माल काज कोर्ट पुन्हा बंद झाल्यासारखें झालें आहे. आतां तेथें कोणास कधीं पाठवितात तें पहावें. त्या कोर्टाचे असिस्टंटकडे जळगाव, खामगाव व बाळापुर या तालुक्यांचें फौजदारीचें काम असून खामगाव तालुक्याचें मुल्कीचें काम आहे, शिवाय स्माल काज कोर्टाचें काम असें असतां दिवसांचे दिवस बऱ्याच वेळां तें कोर्ट बंद रहातें ही सरकारी योजनेची एक तारीफच आहे! मुल्कीकडील शिरस्तेदार रा. रा. नारायण रावजी हे आतां इकडेच येतील असें दिसतें.

मि० डनलप साहेब विलायेतेस रजेवर आहेत ते डिसेंबरचे तिसरे आठवड्यांत इकडे येतील असें समजतें.

वाशिमापासून कारंजापर्यंत सडक करण्याकरितां मंगरूळ व मूर्तिजापुर तालुक्यांतील १७ गांवची ७८ फूट रुंदीची १६॥। मैल जमीन सरकारानें घेण्याविषयीं जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे.

क्या० इंग्लेडयू ए. इंजिनियर यांस धोंड मनमाडरेलवेचे व वऱ्हाडरेलवेचे म्यानेजर नेमिलें आहे

मि० रीड साहेब व मि० पेप साहेब ए. इंजिनियर आणि मि० डाब्स साहेब असि० इंजिनियर यांचे राजिनामे सरकारानें मंजूर केले.

१६ वे तारखेस म्युनिसिप्यालिटीची जनरल कमिटी भरली होती. मि. चार्लस इन्स्पेक्टर यांनीं ९ महिने आपणास २९ रु. पगार मिळाला व बजेटांत ३० रु. मंजूर होऊन आला होता सबब राहिलेले पांच पांच रुपयेप्रमाणें २९ रुपये मिळावे असा अर्ज केला होता पण तो नामंजूर झाला. आह्मास आश्चर्य वाटतें कीं त्यांच्या योग्यतेबाहेर त्यांस ५० रुपये देण्याची कमिटीनें मेहेरबानी केली आहे तरी त्यांस अधिक हाव आहेच. म्युनिसिप्यालिटीनें त्यांस हा मोठा पगार देतांनां जीं जीं कामें करावीं लागतील ह्मणून सांगितलें व ज्यां ज्यांविषयीं त्यांनीं छातीला हात लावून मी तीं चांगलीं करीन ह्मणून ह्मटलें तीं सर्व त्यांच्याकडून होतात असें अगदीं दिसत नाहीं. व कमिटीचे पैशाचा हा केवळ गैरउपयोग होत आहे. सबब इन्स्पेक्टर साहेब अधिक शहाणे होतील किंवा कमिटी या कामीं पुन्हा विचार करील तर चांगलें होईल. आमचे बंधू उर्दूअखबारकर्ते यांनींही नेमणूक बरोबर न झाल्याविषयीं जें भविष्य केलें होतें तें खोटें होत नाहीं असें दिसतें.

मेजर ल्याटण साहेब डिपुटी कामिशनर यांस दोन वर्षांची विलायतेस जाण्याकरितां रजा मिळाली. व त्यांनीं आपले कामाचा चार्ज बुधवारीं मि० किट्स साहेब खामगावाहून आले त्यांस दिला. व साहेब बहादूर आज रोजीं मुंबईकडे जाणार. यांचा स्वभाव फार गरीब व वागणूक अगदीं साधी होती व हे काम करण्याविषयीं मेठे मेहेनती व दक्ष होते. त्यामुळें सर्वतोमुखी यांची वाहवा ऐकूं येत आहे. व यांच्या जाण्यानें लोक हळहळत आहेत.

अकोल्याचे, उमरावतीचे व दर्यापुरचे नायब तहशिल्दार यांस पाऊणशें पाऊणशें रुपये पगार झाला.

हैदराबादेस बोलारम येथील दरवड्यांत असलेले बरेच रोहिले व तेलंगी लोक सांपडले आहेत. त्यांची चौकशी हैदराबादेस लवकरच होणार आहे. या चोरटे लोकांपाशीं दोन तीन हजारांचा विषय व कांहीं शस्त्रें सांपलीं आहेत असें ह्मणतात.

उमरावतीच्या मिडलक्लास स्कुलास बक्षिसें वाटण्याचा समारंभ झाला. त्या प्रसंगीं मि० जोन्स साहेब कमिशनर अध्यक्ष स्थानीं होते. त्यांनीं हेड मास्तराविषयीं व एकंदर शाळेविषयीं स्तुतिपर भाषण केलें. वर्षास या शाळेची परीक्षा चांगली होत असून रा. रा. गोविंद विश्वनाथ भावे तेथील हेडमास्तर यांस अजून बढती मिळत नाहीं हें पाहून आह्मांस वाईट वाटतें. ते खरोखर बढतीस लायक आहेत.

अकोल्याप्रमाणें उमरावतीसही चोरटे लोकांचे प्रयत्न चालू आहेत. त्यांनीं गेले आठवड्यांत रा. रा. वामनराव भोळे सुपरवाइझर यांचें घर फोडण्याचा प्रयत्न केला होता परंतु माणसें जागीं झाल्यानें यांचा बेत फसला. ठिकठिकाणच्या पोलिसांनीं अशा कामीं सावधगिरी ठेवावी हें त्यांस फार अवश्यक आहे.

इलिचपुरचे मुलीचे शाळेवरील मास्तरास कामास गैरउपयोगी ह्मणून ग्राचुइटीचा अर्ज करण्याविषयीं हुकूम झाल्याचें समजतें.

कालिदास नाटककार मंडळी नागपुराकडे गेली होती ती उमरावतीस आली आहे. व त्यांचे खेळ तेथें चालू आहेत.

रा. रा. सखाराम दत्तात्रय तहशिल्दार यांचें पेनशन मंजूर होऊन आलें व तें त्यांनीं नाशकास मागाविलें आहे असें समजतें.

या आठवड्यांत एथें अस्पिटल असिस्टंट लोकांची परीक्षा झाली.

मे० मेकंजी साहेब इलिचपुरचे डिपुटी कमिशनर या आठवड्यांत रजेवरून परत येऊन आपले कामावर रुजू झाले.

रा. रा. त्रिंबकराव यशवंत मलकापुरचे तहशिल्दार तारीख १९ नोवेंबर पावेतों आपले कामावर रुजू होत नाहींत असें ह्मणतात. त्यांचे वर्गावर्गीत येथून बुलढाण्यास क्लार्कचे जागेवर गेलेले रा. रा. वासुदेवराव पिसोळकर दसऱ्याचे सुटीत एथें आले होते ते आज परत जाणार आहेत.

एथें तुरुंगापलीकडे मलकापूरचे जंगलांत शर्यती वगैरे खेळण्याकरितां जागा केली आहे. तेथें गुरुवारीं व काल शनिवारीं युरोपियन लोकांचे खेळ झाले. गुरुवारीं सकाळीं घोड्यांच्या शर्यती झाल्या. दोन प्रहरून घोड्यावरून चेंडुफळीचा खेळ झाला त्यांत इंगोली रिसाल्याचे कांहीं घोडेस्वारही होते शुक्रवारीं रात्रीं क्लबमध्यें मोठा बाल झाला. व काल सायंकाळीं पुन्हा ४ शर्यती झाल्या त्यांत एक ताटाची होती. मि० हेर साहेबांनीं २, मि० किट्स साहेबांनीं १, व डा० लिट्ल साहेबांनी एक शर्यत जिंकिली. पहिले दिवशींचे शर्यतींत घोड्यांची एक शर्यत डा० ह्यूम साहेब यांनीं व दोन मि० हेर साहेब यांनीं जिंकिल्या. ब्यांडबाजाही प्रत्येक वेळीं हजर होता. बाहेर गांवाहूनही कित्येक युरोपियन गृहस्थ या कामासाठीं आले आहेत हें स्थळ शहरापासून दोन मैलांहुन अधिक लांब आहे तरी पाहण्याकरितां शेकडो लोक गाड्यांतून व पायांनीं जात होते.

पोस्टांतून कांहीं लबाड्या होऊं लागल्या आहेत. याविषयीं मागें आह्मी लिहिलें आहे. व हल्लींही थोडे दिवसांत दोन तीन पाकिटें खुद्द आमची चोरीस गेल्याविषयीं समजून आलें आहे. एका पत्रांत मनीआर्डर होती व दोहोंत टिकिटें होतीं, यावरून दुसरे कित्येक लोकांचींही अशीं पत्रें चोरीस जात असतील. कोणी नोकर लांचावला आहे असें दिसतें. तर त्या खात्याचे अधिकाऱ्यांनीं त्याचे कामावर पैरवी ठेवावी. व पत्रांतून टिकिटें, नोटा, मनीआर्डरी पाठविणारांनीं तीं पत्रें नुसतीं पोष्टपेड पाठवित जाऊं नयेत. रजिस्टर करीत जावीं असें आमचें त्यांस सांगणें आहे नाहींपेक्षां चोरास मदत केल्यासारखें होऊन त्यांचा पैसा फुकट जाईल सबब याकडे त्यांनीं लक्ष द्यावें.

रुरल मेसेंजर लोकांकडून वर्तमानपत्रेंही वेळच्यावेळीं वाटलीं जात नाहींत असा आह्माकडे कित्येकांचा बोभाट आहे. गेले आठवड्यांत वाशीम जिल्ह्यांतील एका गृहस्थानें आह्मांस लिहिलें आहे कीं आमचीं दोन दोन व तीन तीन आठवड्यांचीं पत्रें कधीं कधी एकदम येतात व एकेक अंक आह्मांस मुळींच मिळत नाहीं. याजकडे पोष्टाच्या अधिकाऱ्यांनीं लक्ष द्यावें.

मि. स्प्यान्स्की साहेब यवतमाळचे डिपुटी कामिशनर एक महिन्याचे रजेवर गेले आहेत व त्यांचें काम मि. इलियट साहेब असिस्टंट कमिशनर पहात आहेत.

खामगाव एथें रा. रा. व्यंकटराव रंगराव देशपांडे यांस सबरजिस्ट्रार नेमिलें आहे.

सरकारी टेलिग्राम फार जातात त्या संबंधानें, कामदार लोकांचे अर्ज सरकारास जातात त्या संबंधानें, अकोला काटन मार्केटच्या संबंधानें व स्टेट रेलवेवर अपाय होतात त्या संबंधानें १९ वे तारखेच्या रेसिडेंसी आर्डरमध्यें नियम छापून प्रसिद्ध झाले आहेत ते आह्मी पुढील अंकीं आपले वाचकांस कळवूं.

## वर्तमानसार.

रशियन लोकांनीं मर्व शहर आपले स्वाधीन करून घेतलें अशी खबर आली आहे.

नागाहिल्सकडे दंगा उत्पन्न झाला आहे, व सरकारचे एक डिपुटी कामिशनर मि० डामंट साहेब यांस व त्यांचे बरोबरेच पांच पन्नास लोकांस नागा लोकांनीं ठार मारलें असें वर्तमान आलें आहे.

दक्षिणप्रांतीं दरवडे पडण्याची पुन्हा सुरवात झाली आहे, दोन आठवड्यांत कित्येक ठिकाणीं मोठमोठाले दरवडे पडले, व त्यांत दरवडेखोर पुष्कळ असून कित्येक हत्यारबंद होते असें समजलें आहे.

रावबहादूर शंभुप्रसाद लक्ष्मीलाल यांस तारीख ७ मिनहूस काठेवाडांत अम्रोली एथें देवाज्ञा झाल्याची खबर ऐकून आह्मांस फार वाईट वाटतें.

ने० ना० सर रिचर्ड टेंपल साहेब दादर व सक्कर यांजमधील नवीन होणाऱ्या रेलेच्या रस्त्यावरून इंजिनांत बसून १९ मैल गेले होते.

लॅढाईचे सैन्याबरोबर वर्तमानपत्राचे बातमीदार जण्याचें सरकारानें अलीकडे बंदें केलें होतें तो अटकाव हल्लीं काढून टाकला आहे. हे बातमीदार जी शिधा सामोग्री कमिसरिएट खात्यांतून घेतील त्याबद्दल त्यांनीं रोख पैसे द्यावे असाही ठराव केल्याचें समजतें.

आग्रा एथें हल्लीं अशी दंवडी पिटाविली आहे कीं आतां मजूरदार लोकांस सक्तीनें धरूं नये व सरहद्दीकडे पाठवूं नये. ज्या मजूरदार लोकांची खुशी असेल त्यांस सरकार दरमहा जेऊन पांच रुपये पगार व एक कांबळी देणार व पेशावर पलीकडे गेल्यावर आठ रुपये व दोन जोड कपडे देणार.

इंग्रज सरकारचे सैन्याचे आपणांस पुढें काय करावयाचें याविषयीं जे विचार होतात ते सर्व काबूलचे सैन्यास पूर्वीं कळतात परंतु ही बातमी कोण देतो हें अद्याप पुरें समजलें नाहीं.

जे लोक लढाईंत कैद केले जातात त्यांस गोळी घालून ठार मारण्याचा क्रम इंग्रज सरकारच चालला आहे. अमीरांचे जे पूर्ण विश्वासू लोक होते त्यांनींच बंड केलें व तेच लोक. हल्लीं इंग्लिशाबॅरोबर लढण्यास सैन्यें आणित आहेत असें समजतें. या पुढारी लोकांपैकीं अद्याप कोणीही सांपडला नाहीं. सरदार नाइक महंमद हे सर्व बंडखोर लोकांचे प्रमुख आहेत असें ह्मणतात.

चीन व जपान सरकार यांजमध्यें तंटा उपस्थित झाला असून लवकरच लढाई सुरू होईल असा तिकडील वर्तमानपत्रांतून बराच बोभाट सुरू झाला आहे.

तुर्कस्थानचे सुलतानांनीं आपल्या सैन्या पैकीं ९०,००० लोकांस रजा दिली असें समजतें.

मांडले एथें जे इंग्रज सरकारचें वकील मंडळ होते त्यांमध्यें मि० आलिन्स पोस्ट मास्तर यांची त्या सरकारच्या एका कामदाराच्या मुलानें भर रस्त्यांत फजीती केली. त्यांवरून सदर्हू साहेबांनीं पोलिस चौकीवर जाऊन दाद मागितली परंतु पोलिस शिपायांनीं ही दाद न घेतां उलट हासूं लागले.

मद्रासचे गवरनर यांनीं असा हुकूम फर्माविला आहे कीं कोणीही मनुष्य पंचवीस वर्षांपेक्षां जास्त वयाचा असेल त्यास सरकारचे परवानगी शिवाय सरकारी नौकरी मिळणार नाहीं.

मंडले एथून अशी बातमी समजते कीं, तेथील राजानें आपल्याशी लढाई सुरू झाल्याबरोबर रंगून शहर जाळून टाकण्याचा विचार केला आहे. हें काम करण्यास ज्या लोकांची योजना केली आहे. त्यांस या प्रळयांत राजघराण्यांतील जितके लोक मरतील त्या प्रत्येकाबद्दल पांच पांचशें रुपये बक्षीस देण्याचें ठरविलें आहे.

मांडाले एथें कांहीं युरोपियन लोक रात्री अकरा वाजल्यावर शहरांत फिरत होते सबब त्यांस कैद करून अटकेंत ठेविलें होतें.

मेजर डानियल हे दरवेडखोरांचा पत्ता लावण्या करितां पुन्हा फिरावयास निघणार आहेत असें समजतें.

युरोपियनास दंड—बेळगांव जिल्ह्याचे मे० पेन सा० बा० दि० सु० पोलिस यांजवर मारामारीची फिर्याद होऊन १० रुपये दंड झाल्याचें कळतें.

सोलापुर— आजपर्यंत ज्या कोल्याबाधि उंदरांनीं सर्व पिकांचा नाश केला त्या उंदराचे नाशाविषयीं सरकारानें आजपर्यंत हजारो रुपयांचा खर्च केला तरी त्यांचा नाश झाला नाहीं. परंतु ईश्वरेच्छेनें हल्लीं त्याच उंदराचे अंगांस गोचिड झाले असून उंदरांचा नाश झाला आहे. प्रत्येक उंदराचे अंगास निदान १०।१९ गोचिड असतात व ज्याचे अंगास गोचिड चिकटला तो उंदीर वाचतच नाहीं. यावरून ईश्वराची लीला अगाध आहे असें ह्मणण्यास चिंता नाहीं. ने. ओ.

---

## लोकस्थिति

आमच्या महाराष्ट्र देशांतील बहुतेक लोकांची स्थिति दिवसेंदिवस वाईट होत चालली आहे लोकसंख्या वाढत असून त्या मानानें नवीन रोजगार धंदे वाढत नाहींत एवढेंच नव्हे तर असलेले जुने देखील बहुतेक मागें पडत चालले आहेत. यामुळें तूर्तास जरी लोकांस फारशी खाण्यापिण्याची अडचण पडत नाहीं तरी आमच्या मागून येणाऱ्या संततीस केवळ उपासमारा काढावा लागणार आहे. अशा प्रकारचे उद्गार वेळोवेळीं देशी वर्तमानपत्रांतून व सभांतून निघालेले ऐकूं येतात. या भावी संकटाच्या निरसनार्थ कांहीं कांहीं देशाभिमानी ह्मणविणारे लोकांनीं आपापले विचार वर्तमानपत्रांतून व अन्य द्वारांनीं प्रसिद्ध केले आहेत. त्यांचें एकंदर असें ह्मणणें पडतें कीं आह्मांमध्यें जे कोणी विद्वान ह्मणून लोक आहेत त्यांनीं या कामांत पुढारीपणा घेऊन आपल्या लोकांकरितां कांहीं नवीन कारखाने सुरू करावे ह्मणजे पांढरपेशे लोकांस कारकुनीचाच धंदा करून पोट भरण्यांत जो कांहीं हल्लीं मोठेपणा वाटत आहे तो नाहींसा होऊन त्यांस स्वतंत्र धंद्याची गोडी लागेल व त्यापासून एकंदरींत ते पुढें सुखी होतील.

या संबंधानें आह्मास दोन गोष्टी सुचवावयाच्या आहेत. त्या अशा कीं, ब्राह्मण जातीस अनुलक्षूनच हा जो उद्योग चालला आहे तसें न होतां त्यांत सर्व कांहीं जातींचा समावेश व्हावा. कारण केवळ ब्राह्मण लोकांसच धंदा रोजगार नाहींसा झाला आहे असें नाहीं. तर पिढ्यानुपिढ्या ज्यांचा स्वतंत्र धंदा चालत आला होता अशा लोकांस देखील आमच्या दुर्दैवामुळें घरीं रिकामें बसण्याचा प्रसंग आला आहे. त्यांच्या पूर्वीच्या व आतांच्या स्थितीची तुलना केल्यास ब्राह्मण जातीच सुखी आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ते बहुतेक शिकलेले असल्यामुळें सरकारी नवकरी करणारे असे त्यांच्यामध्यें पुष्कळ सांपडतील. शिवाय प्रसंग आल्यास त्यांची भिक्षुकी आहेच. ही भिक्षुकी ह्मणजे आह्मांस इष्ट आहे असें नाहीं. ती नाहींशी व्हावी ह्मणून वेळोवेळ आह्मी लिहित असतोच. तथापि पुष्कळ ब्राह्मणांची आज काल तिच्यावर उपजीविका होत असून तो आपला केवळ हक्क आहे असें देखील ते समजत आले आहेत परंतु जे आज पुष्कळ दिवस स्वतंत्र धंदा करणारे आहेत त्यांजवर जर कोणच्याही रीतीनें वाईट प्रसंग आला तर मात्र देश खरोखर कंगाल झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्मणून जे जे कोणी जुने कारागीर व कसबी लोक असतील त्यांचा धंदा बुडूं न देण्याविषयीं आपला सतत प्रयत्न चालू असला पाहिजे. त्यांस मदत करून हरएक प्रकारें त्यांच्या कसबाची आपल्यामध्यें व दुसऱ्या लोकांमध्यें देखील खरोखर चंज होईल अशीच आपण तजवीज केली पाहिजे. व देशोन्नतीच्या संबंधानें जे जे कांहीं आपल्यामध्यें विचार निघतील त्यांत त्या लोकांची अवश्य गणना झाली पाहिजे. यापासून आपल्यास कोणच्याही रीतीनें तोटा न होतां झाली तर कदाचित् थोडीबहुत मदतच होईल.

दुसरा विचार— मोठमोठ्या विद्वान लोकांनीं यांत पुढारि पणा घेऊन नवीन नवीन कारखाने उभे करावे. हें ह्मणणें तूर्तांच्या प्रसंगास साध्य होईल किंवा नाहीं याचा संशयच आहे. कारण लोकसमुदाय जोंपर्यंत अज्ञान स्थितींत आहे तोंपर्यंत पुढारि लोकांनीं अशीं कामें एकदम हातीं घेतलीं तर त्यांत त्यांस यशच येईल असें खात्रीनें सांगवत नाहीं. लोकस्थिति सुधारण्याविषयीं जेवढा प्रयत्न होईल तेवढा तूर्तास इष्ट आहे. जुटीनें व प्रामाणिकपणानें कोणतेंही काम केल्यापासून काय फायदे होतात हें लोकांस समजलें पाहिजे. प्राप्तीच्या मानानें द्रव्यसंग्रह करण्याची आह्मांपैकीं पुष्कळ लोकांस अद्याप गोडी लागली नाहीं व यामुळें कोणतेंही काम करणें झाल्यास पैशाची नड सर्वत्र दिसून येते. यामुळें आजपर्यंत विद्वान लोकांनीं जीं जीं कामें हातीं घेतलीं तीं तीं सर्व मागें पडत चाललीं आहेत. किती जरी विद्वान असला तरी सर्व कांही कामें त्याला एकट्यालाच करवत नाहींत हें उघड आहे. दुसऱ्यांची मदत ह्मणून त्याला घेतलीच पाहिजे. हे दुसरे लोक जसे मिळतील त्याप्रमाणें हातीं घेतलेल्या कामाचा निभाव लागणार आहे. खरोखर इमान बाळगणारे असे जेव्हां आह्मांमध्यें लोक मिळतील तेव्हांच कसें जरी मोठें काम असलें तरी ते तडीस नेण्यास विद्वान लोक समर्थ होणार आहेत. नाहीं तर श्रीमान ह्मटलेल्या लोकांनींच हीं कामें आपल्या स्वतांच्या जोखमावर चालविलीं पाहिजेत व त्याप्रमाणें आज कित्येकांनीं तीं चालविलींही आहेत. तेवढ्यावरच आपण तूर्तास संतुष्ट राहिलें पाहिजे. त्यांच्या कामांत देखील मिळोव तसे इमानी लोक मिळत नसल्यामुळें त्यांजवर नाहीं नाहीं तीं संकटें येत आहेत हें आपण पाहतच आहों, तरी पैशाच्या जोरावर त्यांचा त्यांस कसा तरी निभाव लावतां येतो; परंतु नुसत्या विद्वान ह्मणविणारांस त्यांपासून वरमान करण्यास देखील जागा राहणार नाहीं हें उघड आहे. आलीकडेच या मुंबई शहरांत आमच्या एका विद्वान मित्रानें एक संस्कृत व मराठी त्रैमासिक पुस्तक काढण्याचा एक लहानसा उद्योग सुरू केला होता. हा उद्योग फार चांगला चालला असून लोकांसही त्यापासून पुष्कळ उपयोग होण्याचा संभव होता. पांडितंमन्य परंतु सायीदार जो त्याला मिळाली त्यानें एका वर्षाच्या आंत आपली कावेबाजी प्रकट केल्यामुळें ग्रंथकर्त्याचा हातीं धरलेल्या कामीं जरी मोठा उत्साह होता तरी त्याचा त्यानें भंग करून टाकला. यामुळें हल्लीं तें काम बरेंच मागें पडलें आहे. हेंच सें काय परंतु पहावें तिकडे असाच प्रकार चालला आहे असो, या प्रमाणें आह्मा लोकांची एकंदर स्थिति आहे. अशा स्थितींत विद्वान लोकांनीं पुढारीपणा घेऊन तोंडघशी येण्याचा मात्र विशेष संभव आहे. यापासून दुसरें कांहीं निष्पन्न होईल असे वाटत नाहीं ह्मणून लोकांची अज्ञान स्थिति जी आहे ती नाहींशी करण्याचा प्रयत्न करणें एवढेंच तूर्तास इष्ट आहे, लोकस्थिति एक वेळ चांगली झाली ह्मणजे पाहिजे तें काम करण्यास आह्मी समर्थ होणार आहों. याला उदाहरण फ्रान्स देशाचें. मागें जर्मनी बरोबर जी लढाई झाली त्यावेळेस त्या देशाचा अगदीं विध्वंस होऊन गेला होता. तरी तिकडचे लोक शहाणे व त्यांच्यामध्यें इमान मोठें या मुळें अल्पकाळांत ह्मणजे एक दोन वर्षांत त्यांनीं आपली पूर्ववत् स्थिति करून सोडली. परंतु त्यांच्या उन्नतीचें जें कारण त्याचा आह्मां मध्यें पूर्ण अभाव यामुळें आह्मी वर्षानुवर्षें जरी खटपट करीत आहों तरी आमचें किंचितही पुढें पाऊल पडलेलें दिसत नाहीं, उलट पिछे हाट होत चालली आहे. याचें कारण लोक स्थिति. ती जेव्हां सुधरेल तेव्हांच आह्मी आमच्या संकटांतून पार पडणार आहों. सु. प.

---

## सुईण

किंवा.

प्रसूति आणि तत्संबंधी अज्ञानमूलक व अनर्थकारक परिपाठ.

या नावाचें नवीन पुस्तक मिसेस रेबेका सिमियन ग्रांट मेडिकल कालेजांत पास झालेली सुईण यानीं तयार केलें आहे. त्याच्या प्रति आह्माकडे विक्रीस आल्या आहेत. हें पुस्तक कुटुंबवत्सल सर्व लोकांनीं संग्रहास बाळगण्याजोगें आहे. याची किंमत सहा आणे बाहेरगावीं नेणारास टपाल खर्चाबद्दल एक आणा अधिक पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

---

## बुकसर्क्युलर नंबर ७ सन १८७९

अलीशान रेसिडेंट साहेब बहादुर यांनीं मुलूख अमानी हैदराबाद यांतील सर्व दिवाणी कोर्टांचे न्यायाधीश यांचे माहितीकरितां "दिवाणी मुकदम्याचे चौकशी संबंधी वहिवाटीचें टिपण" याजबद्दल ५६ कलमांचें एक सर्क्युलर नुकेंच प्रसिद्ध केलें आहे त्याचें मराठी भाषांतर मे० जुडिशियल कमिशनर साहेब बहादूर यांनीं छापविलें त्याच्या प्रति आमचेकडे विक्रीस आहेत. किंमत चार आणे. बाहेरगावीं एक आणा टपाल खर्च पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें